पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवचरनेसाठी
# द पीपल्स पोस्ट
स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ । अंक ४ था । मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते ३१ ऑक्टोबर

दिवाळी विशेष

# कभी न आना डायन



पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ ।
अंक ४ । मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते ३१ ऑक्टोबर २०२२

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट
8888541822

- **जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

**अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त**

- **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय :** कभी न आना डायन – ३ / मूलतत्त्ववाद आणि त्याचे विविध चेहरे – **अनंत बागाईतकर** – ५ / कट्टरतावादाचा बिमोड नव्या दिशेनेच शक्य – **डॉ. भारत पाटणकर** – १३ / भांडवलशाही व मूलतत्त्ववाद – **श्रीनिवास खांदेवाले** – १५ / मूलतत्त्ववाद : स्त्री शूद्रांचा कर्दनकाळ – **बी.जी. वाघ** – १९ / विज्ञान, आणि मूलतत्त्ववादातील संघर्ष – **प्रा. जयप्रकाश म्हात्रे** – २३ / **हवा दिल्लीची :** काँग्रेसमध्ये सुरू झाले नव्या अध्यक्षांचे नवे पर्व – **विजय नाईक** – २७ / राष्ट्रीय स्वयंसेवक संघ बदलतो आहे का? – **लक्ष्मीकांत देशमुख** – ३१ / **रेषा आणि फटकारे :** कलांमधील चलाख टोळधाड! – **संजय पवार** – ३४ / **इतना सन्नाटा क्यूं :** पदसिद्ध अपप्रचारक – **जयदेव डोळे** – ३८

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

# कभी न आना डायन

**पिशाच, चेटूक, डायन या साऱ्यांच्या सावल्या दिसाव्यात, असा सध्याचा मूलतत्त्ववाद आहे. तो विविध रूपांत, विविध धर्मांत पसरत चालला आहे. त्यासाठीच्या यंत्रणा शंभर वर्षांपासून काम करत आहेत. हिंदू किंवा मुस्लिमांमध्येच तो आहे, असे चटकन उत्तर देण्याचे काहीच कारण नाही. कारण तो वेगवेगळ्या नावांनी जगभर पसरला आहे. कधी तो राष्ट्रवादाच्या, कधी वंशवादाच्या, कधी रंगवादाच्या, कधी अर्थवादाच्या, कधी स्थलांतरितांच्या, कधी जातींच्या नावांनी आवाज काढतो.**

## संपादकीय

प्रसिद्ध कानडी कवी देवानुरू महादेव यांनी अगदी अलीकडेच आपल्या 'आरएसएस खोली आणि व्याप्ती' या पुस्तिकेत कर्नाटकातील एक दंतकथा दिली आहे. सध्याच्या मूलतत्त्ववादाने भरलेल्या परिस्थितीत तिचा विचार करणे आवश्यक ठरते. तिचा अर्थ समजावून घेणेही लाभदायक ठरते. अतिशय साधी-सोपी ही दंतकथा आहे. साठीच्या आसपास म्हैसूरमध्ये एका महिलेचे शेत एका धनदांडग्याने बळकावले. दुःखी महिला मरण पावली आणि नंतर भूत-पिशाच किंवा चेटूक बनून ती गावात फिरू लागली. रात्री-अपरात्री ती कुणाच्याही घरासमोर जायची आणि घरातील कोणाच्या तरी नावाने आवाज द्यायची. साद घालायची. घरातील माणसाला तो आवाज आपल्याच नातेवाइकांपैकी कुणाचा तरी आहे, असे वाटायचे. तिच्या आवाजाला प्रतिसाद देत, आलो आलो दरवाजा उघडतो, असे सांगत त्याने दरवाजा उघडला आणि तो बाहेर आला, की बाहेर कोणीच नसायचे; पण हा नाका-तोंडातून रक्त सांडायचा. रक्त ओकून तो तात्काळच जागच्या जागी मरायचा. अनेक कुटुंबांबाबत असे होऊ लागले. अनेक जण मरू लागले. हाकी देणाऱ्या किंवा साद घालणाऱ्या या कृतीला कुगुमारी असे नाव देण्यात आले. साद घालणारी दुसरी तिसरी कोणी नसून ती चेटकीण, डायन, भूत वगैरे आहे, असा अर्थ लोकांनी काढला. ही कुगुमारी म्हैसूरमधून कर्नाटकभर फिरू लागली. अगदी महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर बेळगावजवळ आली. लोक मरत होते. डायनच्या आवाजाला प्रतिसाद देत होते. रक्त ओकत होते. बरेच दिवस असे चालले आणि लोकांनी आपले प्राण वाचवण्यासाठी एक नामी युक्ती काढली. आपापल्या दारावर त्यांनी 'उद्या ये कुगुमारी', 'नाळे बा कुगुमारी' किंवा 'कल आना डायन' असे आपापल्या भाषेत लिहून ठेवले. नेहमीप्रमाणे कुगुमारी यायची. दरवाजासमोर थांबायची आणि 'उद्या ये' हे वाक्य वाचून माघारी निघायची. हेही कितीतरी दिवस असे चालले आणि एक दिवस डायन गायब झाली. अगदी अलीकडेच कर्नाटकातील राजकारणात तिला रूपकाच्या मदतीने बाहेर काढण्यात आले. भाजपमधील सी.टी. रवी यांना काँग्रेसवाले कुगुमारे म्हणू लागले, तर काँग्रेसच्या सिद्धरामय्यांना भाजपवाले कुगुमारे म्हणून लागले. जणू काही हे कुगुमारेची म्हणजे डायनची भूमिका करतात. एक दंतकथा राजकारणात टीकेसाठी वापरली जाऊ लागली. शेवटी ती देवानुरू यांच्या पुस्तिकेपर्यंत पोहोचली.


पिशाच, चेटूक, डायन या साऱ्यांच्या सावल्या दिसाव्यात, असा सध्याचा मूलतत्त्ववाद आहे. तो विविध रूपांत, विविध धर्मांत पसरत चालला आहे. त्यासाठीच्या यंत्रणा शंभर वर्षांपासून काम करत आहेत. हिंदू किंवा मुस्लिमांमध्येच तो आहे, असे चटकन उत्तर देण्याचे काहीच कारण नाही. कारण तो वेगवेगळ्या नावांनी जगभर पसरला आहे. कधी तो राष्ट्रवादाच्या, कधी वंशवादाच्या, कधी रंगवादाच्या, कधी अर्थवादाच्या, कधी स्थलांतरितांच्या, कधी जातींच्या नावांनी आवाज काढतो. कुगुमारी रात्रीच आवाज काढायची, हा नवा आवाज कधीही निघतो. कुणाच्याही घरासमोर निघतो. या आवाजाला तरुण पिढी खूप आवडते. तो तिला गंडेदोरे बांधतो, तिच्या डोक्यात खोटा धर्म, खोटा इतिहास भरतो. आपल्याच माणसाविरुद्ध तिला

लढायला शिकवतो. मूलतत्त्ववादात अडकलेल्यांमध्ये स्वाभाविकच तरुण पिढी अधिक आहे. तिच्याकडून काहीही करून घेतले जाते. अगदी जात पंचायती भरवण्यापासून, अल्पसंख्याकांवर हल्ले करण्यापासून ते पानसरे, कलबुर्गी, दाभोलकर आणि गौरीची हत्या करण्यापर्यंत बरेच काही करून घेतले जाते. देव, धर्म, देश, भूमिपुत्र, संस्कृती, इतिहास याचे भरपूर खाद्य मूलतत्त्ववादाला दिले जाते. जणू काही तो महाभारतातला बकासुर. रोज त्याला भोजनासाठी गाडीभर अन्न आणि गाडीवाला द्यावा लागतो. मूलतत्त्ववादाची भूक त्याही पुढे गेली आहे. त्याला पूजाअर्चा, मंत्र, देव, धर्म जसे लागतात, तशी सत्ताही लागते. एकदा का तो सत्तेवर पोहोचला, की तो स्वतःला हवा तसा समाज घडवू शकतो. आजकालचा मूलतत्त्ववाद नुसताच आवाज काढणारा नाही, तर तो मायावी रूपे धारण करणारा आहे. कधी आणि कोणते रूप तो धारण करेल, हे सांगत येत नाही.

स्वातंत्र्यानंतर आपल्या अनेक राष्ट्रपुरुष, तत्त्ववेत्ते आणि समाजसेवकांनी डायनला रोखण्यासाठी काही मार्गांचा अवलंब केला होता. राज्यघटना, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही, न्याय, सामाजिक न्याय, बंधुता आदी अनेक महान मूल्ये वापरून डायनचे फिरणे बंद केले होते. काळाच्या ओघात आणि राजकारणातील महामाऱ्यांमध्ये ही हत्यारे सैल, बोथट केली जात आहेत. जो धर्म घराबाहेर ठेवायचा होता तो घराघरांतच नव्हे, तर सत्तास्थानात नेला जात आहे. माणसांच्या मनात धर्मनिरपेक्षतेऐवजी धर्मवाद, राष्ट्रवाद पेटवला जात आहे. त्याच्या श्रद्धांना अशाच गोष्टींचे खतपाणी देऊन विचारी माणसाऐवजी श्रद्धावान माणूस तयार करण्याच्या प्रयोगशाळा ठिकठिकाणी सुरू केल्या जात आहेत. बेकारी संपवण्यासाठी नोकऱ्या देणारे कारखाने सुरू करण्याऐवजी धर्मस्थळांची संख्या वाढवली जात आहे. परिवर्तनाच्या विचारांचे पुनरुज्जीवन करण्याऐवजी माणूस आणि त्याचा समाज मागे नेणाऱ्या विचारांचे पुनरुज्जीवन केले जात आहे. डार्विनच्या सिद्धांताला खोटे ठरवत देवादिकांच्या तारखा शोधण्यात साऱ्या प्रतिभेला गुंतवण्यात येत आहे. श्रद्धाळू माणसे, धर्माळू माणसे, राष्ट्राळू माणसे कधी कोणत्या स्वरूपात व्यक्त होतील आणि कधी कोणत्या कारणासाठी स्फोट होईल, हे सांगता येणेही कठीण आहे. अराजकसदृश स्थितीला सातत्याने प्रोत्साहन देण्याचे आणि प्रतिक्रांतिला निमंत्रण देण्याचे काम जगभरातील मूलतत्त्ववाद करतो आहे. पूर्वीचे लोक घराच्या दरवाजावर तर काही काही लिहायचे; पण नव्या जगात बेघरांची संख्या जास्त आहे. त्यांनी दरवाजा कोठून आणायचा? माणसांच्या घरांऐवजी देवांच्या घरांची संख्या वाढते आहे, त्यांच्याच घरांचा जीर्णोद्धार, त्यांच्यासाठीच्याच नव्या घरांची निर्मिती सुरू आहे. याच कारणासाठी अनेकदा रक्त सांडण्याचे प्रकार घडत आहेत. तुझी जात कोणती, तुझा धर्म कोणता आणि तुझा वंश कोणता, या प्रश्नांना खूपच महत्त्व आल्याने अनेक जण आपल्या कपाळावर प्रतीके घेऊन फिरत आहेत. काळ मोठा कठीण आणि पोट पाठीला लावून फिरणाऱ्या माणसाची सुरक्षा कशी करायची, हा प्रश्न घेऊन हा काळ आला आहे. कोणाच्या बाजूने उभे राहायचे, मुळांकडे चला म्हणणाऱ्यांच्या बाजूने की डौलदार झाडांच्या फांद्या-फळांकडे चला म्हणणाऱ्यांच्या बाजूने, धारदार दातांच्या, नखे फुटलेल्या, जबडा पसरलेल्या मूलतत्त्ववादाच्या भूलभुलैयाला भुलायचे, की माणसांचाच संकोच करणाऱ्या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करायचा? असा प्रश्न काही पहिल्यांदाच निर्माण होत नाही. क्रांती-प्रतिक्रांती, मूलतत्त्ववाद आणि परिवर्तनवाद यांच्यातील द्वंद्व इतिहासाने अनेकदा पाहिले आहे. अनेकदा प्रतिक्रांती लादली जाते. हे नवे लादलेपण समजून घ्यायला हवे आणि त्यातून मुक्त व्हायला हवे. माणूस तसा मुक्तही होत आला आहे. माणसाला पुढे जायचे असते आणि मूलतत्त्ववाद त्याला मागे, आणखी मागे, अगदी अंधाराने भरलेल्या गुहेत घेऊन जात असतो. मीच उजेड आहे, असा दावा अंधारच करत असतो. हेच खरे जग आहे, असा दावाही अंधारच करत असतो. हा सारा लादलेला खेळ संपवायचा असेल, तर आपल्या घरातील लोक पळवून नेणाऱ्या टोळ्या ज्या डायनच्या, कुगुमारेच्या रूपांत तयार झाल्या आहेत, त्यांना रोखण्यासाठी आता 'उद्या ये' एवढेच लिहून चालणार नाही. कारण चक्रावून टाकणारी, चकवा देणारी शब्दयोजना डायनला कळून चुकलेली आहे. ती रोज येत राहणार आहे. तिला थांबवायचे असेल, तर 'कभी न आना डायन' हे नव्याने लिहिले पाहिजे.

●●●

# मूलतत्त्ववाद आणि त्याचे विविध चेहरे





अनंत बागाईतकर

**मूलतत्त्ववादाच्या अनेक आविष्कारांपैकी एक असलेल्या सांप्रदायिकतेच्या आविष्काराने सध्या धुमाकूळ घातलेला आहे. त्याचा मुख्य आधार बहुसंख्याकवाद हा आहे. किंबहुना भारताची वाटचाल बहुसंख्याक एकाधिकारशाहीकडे वेगाने चालू आहे, असे म्हटले, तर ते वावगे ठरू नये. फाळणी होऊन या देशाला स्वातंत्र्य मिळाले. त्याच्या जखमा अद्याप पूर्णपणे बुजलेल्या नाहीत आणि राजकारण व राजकारणी त्या बुजू देत नाहीत.**

मूलतत्त्ववाद! मूळ इंग्रजीतील 'फंडामेंटॅलिझम' या संज्ञेचे हे मराठी रूपांतर किंवा अनुवादित रूप आहे. ही संज्ञा धर्माशी निगडित आहे. जो धर्मग्रंथ ज्या धर्माच्या मुळाशी मानला जातो. उदाहरणार्थ बायबल, कुराण, ग्रंथसाहेब इ. त्या धर्मग्रंथात मनुष्याच्या ज्या जीवनशैलीचे किंवा जीवनपध्दतीचे वर्णन केलेले असते आणि त्यासाठीचे विशिष्ट असे मूलभूत नियम सांगितलेले असतात, त्याचेच अनुसरण अर्वाचीन जीवन पद्धतीत करणे अशी सर्वसामान्य भाषेत मूलतत्त्ववादाची व्याख्या केली जाते.

आणखी सरळ व सुटसुटीत भाषेत सांगायचे झाल्यास आज एकविसाव्या शतकात जीवन जगत असताना या प्राचीन काळातील (आणि कदाचित त्या काळाशी सुसंगत असू शकणाऱ्या) धर्मग्रंथांमध्ये समाविष्ट जीवनतत्त्वांचे आणि प्रथा-परंपरांचे अनुसरण करणे होय. ही बाब किती प्रमाणात काळाशी म्हणजेच वर्तमानाशी सुसंगत आहे हे ज्याने-त्याने ठरवायचा भाग आहे; परंतु विज्ञान, तंत्रज्ञानाने मानवी जीवनात केलेल्या बदलाचा खुल्या मनाने स्वीकार न करता पोथीनिष्ठा अंतिम मानून त्यामध्ये सांगितलेल्या नियमांचेच अनुसरण करायचे हे काळविसंगत आहे. यालाच सनातनीपणा असेही म्हटले जाते. आधुनिक काळात वावरायचे; पण कालबाह्य झालेल्या प्रथा-परंपरा, चाली-रीतींचे पालन करायचे, याला मूलतत्त्ववाद म्हणतात.

**मुळात 'हिंदू' असा कोणता धर्म नाही**

आता वर ज्या धर्मग्रंथांचा उल्लेख केला त्यामध्ये हिंदू समाजाच्या धर्मग्रंथाचा उल्लेख नाही. याचे कारण मुळात हिंदू असा कोणता धर्म नाही. काही संशोधक त्याला सनातन धर्म असे म्हणतात; परंतु या सनातन धर्माचा सुद्धा कोणताही एक मूलभूत, आधारभूत असा धर्मग्रंथ नाही. त्यामुळे कोणत्या धर्मग्रंथात किंवा संहितेत हिंदू जीवनशैलीच्या नियमांचा समावेश आहे, असे ठामपणे सांगता येणार नाही. 'मनुस्मृती' या ग्रंथाचे नाव काही जण घेतील. त्यामध्ये धर्मापेक्षा जातीला प्राधान्य दिलेले आहे, हेही येथे नमूद करावे लागेल. वेदांचे महत्त्व हिंदू समाजात मान्यताप्राप्त असले तरी त्यात कोणत्याही विशिष्ट धर्माचा उल्लेख नाही. मूलतः निसर्ग हा सर्वोच्च आविष्कारी असल्याचे मान्य करून त्याची महती त्यामध्ये आहे. अर्थात, हिंदू समाजातील मूलतत्त्ववादाचा उगम हा कर्मकांडातून आलेला आहे आणि मूलतः हे कर्मकांड हे विविध पुराणांच्या माध्यमातून तयार झालेले आहे. थोडक्यात, मूलतत्त्ववादाच्या संज्ञेची वरीलप्रमाणे स्पष्टीकरणे देता येईल. 'फंडामेंटॅलिस्ट' ही संज्ञा १९२० च्या सुमारास प्रथम उल्लेखित झाली. अमेरिकेत उदयास आलेल्या प्रोटेस्टंट चर्चच्या एका गटाला उद्देशून ही संज्ञा वापरण्यात आली होती. मुख्य प्रवाहातील ख्रिश्चन समाजाला ही संज्ञा निंदाव्यंजक वाटत असे. कारण बायबलचा शब्दशः अर्थ घेऊन त्या गोष्टी अमलात आणण्याचा जो प्रयत्न केला जात होता, त्यांच्यासाठी ही संज्ञा काहीशी ढिली किंवा सरसकट प्रकारे वापरली जात होती व त्यामुळे त्यास विरोध होत होता. ब्रिटानिका विश्वकोषानेदेखील या संज्ञेची व्याख्या करताना पवित्र अशा धर्मग्रंथांचा शब्दशः अर्थ लावून त्या संज्ञा प्रचलित करणारा धर्मशास्त्रीय गट किंवा समाज, असे


म्हटले असून, त्यांच्या दृष्टीने धर्मग्रंथातील प्रत्येक गोष्ट ही अंतिम सत्य मानली जाऊन तिची काटेकोर अंमलबजावणी करणे आणि त्यासंदर्भातील लोकांच्या श्रध्दा व कर्म यावरही त्यांचेच आधिपत्य मानण्यात येते, असेही म्हटलेले आहे. या सर्व व्याख्या लक्षात घेता या वर्गाला विरोध करणारे या मूलतत्त्ववाद्यांना स्थितिवादी, प्रतिगामी, पुराणमतवादी अशा संज्ञा वापरतात आणि टीकाही करीत असतात. मूलतत्त्ववाद आणि कट्टरता, धर्मांधता, दहशतवाद, हिंसा, अंधभक्ती व अंधश्रध्दा या अत्यंत प्रतिगामी अशा संकल्पना परस्परांशी कशा निगडित आहेत, हे वरील व्याख्यांवरुन लक्षात येते. किंबहुना या गोष्टी एकाच नाण्याच्या विविध बाजू असल्याचेच स्पष्ट होते.

**मूलतत्त्ववादाची अनेक रूपे**

मूलतत्त्ववादाची अनेक रूपे आहेत. तो अनेक स्वरूपात समाजात अवतीर्ण होत असतो. भारताची फाळणी धर्माधारित द्विराष्ट्रवादावर झाली. या फाळणीला मुस्लीम लीग व त्या पक्षाचे नेते मुहम्मद अली जिन्हा हे कारणीभूत ठरल्याची सर्वसामान्य भावना आहे व ती टिकून आहे; परंतु जिन्हा यांच्या बरोबरीनेच द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताची मांडणी हिंदू नेत्यांनी केलेली होती, हे सोयीस्करपणे विसरले जाते. अर्थात, त्या वादात जाण्याचा हा विषय नाही; परंतु हा पूर्वग्रह, अढी भारतीयांच्या मनात कायम राहिली आणि त्यातून मुस्लिमांकडे कायम संशयाने पाहण्याची वृत्ती फोफावत गेली. स्वातंत्र्यानंतर लगेचच सत्तेत आलेल्या राज्यकर्त्यांनी हा धोका ओळखला होता आणि भारतात सामाजिक सलोखा, शांतता व सौहार्द राखण्यासाठी त्यांनी धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाबरोबरच 'एकतेत विविधता' हे तत्त्व अंगीकारले आणि समाजमनावर ते बिंबविण्याचे प्रयत्न केले. तरीही त्यांचे प्रयत्न कमी पडले, असेच म्हणावे लागते. कारण विविध कारणांमुळे काही विशिष्ट राजकीय पक्षांनी धर्माधारित राजकारण चालू ठेवले. त्यासाठी त्यांनी बहुसंख्याक वर्चस्ववादाच्या सिद्धांताचा प्रचार करून राजकीय सत्ताप्राप्ती यशस्वीपणे केली आहे. यामुळे अल्पसंख्याक समाजाला दुय्यम दर्जा व स्थान, भेदभावाची वागणूक देण्याचे प्रकार उघडपणे सुरू झालेले आढळतात. राजकीय सत्तेचे पाठबळ प्राप्त झाल्याने त्यामध्ये विधिनिषेधशून्यता आणि कोडगेपणा वाढत चालला आहे. हा संदर्भ देण्याचे कारण एवढेच, की सांप्रदायिकता (कम्युनॅलिझम) हादेखील मूलतत्त्ववादाशीच निगडित एक महत्त्वाचा घटक आहे. त्याची दखल बरोबरीनेच घ्यावी लागणार आहे. राजधानी दिल्लीत राहताना याची जाणीव पदोपदी झाल्याखेरीज राहत नाही. ख्रिश्चन, जैन, बौद्ध, इस्लाम, यहुदी किंवा ज्यू या धर्मांत एकेश्वरवाद आणि एकच आधारभूत धर्मग्रंथ मानला जात असल्याने त्यांचे आकलन तुलनेने सुलभ आहे; परंतु ज्या समाजाचे कोट्यवधी देव, देवता आणि धर्मग्रंथ आहेत, त्या समाजातील धर्मांधता, कट्टरता यांचे आकलन विविध पातळ्यांवरून करावे लागते. ते सहजसुलभ नाही.

**अल्पसंख्याक विरोध खोलवर रुजलेला**

फाळणीनंतर आलेल्या निर्वासितांना दिल्लीत ठिकठिकाणी वसविण्यात आले. अशा अनेक वसाहती दिल्लीच्या पश्चिम भागात, तसेच उत्तर-पूर्व म्हणजे ईशान्य भागात आहेत. हे भाग यमुना नदीच्या अलीकडच्या तीरावरील होते; परंतु लोकसंख्या वाढत गेली त्यानुसार यमुना नदीच्या पलीकडच्या तीरावरही वस्त्या वसणे सुरू झाले. दिल्लीतील खरी फ्लॅट संस्कृती या पूर्व दिल्लीतून सुरू झाली. या पूर्व दिल्लीत सहकारी गृहनिर्माण सोसायट्या स्थापन झाल्या. त्यांना स्वस्तात भूखंड मिळाले आणि आता तेथे टोलेजंग सोसायट्या उभारल्या गेल्या आहेत. ही गेल्या चाळीस वर्षांतील प्रगती आहे. याठिकाणी निर्वासितांची पुढची पिढी राहण्यास आली. या सोसायट्या उभारल्या गेल्या खऱ्या; परंतु वर्चस्ववादी बहुसंख्याकवादाच्या खुणा व चिन्हे धारण करीत त्या उभ्या राहिल्या. या जवळपास प्रत्येक सोसायटीत मंदिरांची उभारणी करण्यात आली आहे. २०१४ नंतर या मंदिरांमध्ये पूजाविधिबरोबरच दररोज शंखनाद करण्यात येऊ लागला आहे. अतिशय निरुपद्रवी किंवा क्षुल्लक असे उदाहरण असले, तरी




त्यातून प्रतिबिंबित होणाऱ्या मनोवृत्तीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. या सोसायट्यांमध्ये एकधर्मीयांचे वर्चस्व आहे. अल्पसंख्याक समाजाचे एखाददुसरेच घर येथे पाहण्यास मिळते आणि आता तर दिल्लीतच नव्हे, तर मोठ्या शहरांमध्येही अशी स्थिती आहे, की अल्पसंख्याक व विशेषतः मुस्लीम कुटुंबीयांना घरे भाड्याने किंवा विकतही न देण्याचे प्रकार वाढताना दिसतात. खुद्द पुण्यामध्ये हे प्रकार घडताना दिसतात. पूर्व दिल्लीतील एका सोसायटीने वि.दा. सावरकरांचेच नाव धारण केलेले आहे. एवढा अल्पसंख्याक विरोध खोलवर रुजलेला आढळतो.

**ख्रिस्ती धर्मातील दोन पंथांमधील संघर्ष**

याठिकाणी ब्रिटनमधील एक आठवण जरूर सांगावीशी वाटते. ब्रिटनला लागूनच आयर्लंड आहे. त्यातील नॉर्दर्न आयर्लंड हा भाग ब्रिटिश आधिपत्याखाली आहे. उर्वरित आयर्लंड हा स्वतंत्र देश

असून, आयरिश रिपब्लिक म्हणून तो ओळखला जातो. अलीकडेच तेथे भारतीय वंशाचे पंतप्रधान झाले होते; परंतु नॉर्दर्न आयर्लंडने ब्रिटिश आधिपत्याचे जोखड दूर करण्यासाठी आणि उर्वरित आयर्लंडमध्ये समाविष्ट होण्यासाठी दीर्घकाळ लढा दिला. अगदी सशस्त्र लढाही दिला. 'आयआरए'-'आयरिश रिपब्लिकन आर्मी' या नावाच्या संघटनेने सशस्त्र लढा दिला होता. याची धार्मिक बाजूही तेवढीच महत्त्वाची होती. आयर्लंड हा देश आणि नॉर्दर्न आयर्लंड हा ब्रिटिश प्रांत हा कॅथॉलिक बहुसंख्याक आहे. हे अतिशय कट्टर असे कॅथॉलिक आहेत. प्रोटेस्टंट हा ख्रिस्ती धर्माचा दुसरा संप्रदाय आहे; परंतु त्यांच्याशी त्यांना जुळवून घेणे अवघड जाते. नॉर्दर्न आयर्लंड प्रांताची राजधानी बेलफास्ट आहे. सशस्त्र उठाव व हिंसेने हा प्रदेश अनेक वर्षे ग्रस्त, अस्वस्थ व अशांत राहिला होता. तेथेही ब्रिटिशांनी केंद्रीय शासनाची राजवट चालू ठेवली होती. या प्रांतात कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंट यांच्यात सामंजस्य निर्माण करण्याच्या दृष्टीने ब्रिटिश सरकारने बेलफास्टमध्ये मिश्र वसाहती स्थापन करण्याची योजना हाती घेतली. एका इमारतीत समोरासमोरची घरे कॅथॉलिक व प्रोटेस्टंट पंथीयांना देऊ केली. प्रत्यक्षात काय घडले? ज्या इमरातीत प्रथम कॅथॉलिकांनी घरे ताब्यात घेतली त्या इमरातीत प्रोटेस्टंटांसाठी राखून ठेवलेले एकही घर कुणी घेतले नाही व ती रिकामीच राहिली, तर ज्या इमारतीत प्रोटेस्टंटांनी आधी घरे ताब्यात घेतली तेथे कॅथॉलिकांची घरे रिकामी राहिली. हा प्रकार प्रत्यक्ष डोळ्याने पाहिल्यावर मन सुन्न झाले होते. धर्मभावनेचा अतिरेक मनुष्याचा विवेक व सदसद्विवेकबुध्दी एवढी भ्रष्ट करू शकतो? ही तर भिन्नधर्मीय मंडळी नव्हती. एकाच ख्रिस्ती धर्मातील दोन पंथांमधील हा संघर्ष होता आणि आजही आहे. कॅथॉलिक पंथीय समाज हा बायबल किंवा ख्रिस्ती धर्मग्रंथांच्या शब्दशः पालनावर व सामूहिक उपासनेवर भर देणारा आहे. या सनातनी पगड्याविरोधातच प्रोटेस्टंट पंथाचा उगम झाला, हेही येथे लक्षात ठेवावे लागेल. हा प्रसंग १९८८ मधील आहे. त्याला ३४ वर्षे झाली. कदाचित आता परिस्थिती बदलली असेल, अशी आशा करूयात; परंतु एकेकाळी हा मूलतत्त्ववादी पगडा कसा पक्का होता, यासाठीचे हे उदाहरण दिले. भारतात शैव व वैष्णव पंथीयांमध्येही ही वर्चस्वाची लढाई होती व त्याचे दाखले भारतीय पुराणांमध्ये सापडतात. त्यामुळेच दिल्लीतील सोसायट्यांमध्ये वेगवेगळ्या देव-देवतांची मंदिरे आढळतात. त्यांचे पूजापाठ, उत्सव नियमित चालू राहतात; परंतु अशा सोसायट्यांमध्ये इतर धर्मीयांना त्यांच्या पूजा-अर्चनेसाठी काही सोयी करून देण्याची सद्बुध्दी लोकांना का होत नाही, हा प्रश्न आहे.

**हाही मूलतत्त्ववादाचा एक आविष्कारच...**

मूलतत्त्ववादाचा प्रभाव भल्याभल्यांच्या मनात सुप्तपणे दडलेला असतो. विशिष्ट प्रसंगात तो प्रकट होत राहतो. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी हिंदू वैयक्तिक कायद्याचे संहितीकरण करून या देशाला आदर्श असा समान नागरी कायद्यासाठीचा आधार सादर करण्याचा प्रयत्न केला होता. या देशातील बहुसंख्याक समाजाने आदर्श घालून दिला, तर त्याचे अनुसरण अन्य अल्पसंख्याक करतील, अशी त्यांची त्यामागील भूमिका होती. १९४८ मध्ये घटना परिषदेला 'हिंदू कोड बिल' या शीर्षकाने हे सुधारणावादी विधेयक सादर करण्यात आले आणि एकच गदारोळ झाला. वाद एवढा वाढला, की त्या विधेयकाचे तीन वेगवेगळ्या विधेयकांमध्ये विभाजन करण्यात आले आणि मोठ्या



प्रमाणात सौम्य स्वरूपात ती विधेयके १९५२ ते ५७ या पहिल्या लोकसभेपुढे सादर करण्यात आली. खुद्द राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी यासंदर्भात प्रतिकूलता दाखवली होती. अशी सुधारणावादी विधेयके सादर करण्यात घाई होत आहे. समाजातून तशी मागणी येऊ द्या किंवा काँग्रेसच्या जाहीरनाम्यात त्याचा समावेश करून प्रथम त्यावर व्यापक सार्वजनिक चर्चा होऊ द्यावी, असे त्यांचे मत होते. हिंदू महासभेचे नेते व लोकसभा सदस्य एन.सी. चटर्जी, श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी तर जाहीर विरोध केलेलाच होता. याखेरीज त्या काळातील एक प्रभावी धार्मिक नेते स्वामी करपात्री यांनी तर त्याविरोधात मोहीमच सुरू केली होती. हिंदूंच्या मूलभूत अधिकारात हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही, वगैरे प्रचार त्यांनी सुरू केला होता. हिंदूंच्या व्यक्तिगत कायद्याला धक्का लावण्यापूर्वी मुस्लिमांच्या व्यक्तिगत कायद्याबद्दल विचार का नाही केला, असे भावनाभडकाऊ युक्तिवाद सुरू झाले होते. नेहरूंनी हिंदू समाजात महिलांना पुरुषांच्या बरोबरीने मालमत्ता, संपत्तीमध्ये समान अधिकार देण्याचा आग्रह धरलेला होता. बहुपत्नीकत्वाला बंदी घातलेली होती. आज या सुधारणांना विरोध झाल्याचे ऐकून आश्चर्य वाटेल; पण हे प्रत्यक्षात घडले होते. याठिकाणीही महिलेला दुय्यम, कनिष्ठ आणि हिणकस सामाजिक दर्जा देण्याची रूढीवादी, बुरसटलेली, पुराणमतवादी भूमिका घेणारा वर्ग मोठा होता. मूलतत्त्ववादाचा हाही एक आविष्कारच होता.

**...तेव्हाही प्रचारकी टोळ्या अस्तित्वात होत्या**

मूलतत्त्ववादाच्या अनेक आविष्कारांपैकी एक असलेल्या सांप्रदायिकतेच्या आविष्काराने सध्या धुमाकूळ घातलेला आहे. त्याचा मुख्य आधार बहुसंख्याकवाद हा आहे. किंबहुना भारताची वाटचाल बहुसंख्याक एकाधिकारशाहीकडे वेगाने चालू आहे, असे म्हटले, तर ते वावगे ठरू नये. फाळणी होऊन या देशाला स्वातंत्र्य मिळाले. त्याच्या जखमा अद्याप पूर्णपणे बुजलेल्या नाहीत आणि राजकारण व राजकारणी त्या बुजू देत नाहीत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मुस्लीम अल्पसंख्याक समाजाबद्दलचा राग बहुसंख्याक समाजाच्या मनात होता. आपले सामाजिक वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी विविध प्रतीकांचा आधार घेण्यास सुरुवात केली. 'गोमाता म्हणजे गाय' हे त्यातले एक प्रमुख प्रतीक. १९६६ मधील ही घटना आहे. स्वामी करपात्री आणि लोकसभेतील एक सदस्य स्वामी रामेश्वरानंद यांनी पुढाकार घेऊन देशात संपूर्ण गोहत्याबंदी कायद्यासाठी मोहीम सुरू केली होती. त्यासाठी त्यांनी 'सर्वदलीय गोरक्षा महाभियान समिती' स्थापन केली होती. यास नागा साधू, विविध हिंदू धर्मी आखाडे व हिंदू संघटनांनी व मुख्य म्हणजे रा.स्व. संघाने पाठिंबा जाहीर केलेलाच होता; पण भाजपचा पूर्व अवतार किंवा मूळ अवतार असलेल्या भारतीय जनसंघानेही या मोहिमेला जाहीर पाठिंबा दिला होता. पुढील काळात हिंदू धर्मसंघटनांनी सुरू केलेल्या रामजन्ममंदिर मोहिमेतही रा.स्व. संघ आणि भाजपने अशीच उडी घेऊन त्याद्वारे केंद्रात सत्ताप्राप्तीचे स्वप्न साकार केले. त्यामुळे इतरांनी सुरू केलेल्या मोहिमांमध्ये प्रवेश करायचा आणि त्याचा राजकीय लाभ उठवायचा, ही संघ परिवाराची जुनी सवय आहे, हे येथे लक्षात येऊ शकेल, तर नोव्हेंबर-१९६६ मध्ये या साधूंनी व हिंदू संघटनांनी संपूर्ण गोरक्षण आणि गोहत्याबंदी यासाठी संसदेवर धडक मोर्चाचे आयोजन केले. सुमारे एक लाखाचा जमाव जमविण्यात आला होता. यामध्ये नागा साधू व इतरही विविध आखाड्यांचे साधू सामील झाले होते. असंख्य साधू त्रिशुळासारख्या हत्यारांसकट आले होते. या जमावाने संसदगृहाच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहोचण्यात यश मिळवले. पोलिसांनी बळाचा वापर न करता समजावणीची भूमिका घेतली होती व त्यामुळेच त्याचा गैरफायदा घेत ही मंडळी संसदगृहाच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहोचू शकली होती. येथे पोहोचल्यावर मात्र पोलिसांनी त्यांना संसदगृहात प्रवेश करण्यापासून रोखण्यास सुरुवात केली; परंतु साधूंनी भिंतीवर चढून आत जाण्याचे प्रयत्न सुरू केले. जमाव अनावर झाला होता. लाठीमार, अश्रुधूर आणि सरतेशेवटी गोळीबार करण्याखेरीज पोलिसांना पर्याय राहिला नव्हता. चिडलेल्या जमावातील साधूंनी पोलिसांवर त्रिशुळांनी हल्ला केला. पेटत्या चिलमी फेकल्या. यामध्ये पोलीसही जायबंदी झाले होते. अखेर गोळीबार करून हा जमाव मागे रेटण्यात आला. यामध्ये आठ साधू मरण पावले. तेव्हाही प्रचारकी टोळ्या अस्तित्वात होत्या. त्यांनी शेकडो साधू गोळीबारात मरण पावल्याचा अपप्रचार सुरू केला; परंतु माध्यमांनी हा अपप्रचार मोडून काढला, ही त्यातली जमेची बाजू मानावी लागेल. सध्या अनेक माध्यमसंस्थांचे स्वरूप सरकार व सत्तारूढ पक्ष उपकृत व पुरस्कृत झालेले आहे. त्यामुळे निःपक्ष वार्तांकनही या संकटाचे बळी ठरले आहे.

**गोरक्षकांना कायद्याचे भय नाही**

गाय या प्रतीकाचीही चर्चा केली. गाय हे प्रतीक आजही मूलतत्त्ववादी कट्टरपंथीयतेशी निगडित आहे. १९६६ म्हणजे विसाव्या शतकाच्या समाप्तीसाठी ३४ वर्षे उरलेली असताना आणि आता एकविसाव्या शतकाची एक-चतुर्थांश वर्षे पूर्ण होण्याच्या मार्गावर असतानाही गायीचे निमित्त करून अल्पसंख्याक समाजाला लक्ष्य करण्याचे प्रकार सुरू आहेत. वर्तमान राजवटीने हे प्रतीक पुन्हा राजकारणासाठी वापरण्यास सुरुवात केली. त्यांच्या दुर्दैवाने ज्या ईशान्य भारतात त्यांना पाय रोवायचे होते तेथील समाजात बीफ किंवा गोवंशीय सामिष पदार्थांचा आहारात समावेश आहे. राजकीयदृष्ट्या हे महागात पडेल, असे दिसल्यावर सरकारी पातळीवरून मौन पाळण्यात आले; परंतु उत्तर भारतात मात्र गोरक्षणाच्या नावाखाली गोरक्षकांनी कायदा हातात घेऊन धिंगाणा घातला. त्यात अनेक मुस्लिमांना प्राण गमवावा लागला. मेलेल्यांना न्याय देणे आणि गुन्हेगारांना सजा देण्याऐवजी त्यांचा सत्कार करून त्यांना मोकळे सोडण्यात आले आहे. हे गोरक्षक स्वयंघोषित आहेत. त्यांना कायद्याचे भय नाही. कारण राज्यकर्त्यांचे अदृश्य पाठबळ त्यांना प्राप्त आहे. आता तर पुढे आलेल्या माहितीनुसार आणि काही शोध-पत्रकारांनी गोळा केलेल्या माहितीनुसार आता या स्वयंघोषित गोरक्षक टोळ्यांनी धंदा सुरू केला आहे. अभयदानाच्या बदल्यात बक्कळ मोबदला कमावण्यास त्यांनी सुरुवात केल्याची माहिती या शोध-पत्रकारितेतून उजेडात आली आहे. हे किंचित विषयांतर झाले; परंतु मूलतत्त्ववादी मंडळी कशा रीतीने आपले काम करीत असतात याचा हा एक नमुना आहे.



**धर्मगुरूंनी 'स्वर्गाचे पास' विकायला सुरुवात केली होती**

येथे पाकिस्तान दौऱ्यातील अनुभवाची आठवण येते. दहशतवाद्यांचा म्होरक्या आणि प्रेरणास्थान असलेल्या हफीज सईद



याने दहशतवादी कारवायांसाठी पैसा जमविण्यासाठी काढलेली ही शक्कल! लष्करे तय्यबा किंवा जैश-इ-मुहम्मद या संघटनांशी तो संबंधित आहे; पण अधिकृतपणे नाही. त्याने स्वतःची अशी एक सामाजिक कार्य करणारी संस्था-संघटना स्थापन केलेली आहे. 'जमात उद् दावा' असे या समाजसेवी संघटनेचे नाव आहे. भारतातही अनेक नावे-रूपे घेऊन वावरणाऱ्या मूलतत्त्ववादी संघटना अस्तित्वात आहेत. त्यामुळे हफीज सईदची ही संघटनादेखील शाळांना मदत करते, स्वस्त आरोग्यसेवा चालवते आणि समाजात त्यांनी स्वतःबद्दल एक चांगली प्रतिमाही निर्माण केली आहे; पण प्रत्यक्षात ते जे धन कमावतात त्याचा उपयोग दहशतवाद्यांच्या प्रशिक्षणापासून त्यांना पोसण्यासाठी व त्यांना प्रोत्साहित करण्यापर्यंत केला जातो. लाहोरमध्ये व इतरत्रही फिरताना ठिकठिकाणी यांचे फलक लावलेले आढळतात. यामध्ये कुर्बानीसाठी ज्या पशूंना उपयोगात आणले जाते त्याच्या किमती किंवा दर असतात आणि या संघटनेच्या माध्यमातून ते खरेदी करण्याचे आवाहन केलेले असते. अगदी बकरी-बोकडापासून उंटापर्यंतच्या पशूंचे दर असतात. त्याचबरोबर त्यामध्ये एक सूचनाही असते, की या पशूंचे मांस काढल्यानंतर जे कातडे किंवा चामडी असते ती कचऱ्यात न टाकता संघटनेच्या कार्यकर्त्यांना द्या. या चामड्यातून तेथे वस्तू तयार केल्या जातात. त्यासाठी त्या कारागिरांना पैसेही दिले जातात. त्या वस्तूंच्या विक्रीतूनही संघटनेला पैसे मिळतात. एक प्रकारे मूलतत्त्ववाद-कट्टरता-दहशतवादाचे हे अर्थकारणही मानावे लागेल. कारण हे सर्व धर्माच्या नावाने केले जाते. एकेकाळी म्हणजेच युरोपातही धार्मिक अंधश्रद्धेचा पगडा असताना तेथे धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धाळूंची लुटमार केली जात असे. धर्मगुरूंनी 'स्वर्गाचे पास' विकायला सुरुवात केली होती. या कालखंडाला युरोपातील अंधकारयुग मानले जाते. या काळात ज्यांनी विवेकाचा आवाज उठवला त्या सर्वांना शारीरिक-मानसिक छळाला तोंड द्यावे लागले, तुरुंगवास आणि प्रसंगी जाळून-फाशी देऊन मारण्यापर्यंत या धर्मांधांची मजल गेलेली होती. यातून गॅलिलिओसारखा संशोधकही सुटला नाही. धर्म, धर्मसत्तेचे वर्चस्व टिकविण्यासाठी कर्मकांडाची उत्पत्ती झाली आणि ती खरी मूलतत्त्ववादाची सुरुवात म्हणता येईल. यामध्ये धर्मगुरू किंवा पुरोहितवर्गाची भूमिका ही मोठी राहिलेली आहे. एकेकाळी राजसत्तेवरदेखील धर्मसत्तेचे वर्चस्व निर्माण करण्यात आले होते. कालांतराने बहुधार्मिकता व्यापक झाल्यानंतर राजसत्तेपासून धर्मसत्ता वेगळी करण्याची प्रक्रिया सुरू झाली. मात्र, यातूनच बहुसंख्याक वर्चस्ववादाचा उगम झाला, या वास्तवाचे भानही राखायला हवे.

**जातींची उतरंड आजही कायम**

भारतातील मूलतत्त्ववादाला केवळ धार्मिक स्वरूप नाही. त्यात जातींच्या घटकाचाही समावेश होतो. उत्तर भारतात जातींची उतरंड आजही कायम आहे. जाट समाज हा लढवय्या किंवा लढाऊ वंश (मार्शल रेस) मानला जातो. या समाजाने भारताला अनेक योध्दे दिले. राजस्थान, हरयाणा, पंजाब, पश्चिमी उत्तर प्रदेश येथे या समाजाचे बाहुल्य किंवा प्राबल्य आहे; पण वर्णव्यवस्थेत क्षत्रियत्वाचे स्थान मिळालेल्या राजपूत समाजाने जाट समाजाला त्यांचे उचित स्थान दिले नाही किंवा त्यांना समानतेची वागणूकही दिली नाही. जाटांचे दुय्यम स्थान अधोरेखित करण्यासाठी त्यांना घोड्यावर बसण्याचा हक्क नाकारण्यात आला. अगदी अलीकडच्या काळापर्यंत जाट नवरदेवाला घोड्यावर बसून वधूकडे जाण्यास प्रतिबंध-मनाई होती. दूरस्थ गावांमध्ये आजही ही प्रथा अस्तित्वात आहे. एखाद्या जाट तरुणाने बंडखोरी करून घोड्यावरून जाण्याचा प्रयत्न केल्यास त्याला मारहाण करण्यापासून जीव घेण्यापर्यंतचे प्रसंग राजस्थानमध्ये अगदी एक-दोन वर्षांपूर्वीपर्यंत नोंदवलेले आहेत. सुदैवाने व्यवस्थेत झालेल्या बदलामुळे किमान अशा घटनांची दखल तरी घेतली जाऊ लागली आहे; परंतु 'मनुस्मृती'तून आलेला जातीनिष्ठ किंवा जातींवर आधारित मूलतत्त्ववाद हा आजही कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अस्तित्वात आहे. ज्या जाट समाजाने वर्षानुवर्षे राजपूत समाजाकडून होणारा अन्याय सहन केला तो खुद्द जाट समाज कसा आहे? या समाजातही जातिप्रथा अतिशय कट्टरपणे पाळली जाते. आज एकविसाव्या शतकातदेखील या समाजाच्या चालीरीती व

रूढीपालनाबाबतचे निर्णय त्यांच्या 'खाप पंचायती'मार्फत होतात. खाप पंचायतीचा निर्णय अंतिम मानला जातो. समाजातील अंतर्गत बाबींचे निर्णय कोर्टात न जाता खाप पंचायतींमध्ये केले जातात. तेथेदेखील कनिष्ठ व वरिष्ठस्तरीय खाप पंचायतींचे अस्तित्व आहे. म्हणजेच भारतीय न्यायव्यवस्थेला समांतर अशी ही व्यवस्था आहे. ती आजही बिनबोभाट चालू आहे. जाट समाजातील मुलीने अन्य समाजाच्या मुलाबरोबर प्रेम करणे आणि विवाह करणे हे या समाजाला खपत नाही. विशेषतः ते ज्या जातींना स्वतःपेक्षा हिणकस व कनिष्ठ मानतात त्या जातीच्या मुलांबरोबर प्रेमसंबंध किंवा विवाह करणे हा तर महाअपराध मानला जातो आणि त्यातून तो कनिष्ठ जातीतील मुलगा आणि प्रसंगी ती जाट मुलगी यांच्या हत्या करण्यापर्यंत या समाजाची मजल जाते. हे प्रकार अगदी अलीकडेपर्यंत चालू राहिले.



**खाप पंचायतींचे वर्चस्व आजही कायम आहे**

माध्यमांमध्ये याचा गाजावाजा झाल्यानंतर त्याला आळा घालण्याचे उपाय करण्यात आले. मात्र, आजही या समाजावर असलेले खाप पंचायतींचे वर्चस्व कायम आहे. हरयाणाचे माजी मुख्यमंत्री भूपेंद्रसिंह हुड्डा हे जाट आहेत. ते मुख्यमंत्री असताना अशा प्रकारच्या 'जाती-सन्मान हत्या' किंवा ज्याला इंग्रजीत 'ऑनर किलिंग' अशी संज्ञा वापरली गेली यांचे अनेक प्रकार घडले होते. खाप पंचायतींनी त्या हत्यांचे समर्थन केले होते. यातूनच जाट समाजातील मुलींनी अमुकच प्रकारचा पेहराव केला पाहिजे, येथपर्यंत निर्बंध घालण्याचे काही प्रकारही घडले होते. आता असल्या आदेशांचे कितपत पालन होते, हा भाग वेगळा; पण धक्कादायक भाग हा होता, की हुड्डा यांनी कधीही खाप पंचायतींच्या या पुराणमतवादी गोष्टींना विरोध दर्शविला नाही. उलट एकदा पत्रकारांशी बोलताना त्यांनी त्यांचे समर्थनच केले आणि "तुम्ही पत्रकार केवळ खाप पंचायतींनी आंतरजातीय विवाहांना केलेला विरोध किंवा त्यातून घडलेल्या हत्या आणि तत्सम नकारात्मक गोष्टींचीच दखल घेऊन गाजावाजा करता, ते योग्य नाही. जाट समाजाची एकजूट टिकविण्यापासून समाजात शिस्त निर्माण करण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. ही एक जाट समाजाची सामाजिक व सांस्कृतिक संस्था आहे व त्यांच्या केवळ नकारात्मक बाजूंवरच झोत टाकण्याची प्रवृत्ती योग्य नाही," असे मत मांडले होते. एका मुख्यमंत्र्याचे असे मत असेल, तर कुणाही विवेकी व्यक्तीची बोलतीच बंद झाल्याखेरीज राहणार नाही. उत्तर भारतातील जातिप्रथा, त्यांची समाजावर असलेली पकड याचा उल्लेख वर केला आहे. याचा अर्थ केवळ उत्तर भारतातच जातिप्रथा बळकट आहे, असा नव्हे. दक्षिण भारतात किंवा नर्मदा नदीच्या खालील राज्यांमध्ये सामाजिक सुधारणांच्या चळवळींची मोठी पार्श्वभूमी आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, तामीळनाडू या राज्यांची विशेषत्वाने नावे घेता येतील. तशा चळवळी उत्तर भारतात तुलनेने कमी झाल्या व परिणामी जातिप्राबल्य, वरिष्ठ-कनिष्ठतेची उतरंड, पुराणमतवाद यांचा प्रभाव समाजावर राहिला. असे असले तरी तामीळनाडूतील मीनाक्षीपुरम येथे झालेली दलितांनी केलेल्या सामूहिक धर्मांतरांची घटना आजही स्मरणातून पुसली न जाणारी आहे. कर्नाटकात विवेकवादी चळवळ करणाऱ्या बसवेश्वरांना सनातन्यांचा त्रास सहन करावा लागला होता. असे असले तरी दक्षिणेत सामाजिक सुधारणांच्या चळवळींनी मूळ धरले आणि त्या विस्तारल्यादेखील व त्याचा सकारात्मक परिणाम दिसूनही आला.

**पोलीस दलाची भूमिका वादग्रस्त**

येथे दक्षिण विरुध्द उत्तर अशी तुलना करण्याचा हेतू नाही; परंतु ऐंशीच्या दशकात उत्तर प्रदेशात मेरठ, मुरादाबाद येथे भीषण सांप्रदायिक दंगली झाल्या होत्या. त्या दंगलींची भीषणता अशी होती, की शासनाला सशस्त्र पोलीस दलांचा वापर करावा लागला होता. ज्याप्रमाणे महाराष्ट्रात राज्य राखीव पोलीस दल किंवा ज्याला आपण 'एसआरपी' म्हणतो, तसेच उत्तर प्रदेशातील राखीव पोलीस दलास 'पीएसी'-प्रॉव्हिन्शियल आर्म्स कॉन्स्टॅब्युलरी' असे म्हणत असत. या पोलीस दलाने अल्पसंख्याक समुदायाच्या लोकांना योजनाबध्दरीत्या लक्ष्य केले आणि त्यांच्या मृतांची संख्या मोठी होती. या पोलीस दलाची ही भूमिका वादग्रस्त ठरली आणि नंतर त्यावरील चौकशीसाठी स्थापन झालेल्या आयोगांनी यासंदर्भातील ठपका स्पष्टपणे 'पीएसी'वर ठेवला होता.

**इंदिरा गांधींची हत्या धर्मवेडातून!**



या काही निवडक घटनांचा उल्लेख आवश्यक आहे. कारण त्याद्वारे भारतात मूलतत्त्ववाद किंवा कट्टरता आणि त्याचीच दुसरी बाजू म्हणजे ध्रुवीकरणाची प्रक्रिया कशी सुरू झाली याचे आकलन शक्य आहे. या प्रक्रियेत इंदिरा गांधी यांची धर्मवेडातून झालेली हत्या ही एक प्रमुख घटना होती. त्यानंतर दिल्लीतील शीख हत्याकांड हा प्रकार याच धर्मवेडाची प्रतिक्रिया होता. यानंतर राजीव गांधी यांना देशाची एकता व एकात्मता टिकविण्यासाठी लोकांनी भरभरून मते दिली. यामुळे राजीव गांधींच्या



दरबारातल्या काही सल्लागारांच्या डोक्यात हवा जाणे स्वाभाविक होते. काँग्रेस पक्षाला बहुसंख्याक समाजाने जवळ केले आहे आणि आता हीच 'व्होट बँक' कायमस्वरूपी बळकट करून ठेवण्याची कल्पना त्यांनी मांडली. त्याच सुमारास विश्व हिंदू परिषदेच्या पुढाकाराने रामजन्मभूमी मंदिरासाठी प्रचार व मोहीम सुरू करण्यात आली होती आणि तिला देशात प्रतिसाद मिळू लागला होता. बहुसंख्याक हिंदूंची व्होट बँक तयार करण्याच्या हेतूने काँग्रेसने हिंदू तुष्टीकरण सुरू केले. याआधीची एक घडामोड लक्षात घ्यावी लागेल, की १९७९ मध्ये संघ परिवारातर्फे विश्व हिंदू परिषदेचे पुनरुज्जीवन करण्यात आले आणि त्यांच्यामार्फत हिंदू संघटनाचे काम सुरू करण्याचे ठरविण्यात आले. जम्मू व दिल्लीमध्ये काँग्रेसला अनपेक्षित विजय मिळाल्याने हिंदू समाज काँग्रेसकडे आकृष्ट होत असल्याची काँग्रेसमध्ये भावना तयार झाली. मुरादाबाद, मेरठ-मलियाना दंग्यांमुळे मुसलमान काँग्रेसवर नाराज होते. आणीबाणीची कटुताही कायम होती. या परिस्थितीतच काँग्रेसमधील रणनीतीकारांनी हिंदू अनुनय व विश्व हिंदू परिषदेसारख्यांबाबत सौम्य धोरण स्वीकारण्याचे ठरवले. दुसरीकडे, या तुष्टीकरणाचाच भाग म्हणून देशावर 'इलेक्ट्रॉनिक हिंदुत्वा'चा मारा रामायण व महाभारत यासारख्या मालिकांमार्फत सुरू झाला. अयोध्येतील विवादास्पद वास्तूची कुलपे उघडण्याचे आदेश कनिष्ठ न्यायालयाकडून मिळविण्यात यश आल्यानंतर हिंदुत्ववादी शक्तींना आत्मविश्वास प्राप्त झाला. राजीव गांधी यांना धोक्याची जाणीव झाली नाही. राममंदिरासाठी दबावतंत्र सुरू झाले आणि बहुसंख्याक समाजाच्या श्रद्धा व भावनेचा प्रश्न म्हणून राममंदिर प्रकरणात काँग्रेसने खंबीर भूमिकेऐवजी बोटचेपेपणा सुरू केला. येथे सर्व इतिहास देणे अशक्य आहे; परंतु याची परिणिती अखेर ६ डिसेंबर १९९२ मध्ये वादग्रस्त वास्तू उद्ध्वस्त करण्यात झाली. अयोध्याकांडाने हिंदुत्ववाद्यांना विलक्षण ताकद मिळाली आणि या देशात बहुसंख्याकतेच्या जोरावर आपण काहीही करू शकतो, असा विश्वासही हिंदू कट्टरपंथीयांत निर्माण झाला. धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्थेच्या ऱ्हासाची ही सुरुवात होती, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. हिंदू कट्टरपंथीयांची मजल कुठपर्यंत जावी? उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री कल्याणसिंग यांनी न्यायालयाला प्रतिज्ञापत्र सादर करून अयोध्येतील बाबरी मशिदीच्या वास्तूला धक्का पोहोचणार नसल्याची हमी दिली होती. प्रत्यक्षात त्यांनी झालेला विध्वंस थांबविण्यासाठी काहीही केले नाही. श्रध्दा व भावनांच्या आड त्यांनी या दुर्घटनेचे समर्थन केले आणि हिंदू हितासाठी कोर्टाच्या झालेल्या अवमानाप्रकरणी सजा भोगण्याचीही तयारी दर्शविली. याचा अर्थ काय होता? याचा अर्थ हाच होता, की या कट्टरपंथीयांनी राज्यघटनेत समाविष्ट कायद्याच्या अधिराज्याच्या (रुल ऑफ लॉ) चिंधड्या उडवल्या आणि वर त्याचे समर्थन केले. राज्यघटना, कायदा, न्यायसंस्था यांना न जुमानण्याची ताकद या घटनेने हिंदू कट्टरपंथीयांना मिळाली. यानंतर त्यांना मागे वळून पाहण्याचे कारणच नव्हते. या शक्ती आता चौखूर सुटल्या. गोंधळलेले धर्मनिरपेक्ष राजकीय पक्ष किंकर्तव्यमूढ अवस्थेत गेले. बहुसंख्याक समाजाने विवेक गमावल्यानंतर त्या अनियंत्रित अविवेकाला आवर घालण्याची शक्ती धर्मनिरपेक्ष राजकीय पक्ष व प्रवृत्तींकडे उरली नाही. भारतातील वाढती धर्मांधता, कट्टरता यांना निर्णायक बळ-ताकद व शक्ती-सामर्थ्य पुरविण्याची कामगिरी ६ डिसेंबर १९९२ च्या घटनेने केली.

**वाजपेयींचा सात्वीक संताप अनाठायी ठरला**



क्रियेला प्रतिक्रिया असतेच. बहुसंख्याक मूलतत्त्ववादाची प्रतिक्रिया तीव्र असते. कारण अल्पसंख्याक समुदायांना अस्तित्वाचे भय सतावत असते. त्यामुळेच त्यांची प्रतिक्रिया ही टोकाची असू शकते. म्हणून अनेक समाजतज्ज्ञांनी बहुसंख्याक मूलतत्त्ववाद किंवा बहुसंख्याक कट्टरता ही अधिक धोकादायक ठरते, असे निरीक्षण नोंदवले आहे. त्यामुळेच अयोध्येच्या ज्या विविध प्रतिक्रिया उमटल्या त्या हिंसक व विध्वंसक होत्या. मुंबई बॉंबस्फोट मालिका, त्यानंतरचे दंगे हा सर्व घटनाक्रम हे या कट्टरतेचेच आविष्कार होते. अयोध्येच्या विध्वंसक घटनेला जबाबदार सर्व संबंधित हे अक्षम्य अपराधी आहेत. त्यांनी या देशातील सामाजिक सलोखा कायमस्वरूपी नष्ट करून सामाजिक संशयाचा विखार पेरला. भारतीय समाजात एक कायमची दुफळी व विभागणी करणारी ही घटना होती. १९९२ च्या डिसेंबरमध्ये अयोध्या घटना घडली; परंतु या घटनेचे पडसाद उमटतच राहिले. २००२ मधील गुजरात दंगल हा याच मालिकेतील कलंकित प्रकार होता. हे दंगे एवढे भयंकर होते, की जगभरात भारताची छी-थू झाली. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी या दंग्यांमुळे भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा मलिन झाली आणि मान खाली गेली,

असे उद्गार काढलेच; पण गुजरातच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी (दंगे शमविण्याबाबत) राजधर्माचे पालन केले नाही, असे त्यांनी त्यांच्या तोंडावर जाहीरपणे सुनावले होते; परंतु वातावरण बदलले होते. वाजपेयींचा सात्वीक संताप अनाठायी ठरला. कारण सांप्रदायिकता आणि कट्टरतेचे विष तोपर्यंत पूर्णतया भिनलेले होते.

**अल्पसंख्याक मंडळींना भारतात दुय्यमपणे राहण्याचे संकेत**

या बहुसंख्याक वर्चस्ववादी भूमिकेला समाजात वाढता पाठिंबा मिळत गेला. वाजपेयी यांच्यानंतर सत्तेत आलेल्या मनमोहनसिंग सरकारने आर्थिक कल्याणाच्या, तसेच काही सामाजिक सुधारणांचे कायदे करून या वातावरणाला वळण देण्याचा प्रयत्न केला; परंतु या सरकारनेही काही चुका केल्या. एकीकडे मुस्लीम तुष्टीकरणासाठी विकास योजनांमध्ये त्यांना प्राधान्य देण्याची भाषा मनमोहनसिंग यांनी करताच त्यामागील हेतू समजून न घेता बहुसंख्याक कट्टरपंथी त्यांच्यावर तुटून पडले. या देशात बहुसंख्याक समाजाला म्हणजेच हिंदूंना आर्थिक न्यायाबाबत दुय्यम स्थान दिले जात असल्याची हाकाटी सुरू करण्यात आली. याच्याच जोडीला काँग्रेसने १९८४ पासून जी छुप्या हिंदुत्वाची (काही मंडळी त्याला सॉफ्ट हिंदुत्व असेही म्हणतात) भूमिका सुरू केली होती, त्याचे प्रतीकात्मक समर्थन सुरू केले. सोनिया गांधी यांनी प्रयागला जाऊन त्रिवेणी संगमावर अर्घ्य देणे, त्यानंतर राहुल गांधी यांनी शिवमंदिरात जाणे, आपण ब्राह्मण आहोत असे सिद्ध करण्यासाठी जानवे घालून त्याचे प्रदर्शन करणे, असे हास्यास्पद प्रकारही केले. काँग्रेस पक्षाने स्वतःची उदारमतवादी लोकशाही व आधुनिकतेची कास धरणारी नेहरू-गांधींची भूमिकाच सोडल्यानंतर काँग्रेसचे पतन होणे, ही फार सोपी गोष्ट होती आणि २०१४ मध्ये बहुसंख्याक कट्टरतेला आक्रमक आणि विधिनिषेधशून्य परिमाण लाभले. ही अत्यंत निगरगट्ट, कोडगेपणाची व आक्रमक हिंदुत्वाची भाषा सुरू झाली. त्यासाठी विविध प्रतीकांचा यशस्वीपणे वापर करण्यात येऊ लागला ज्याचा उल्लेख सुरुवातीला आला आहे. गुजरातच्या मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानपदावर दावा ठोकल्यानंतर वाराणसीहून लोकसभा निवडणूक लढविणे, विश्वनाथ मंदिरातील पूजाअर्चना जाहीर टीव्हीद्वारे देशभरात प्रसारित करणे, भगवे कपडे, रुद्राक्ष माळा, सोमनाथ विश्वनाथाच्या भेटीला म्हणून स्वस्तुतिगायन करणे, निवडणुकांच्या आधी केदारनाथला जाऊन भगवी कफनी घालणे, गुहेत ध्यानधारणा, अयोध्येत शरयू नदीकिनारी लक्षदीप प्रज्वलनाचे कार्यक्रम ही सर्व बहुसंख्याक वर्चस्ववादाची प्रतीके यशस्वीपणे अमलात येऊ लागली आहेत. आता उदारमतवादाची जागा आक्रमक बहुसंख्याकवाद घेऊ लागला आहे. या विचारसरणीत







संसदीय लोकशाही किंवा उदारमतवादी लोकशाही विचारांना थारा नसतो, हे एव्हाना स्पष्ट झाले आहे. ज्या अल्पसंख्याक मंडळींना भारतात राहायचे असेल, त्यांनी दुय्यमपणे राहावे याचे संकेत दिले जाऊ लागले आहेत. नागरिकत्व दुरुस्ती कायदा किंवा 'सीएए' हे त्याचे मोठे उदाहरण मानावे लागेल.

**अयोध्येच्या विध्वंसक कृत्यानंतर भारतीय समाज अपरिहार्यपणे विभागला गेला**

मूलतत्त्ववाद किंवा कट्टरता ही सर्व समाजांमध्ये अस्तित्वात असली तरी प्रत्येक समाजात मूठभर का होईना विवेकी मंडळी असतातच. हिंदू समाजाप्रमाणेच मुस्लिमांमध्येही ती आहेत. दुर्दैवाने कट्टरतेचा सध्याचा रेटा एवढा प्रचंड आहे, की त्यांचा आवाज दबून गेलेला आहे किंवा बळजबरीने दाबला जात आहे. जगातच एक नवा राजकीय विचार किंवा राजकीय भाषा तयार होताना दिसते आणि ती भयसूचक आहे. राष्ट्रवाद आणि बहुसंख्याकवाद यांचे एक बेमालूम मिश्रण तयार करण्यात आले आहे. बहुसंख्याक एकाधिकारशाही आणि त्या मालिकेतच ओघाने येणारी कट्टरता यांना राष्ट्रवादाच्या चौकटीत बसवून जनतेला भरकटविण्याचे हे प्रयोग जगभर सुरू आहेत. पाकिस्तानने तर स्वतःला इस्लामी गणराज्य म्हणूनच घोषित केले आहे. तोच प्रकार मध्य आशिया आणि पश्चिम आशियात सुरू आहे. इराणही इस्लामी गणराज्य आहे; परंतु या उघडउघड धर्माधिष्ठित राजसत्ता आहेत. लोकशाहीचा बुरखा पांघरून जगात प्रस्थापित झालेल्या बहुसंख्याकवादी राजवटी आत्यंतिक असहिष्णू होताना दिसतात. अमेरिकेत डोनाल्ड ट्रंप यांनी हेच 'कॉकटेल' वापरून विजय संपादन केला होता. तुर्कस्तान, रशिया, चीन येथील राज्यकर्तेही उघडपणे नव्हे; परंतु छुप्या पद्धतीने बहुसंख्याक एकाधिकार आणि राष्ट्रवादाचे हे मिश्रण-संयुग वापरत आहेत. मूलतत्त्ववाद व बहुसंख्याकवाद यांचा राजकीय वापर झाल्यानंतर त्यामुळे होणारे सामाजिक परिणाम भयंकर व दीर्घकालीन स्वरूपाचे असतात. त्याचा अनुभव भारत देश घेत आहे. अयोध्येच्या विध्वंसक कृत्यानंतर भारतीय समाज अपरिहार्यपणे विभागला गेला आहे. ही मानसिक दरी या कृत्यामुळे तयार झाली आहे. ती सहजासहजी भरून येणारी नाही. वर्तमानात मूलतत्त्ववाद, कट्टरता, धर्मांधता यांचे यशस्वी राजकीयीकरण झाल्याने ते संयुग अति धोकादायक झाले आहे. या परिस्थितीत विवेकाचा आवाज बुलंद होण्याच्या प्रतीक्षेत राहावे लागेल! ●●●

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व विश्लेषक आहेत.)**

# कट्टरतावादाचा बीमोड नव्या दिशेनेच शक्य





डॉ. भारत पाटणकर

**स्त्री-पुरुष समानतेवर, जातीपासून मुक्ती मिळवण्याच्या पायावर आणि माणूस प्रेमाच्या आधारावर सत्यशोधक पद्धतीसारखी लग्नपद्धती आणि गृहप्रवेश पद्धती विकसित केल्या पाहिजेत आणि अशा सर्वच प्रसंगी कट्टरपंथी, ब्राह्मण्यवादी आणि धर्मांध पद्धती हद्दपार करण्याची मोहीम राबविण्यात आली पाहिजे. ज्यांना पटेल त्यांनी धर्म नसलेल्या बुद्ध धम्माचा पर्याय प्रसारित केला पाहिजे.**

मूळ खरे म्हणजे मला 'मूलतत्त्ववाद' या विषयावर लिहायचे आहे; पण ज्या मूळ इंग्रजी शब्दावरून हा शब्द आला आहे, त्याचे भाषांतर 'कट्टरतावाद' असे करणे जास्त योग्य ठरेल, असे मला वाटते. मराठी माणसांना हा शब्द जास्त चांगल्या प्रकारे कळेल. माणसे अनेक बाबतीत कट्टर असतात. धार्मिक, राजकीय, सैद्धांतिक, जातीय, लैंगिक, अशा बाबतीत कट्टरता असू शकते. ही कट्टरता बहुसंख्य लोकांना आपल्या विचारांचा स्वीकार करण्यासाठी प्रवृत्त करून त्यांना त्या-त्या क्षेत्रात कट्टरपंथी बनवण्यासाठी प्रयत्न करते. एखादी विचारधारा शंभर टक्के बरोबरच आहे. तिच्यात सुधारणा करून सिद्धांत विकसित करणे किंवा काही सिद्धांत चुकीचे असल्याने बदलले पाहिजेत, असे म्हणणे म्हणजे गद्दारी आहे. हीसुद्धा कट्टरपंथी भूमिका आहे. जी जात नाही, ती जात, अशी भूमिका, जातिव्यवस्था संपली पहिजे, असे म्हणणारे लोकसुद्धा कट्टर पद्धतीने घेतात. हासुद्धा एक वेगळ्या प्रकारचा कट्टरतावादच आहे. महात्मा फुले यांच्याशिवाय आम्ही कुणाला मानणारच नाही किंवा ओन्ली बाबासाहेब, अशी कट्टरतावादी भूमिकासुद्धा काही मंडळी घेताना दिसतात. हासुद्धा यासंदर्भातला कट्टरतावादच आहे. अशा कट्टरतावादामुळे मानवमुक्तीच्या लढ्याला इजा होते; पण या लढ्याच्या वाटेत फार मोठे संकट उभे राहत नाही. या लेखात मला लिहायचे आहे ते धार्मिक कट्टरतावादातून निर्माण होणाऱ्या कट्टर पंथाविषयी. अशा कट्टर पंथामुळे समाजाला होणाऱ्या त्रासाविषयी आणि अशा कट्टरतावादाचा बीमोड करण्याविषयी.

### वांशिक कट्टरपंथी प्रवाह गेली कित्येक वर्षे अस्तित्वात

धार्मिक कट्टरतावाद हा मानवी समाजात कट्टरपंथी आक्रमक प्रवाह निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणारा विचार आहे. आज जवळजवळ सर्व धर्मांमध्ये असे कट्टरपंथ तयार झाले आहेत. जगातल्या काही देशांमध्ये वांशिक कट्टरपंथी प्रवाह गेली कित्येक वर्षे अस्तित्वात आहेत. हे दोन्ही प्रवाह माणसांची कत्तल घडवण्यापर्यंत मजल मारणारे आहेत. स्त्रियांवर बलात्कार करून त्यांच्यावर भयानक अमानुष अत्याचार करण्यापर्यंत जाणारे आहेत. भारतीय उपखंडात निर्माण होणाऱ्या धार्मिक कट्टरतावादी प्रवाहांचा कट्टरतावाद जातीय उतरंडीच्या शोषणातूनसुद्धा जन्माला येणारा आहे. त्याचबरोबर पुरुष सत्तावादी कट्टरतावाद हासुद्धा धार्मिक कट्टरतावादी प्रवाहांचा भागच राहत आला आहे. थोडक्यात सांगायचे झाले, तर धार्मिक कट्टरतावाद हा जातीय, वांशिक आणि पुरुष सत्तावादी कट्टरतावादाला साथीला घेऊनच अत्याचार किंवा दडपशाही करत असतो, हे खासकरून ध्यानात घेणे अत्यावश्यक आहे.

### जातीची उतरंड उच्चनीचतेची आहे

भारतातील सध्याची परिस्थिती पाहता आज देशात सर्वाधिक धोकादायक, आक्रमक, फॅसिस्ट हुकूमशाही आणण्याकडे हिंसक मार्गाने व्यवहार करणारा कट्टरतावाद हा ब्राह्मण्यवादी धर्मांध कट्टरतावाद आहे. त्या खालोखाल शीख आणि मुस्लीम धर्मांध कट्टरतावाद आहेत. या कट्टरतावादाची मुळे भारतीय समाजातील जातीय उतरंडीच्या शोषणातून तयार झाली आहेत. डॉ. बाबासाहेब

आंबेडकर त्यांच्या जातींचे निर्मूलन (Annihilation of caste) या आपल्या पुस्तकात म्हणतात, की जातीची उतरंड ही केवळ उतरंड नसून, ती उच्चनीचतेची उतरंड आहे. अशी ही उतरंड श्रमिक जातींमध्ये वितुष्ट किंवा विभाजन तयार करते. हे विभाजन शोषित असलेल्या सर्व जातींच्या जनतेची एकजूट होऊ देत नाही आणि याच गोष्टीचे हत्यार करून ब्राह्मणवादी जातीय धर्मांध कट्टरतावादी हिंसक पंथ तयार करू शकतात. जातिव्यवस्थेची भलावण करून प्रत्येक जातीला अशी जाणीव दिली जाऊ शकते, की ती जात किमान कोणत्यातरी एका जातीपेक्षा श्रेष्ठ आहे. काही जातींना यापेक्षासुद्धा जास्त समाधान मिळते. कारण त्या एकापेक्षा जास्त जातींपेक्षा स्वतःच्या जातीला श्रेष्ठ समजू शकतात. यामुळे जाती-जातींमधला अंतर्विरोध कायम ठेवला जातो; पण कष्ट करून जगणाऱ्या सर्वच जाती शिखरावरच्या जातींपेक्षा कनिष्ठ असतात, हे यातून लपून राहते. बहुसंख्य जातींचे शोषण चालूच राहते! परंपरेने चालत आलेल्या या शोषणव्यवस्थेला कायम ठेवून सर्वच जातींना श्रेष्ठ असल्याचे समाधान देणाऱ्या व्यवस्थेलाच 'हिंदुत्ववाद' असे वरकरणी गोंडस नाव दिले जाते. गेली २० शतके ही व्यवस्था राबवली जात आहे. बौद्ध धम्माच्या रक्तलांच्छित कत्तलीनंतरच हे शक्य झाले आहे. म्हणूनच सत्य ठामपणे उघडे पाडून या गोंडस अवरणाला बाजूला काढून आत असलेले जातीयवादी-धर्मांधस्वरूप उघडे पाडण्याची आज निकड आहे. हा विचार ऐतिहासिकदृष्ट्या ब्राह्मणवादी-धर्मांध-जातीयवादी विचार आहे. हा फक्त विचार नाही, तर वास्तवातल्या सामाजिक-आर्थिक रचनेत आजही ही शोषणव्यवस्थेतली उतरंड आपल्याला दिसते. भारतातील भांडवलदार वर्गात आजही ९० टक्के भांडवलदार हे ब्राह्मण आणि बनिया जातींचे आहे. आजही घाण समजल्या जाणाऱ्या आणि अंगमेहनतीची कामे असलेल्या कामगार कष्टकरी जनतेत, ९९ टक्के स्त्री-पुरुष पूर्वाश्रमीच्या बलुतेदार आणि शेतकरी जातींमधील आहेत. घाण समजली जाणारी कष्टाची कामे करणाऱ्या मजूर कामगार-कर्मचाऱ्यांमध्ये आजही पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींमधील जनता आहे! हे भयंकर वास्तव झाकण्याचे बेमालूम काम सर्व हिंदूंनी हिंदू म्हणून एकत्र या, आपण सर्व हिंदू आहोत, अशा घोषणांच्या माध्यमातून केले जाते. यातूनच पुढे सरकत मुस्लीम, ख्रिश्चन, शीख इत्यादी धर्मांमधल्या जनतेविरुद्ध द्वेष पसरविण्याचे भयंकर काम केले जाते. भारतातील प्रमुख धर्मांध कट्टरतावाद हा यामुळेच ब्राह्मण्यवादी-जातीयवादी धर्मांध कट्टरतावाद आहे. याबरोबरच पुरुषांकडून होणारे स्त्रियांचे शोषण वर्गीय आणि जातीय शोषणाशी सांगड घालून राबवले जाते. ब्राह्मण्यवादी पुरुष सत्तावाद हा अशा शोषणव्यवस्थेला समर्थन देणारे युक्तिवाद मांडतो. स्त्रियांच्या स्त्री म्हणून होणाऱ्या शोषणव्यवस्थेला बळकटी आणतो. यामुळे हा कट्टरवाद ब्राह्मण्यवादी धर्मांध, जातीयवादी, पुरुषसत्ताक कट्टरता वाद असतो. याला पर्याय जात-वर्ग-स्त्री मुक्तीवादी मानवतावादाचाच असू शकतो. शोषणमुक्ती वादाचाच असू शकतो; पण या तऱ्हेचे पर्याय ठोस कार्यक्रमाच्या स्वरूपात आणि जनतेच्या सहभागातून आले आणि सामाजिक व्यवहाराचा भाग बनले, तरच ते या कट्टरता वादाचा बीमोड करू शकतील. अमूर्त संकल्पनात्मक पातळीवरच ते राहिले, तर ते जनतेच्या पर्यायी सामाजिक व्यवहाराचा भाग बनू शकत नाहीत. हे पर्याय सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक आणि कलांच्या क्षेत्रातले असावे लागतील.

**कलेला बाजारू स्वरूप आले आहे**

मानवांनी समाज म्हणून सामाजिक जीवन जगण्यातूनच त्यांची मानुषता घडत जाते, आकाराला येते. आपला आनंद, सुख, दुःख, वेदना, मनाचा गोंधळ, अचंबित स्थिती, जगाचा अर्थ न समजणारी स्थिती व्यक्त करणारी माध्यमे शोधली. यातूनच चित्रकलेचा विकास व्हायला सुरुवात झाली. नृत्य आणि संगीताचा विकास सुरू झाला. माणसांनी लिपी निर्माण केली. गुहा चित्रे या सर्वांची साक्ष देतात. या सर्वांमधून माणसांचे जीवन समृध्द होत गेले. या सर्व कला सामाजिक अस्तित्वाचा भाग होत्या आणि अनेक वर्षे त्या तशा राहिल्या. आज त्यांचा सामूहिकपणा संपला आहे. त्या वैयक्तिक क्षेत्रात मर्यादित राहिल्या आहेत. त्याचबरोबर त्यांना बाजारू स्वरूप आले आहे. प्रत्येक व्यक्ती एकटी पडली आहे. त्यामुळे माणसे कट्टरतावादी उपक्रमात भाग घेऊन एकटेपणातून मार्ग काढत आहेत. माणसा-माणसांतला संवाद या कट्टरतावादात शोधत आहेत. प्रेमाची जागा द्वेषाने घेतली आहे. पुन्हा एकदा निरोगी सामाजिक सामूहिक कला निर्मिती सुरू होणे, हाच त्याचा पर्याय आहे.

**धर्म नसलेल्या बुद्ध धम्माचा पर्याय प्रसारित केला पाहिजे**

निसर्गावरचे प्रेम, माणसांतील प्रेम, प्राणी आणि माणसांमधील प्रेम, जंगल, शेती, नद्या, ओढे, समुद्र इत्यादींवरचे प्रेम, इत्यादी भावना सामूहिकपणे व्यक्त करणाऱ्या सणांची निर्मिती माणसांनी केली; पण आज या सणांना कट्टरपंथी धार्मिक, स्पर्धात्मक आणि बाजारू स्वरूप आणले गेले आहे. त्यातून उलट द्वेष, हिंसाचार आणि बाजारूपणा जन्माला येत आहे. मानव-निसर्ग संबंध आणि मानव-मानव संबंध प्रेममय करणारे विकसित स्वरूप आज आवश्यक आहे. त्यासाठी सार्वत्रिक मोहीम हाती घेतली पाहिजे.त्यासाठी आवश्यक साहित्य कलांची निर्मिती केली पाहिजे.


स्त्री-पुरुष समानतेवर, जातीपासून मुक्ती मिळवण्याच्या पायावर आणि माणूस प्रेमाच्या आधारावर सत्यशोधक पद्धतीसारखी लग्नपद्धती आणि गृहप्रवेश पद्धती विकसित केल्या पाहिजेत आणि अशा सर्वच प्रसंगी कट्टरपंथी, ब्राह्मण्यवादी आणि धर्मांध पद्धती हद्दपार करण्याची मोहीम राबविण्यात आली पाहिजे. ज्यांना पटेल त्यांनी धर्म नसलेल्या बुद्ध धम्माचा पर्याय प्रसारित केला पाहिजे.

असे समग्र पर्याय सार्वत्रिक करण्यातूनच ब्राह्मण्यवादी, धर्मांध, जातीयवादी कट्टरपंथी संकट नाहीसे करता येईल. यासाठी कबीर, रविदास आणि सर्व वारकरी संत कवी आणि कवयित्री, त्याचबरोबर महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई अशा महामानवांचे विचार आपल्याला मार्गदर्शन करू शकतात. •••

**(लेखक विचारवंत आणि श्रमिकांच्या चळवळीचे नेते आहेत.)**

# भांडवलशाही व मूलतत्त्ववाद





श्रीनिवास खांदेवाले

**आध्यात्मिक मूलतत्त्ववादाला काही मर्यादा आहेत आणि रोजचे आर्थिक-सामाजिक-राजकीय-तांत्रिकी प्रश्न सोडविणे हे त्याचे कार्यक्षेत्र नव्हे, तसेच भांडवलशाहीला (बाजाराला) अमर्याद आर्थिक स्वातंत्र्य देऊन त्यातून राजकीय-आर्थिक-सांस्कृतिक विकासाचे प्रश्न सोडविले जातील, असे समजणे चूक होईल.**

### मूलतत्त्ववाद

निसर्गाच्या आधारावर आणि निसर्गासोबत सगळी सजीव सृष्टी जगते. काही काळ असे मानले गेले, की आज आपण जी सृष्टी पाहतो ती कोणीतरी एकदाच विकसित केली आणि (कदाचित) ती स्वत:ला अभावितपणे पिढ्यान्‌पिढ्या पुनरुत्पादित करीत आहे. त्यामुळे माणसाशिवाय इतर प्राणी स्वत:बद्दल आणि चराचराबद्दल विचार करू शकत नाहीत आणि ते केवळ जगण्याइतक्याच बुद्धीचे आहेत. दुसरा विचार असा आहे, की सारेच प्राणी उत्क्रांतीच्या प्रक्रियेत आहेत. त्यात मानव थोडा पुढे आहे. (या विषयासंबंधी प्रस्तुत लेखक पूर्णपणे अज्ञानी आहे; त्याचा तो अभ्यासाचा विषय नव्हे; फक्त चर्चेपुरते मुद्दे उपस्थित करण्याचा त्याचा प्रयत्न आहे.) उत्क्रांतीची प्रक्रिया इतकी सूक्ष्म आणि मंदगती आहे, की छोट्या-छोट्या बदलांकरिता हजारो-लाखो वर्षे लागून जातात. म्हणून एका कोणत्याही क्षणी बदल होत असल्याचे जाणवत नाही. प्रदीर्घ भूतकाळ विचारात घेतल्यास, तेव्हा आणि आता असा विचार केल्यास, मधल्या काळातील उत्क्रांतीचा अंदाज येऊ शकतो; पण ही प्रक्रिया ठिकठिकाणची भौगोलिक परिस्थिती, निसर्गातील बदल इत्यादींमुळे, इतकी मंद, धूसर, अस्पष्ट आणि वैविध्यपूर्ण असते, की त्याविषयी माणसाच्या मनात प्रचंड कुतूहल नांदत आले आहे. त्यामुळे तो अधिकच चौकस होऊन विचार करीत राहतो, धूसरपणामुळे निरीक्षणे नोंदवितो. विस्तवामुळे मांस भाजले जाते, अन्न शिजते, धातू गाळला जातो, कोळशाने चित्र काढता येते; इत्यादी निरीक्षणे नोंदायला तो लाखो वर्षांत शिकला. पशुपालनावर जगायला शिकला तेव्हा माणसाचे स्वत:बद्दलचे आणि निसर्गाबद्दलचे ज्ञान आणि जाणीव निर्माण झाली. तांबडी-स्वर्णमयी पहाट आणि पौर्णिमेचा चंद्र अब्जो वर्षे तसाच उगवतो-मावळतो आहे; पण माणसाची स्वत:बद्दलची व भोवतालची जाणीव होण्याइतका बौद्धिक विकास झाल्यावर त्याला काव्य सुचले. शेतीमुळे सुबत्ता आल्यावर वेद सुचले आणि संपूर्ण ब्रह्मांडाच्या मुळाशी कोणते तत्त्व आहे, याचा शोध आणि मांडणीही सुरू झाली. हे वाखाणण्यासारखे आहे. फिरणाऱ्या जनसमूहांद्वारे हे ज्ञान, भाषा, जिज्ञासा, विकास जगभर प्रसारित होऊ लागले. भिन्न ठिकाणच्या लोकांनी भिन्न परिस्थितीत मूळ तत्त्वाची (सृष्टीचा निर्माता, तारणहार, संहारक, थोडक्यात म्हणजे लय-विलय) जिज्ञासा आपापल्यापरीने पूर्ण करत उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला. परिणाम म्हणून विविध देश-प्रदेश, खंडांमध्ये मूळ तत्त्वाबद्दलच्या विविध प्रकारच्या धारणा निर्माण झाल्या.


कृषिपाठोपाठ औद्योगिक उत्पादन, व्यापार इत्यादी वाढत गेल्यामुळे त्या सर्वांचे संघटन व्यवस्थित व्हावे म्हणून राजे, राज्ये निर्माण झाली. त्या राजांनीसुद्धा नीट वागावे म्हणून मूळ तत्त्व (अमूर्त संकल्पनेत का असेना) धर्माच्या रूपात सांगून, धर्मसंस्थेला भौतिक राज्य संस्थेच्या वरचे स्थान देऊन भौतिक सत्तेची घट्ट उतरंड तयार करण्यात आली. ठिकठिकाणच्या मूळ तत्त्वाच्या संकल्पना विविध धर्मांमध्ये समाविष्ट होऊन तेथील राजसत्तेला हाताशी धरून समाजात प्रसारित झाल्या. राजा ज्या धर्माचा (मूळ तत्त्वाचा) असेल तशी त्याची प्रजा असे. अशा रीतीने समाजाचे आणि राजाचे भौतिक पाठबळ मिळून मूळ तत्त्व विचार मूलतत्त्ववाद बनला. भौतिक पाठबळ असल्याशिवाय मूलतत्त्ववादही समाजात मूळ धरत नाही, म्हणून धर्मव्यवस्था व राज्यव्यवस्था या एकत्र आल्या. मध्यकाळात भारतात मोगल राजे मुस्लीम धर्म घेऊनच आले. वसाहती स्थापन करण्यासाठी जे युरोपियन लोक आले, त्यांच्या राजांनी त्यांना ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्याच्या सूचना दिल्याचे नमूद आहे. युरोपमध्ये धर्मसत्तेने राजसत्तेकडून खूप जमिनी मिळविल्या होत्या. त्यावर मार्क्सने अशी टीका केली, की वाटल्यास धर्मसत्ता आपल्या धर्माज्ञा सोडून देईल; पण एक एकर जमीन सोडणार नाही! १७६१ च्या फ्रेंच राज्यक्रांतीचे महत्त्व असे सांगितले जाते, की तिने राजा, जमीनदार व धर्मसंस्था या शोषक संस्थांचे विशेषाधिकार काढून घेतले. (नंतर

ती क्रांती अन्य कारणांनी अयशस्वी झाली हा भाग वेगळा.) मात्र, जो राजा बलवान असेल त्याचा धर्म प्रजा अनुसरेल व त्याच धर्माचा मूलतत्त्ववाद श्रेष्ठ, अशा तऱ्हेची विचारप्रणाली निर्माण झाली.

प्रत्येक मूलतत्त्ववादाच्या मर्यादा/वि.ती राजाच्या मार्फत समाजजीवनात पाझरतात हेही इतिहासात दिसून आले.

**औद्योगिक भांडवलशाही**

सरंजामशाहीत शोषण झाले. ते प्रत्येक देश, प्रदेशाच्या/राज्याच्या आत होते व त्याला स्थानिक सामाजिक-सांस्कृतिक आयाम होता. १७००-१८५० या काळात ब्रिटन व युरोपात औद्योगिक क्रांती पूर्ण झाली, म्हणजे सगळ्याच प्रकारचे उत्पादन यंत्रांद्वारे होऊ लागले. खेड्यांमधून मजूर ओढून आणल्यामुळे खेडी ओस पडली. या स्थलांतरामुळे बरेचसे पूर्वीचे सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ बदलले व ग्रामीण युरोप-अमेरिका हे औद्योगिक-नागरी बनले. त्या देशांच्या लोकसंख्या मर्यादित असल्यामुळे अवाढव्य यांत्रिकी उत्पादन देशाबाहेर विकणे आवश्यक होते; पण ते मागणी आणि पुरवठा घटक या बाजारतत्त्वावर उपलब्ध करून घ्यावयाचे म्हटल्यास एकतर अनिश्चितता निर्माण होते व किंमती प्रतिकूल बदलल्यास उद्योजकांचा नफा कमी होऊ शकतो. त्यावर त्यांना साम्राज्य स्थापणे व मागणी पुरवठ्यासाठी वसाहतींचे शोषण करणे हाच सगळ्यात चांगला पर्याय वाटला. त्याकरिता भांडवलशक्ती, राज्यशक्ती आणि धर्मशक्ती एकत्र आल्या व सगळ्या युरोपियन देशांचा साम्राज्यवाद जगभर पसरला. त्याबरोबर ख्रिश्चन मूलतत्त्ववादही पसरला.



मूलतत्त्ववादाची सकारात्मक बाजू अशी आहे, की तो ज्या भौगोलिक-नैसर्गिक भू-भागात निर्माण होतो तेथील भौतिक-सामाजिक समस्या विचारात घेऊन, त्यांचे समाधान शोधत असताना तेथील समाजाचे भौतिक जीवन कशाने सुखी होईल, मानसिक शांती मिळेल, अध्यात्मिक मुक्ती मिळेल, हे सांगण्याचा प्रयत्न करतो. हा प्रयत्न सामाजिक स्वास्थ्याकरता हितकारक आहे, असे आपण मान्य करूया. प्रश्न तेव्हा येतो, की जेव्हा एका समाजात व परिप्रेक्ष्यात विकसित झालेला मूलतत्त्ववाद असे मानतो आणि आग्रहपूर्वक म्हणतो, की केवळ मला झालेले मूळ तत्त्वाचे ज्ञानच अचूक, परिपूर्ण आहे; राजाने त्यावर आधारूनच राज्यव्यवस्था निर्माण करावी, त्याला अनुसरून धर्मव्यवस्था व समाजव्यवस्था असावी. बरेच वेळा एखाद्या मूलतत्त्ववादातील ज्ञानप्रक्रिया काही कारणाने खुंटून जाते; पण अत्याग्रह टिकून राहतो. या बाबतीत एक प्रत्यक्षात घडलेले उदाहरण बोलके आहे. प्रस्तुत लेखक एम.ए.च्या वर्गाला अर्थशास्त्र शिकवीत असताना एक विद्यार्थिनी असे म्हणाली, की एका प्रश्नाची चर्चा तुमच्या घरी येऊन करायची आहे. घरी आल्यानंतर तिने सांगितले, की ती एका धर्माच्या एका संप्रदायाची आहे. संप्रदायाने चालविलेल्या हॉस्टेलमध्ये राहते. त्यामुळे धर्मगुरूंची प्रवचने ऐकणे अनिवार्य असते. एका प्रवचनात धर्मगुरू म्हणाले, की केवळ आपल्याच संप्रदायाचा मूळ तत्त्वाबद्दलचा विचार खरा आहे आणि एक दिवस भारतावर आपलेच राज्य होणार आहे. लोकसंख्येचे अर्थशास्त्र शिकणाऱ्या त्या विद्यार्थिनीने विचारले, की इतरही धर्म आहेत, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर धर्मांतर शक्य नाही आणि आपला संप्रदाय इतका लहान आहे, की राज्य स्थापनेइतकी संख्या होणे अशक्य आहे, तर देशावर राज्य कसे स्थापन होईल? त्यावर धर्मगुरू म्हणाले, की आधुनिक शिक्षणाने तुमची डोकी बिघडली आहेत! नंतर ती विद्यार्थिनी म्हणाली, की तिने काय करावे? मी तिला सांगितले, की दोन वर्षे प्रवचने सहन कर, पदवी मिळाल्यानंतर आपल्या बुद्धीप्रमाणे वाग!

औद्योगिक भांडवलशाहीने व तिचे साधन असलेल्या साम्राज्यवादाने १८ व्या व १९ व्या शतकांतच बरेचसे जागतिकीकरण घडवून आणले. साम्राज्यवादाने शिकविले, की जे देश आपल्या उत्पन्नापेक्षा जास्त ऐषआराम करू इच्छितात त्यांना भांडवलशाहीने खंड, नफा हे श्रीमंत होण्याचे राजमार्ग दाखविले. तो नफा मिळवताना धर्मभेद, मूलतत्त्ववाद, वर्णभेद, भाषा, संस्कृती हे सगळे मोडीत काढून अर्ध्या जगावर गुलामगिरी लादून एक प्रकारची वि.त समानता आणली.







बऱ्याच वर्षांपूर्वी ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कंपनीने (बीबीसी) एक डॉक्युमेंटरी (माहितीपट) तयार केली होती. त्यात विविध घटनांचे फोटो व विश्लेषण दाखवून असे म्हटले होते, की ''साम्यवाद, धर्म (मूलतत्त्ववाद) व बाजार (भांडवलशाही) या तीन संकल्पनांनी मानवाला मुक्तीचे आश्वासन दिले; पण धर्माने साम्यवादाला हरविले व बाजाराने (भांडवलशाहीने) धर्माला (मूलतत्त्ववादाला) हरविले व स्वत: आद्यदैवत बनून गेले''. या त्यांच्या निष्कर्षाचा आपण मर्यादितच पण गाभ्याचा अर्थ काढावा. या तीन तत्त्वांना पडलेल्या मर्यादा लक्षात घेतल्या म्हणजे आपण नीट वास्तवाकडे येऊ.

**मर्यादा**

खरे तर माणूस, निसर्ग व त्या पलीकडे काही मूळशक्ती असल्यास त्यांचे आपसातील संबंध याचे कोडे शहरी-ग्रामीण-आदिवासी; साक्षर-निरक्षर; स्त्री-पुरुष या सर्वांनाच आहे. वेगवेगळ्या दर्शनांवर आधारित धर्मशास्त्रे बनली आहेत. मुळात ते ज्ञान परिकल्पनेच्या (हायपॉथिसिस) स्वरूपात असते किंवा असावे; परंतु धर्मकल्पनांचा दोन प्रकारे उपयोग केला जातो : सामान्य माणसे धर्मतत्त्वांना मानसिक शिस्तीचे व शांतीचे साधन मानतात; ती तत्त्वे त्यांच्या स्वत:साठी असतात, कोणाच्या विरुद्ध वापरावयाची नसतात. त्यामुळे विविध धर्मांचे लोक एकमेकांच्या सण-महोत्सवात भाग घेतात; परंतु दुसरा उपयोग असा, की कित्येक धर्म-पंथांचे गुरू किंवा कट्टरतावादी कार्यकर्ते आपल्या धर्माचा अधिक आक्रमक प्रचार/प्रसार करून त्याचेच धर्माधिष्ठित राज्य/राष्ट्र व्हावे आणि राजसत्ता आपल्या हाती यावी, असा प्रयत्न करतात. असे झाले तर इतर कमी सदस्यसंख्या असलेल्यांना वगळून (Exclusion) सत्ता एकवटण्याचा प्रयत्न असतो. हीच मूलतत्त्ववादाची मर्यादा आहे. असे राष्ट्र सर्व-समावेशक, सर्वांना समान न्याय देणारे असू शकत नाही व अशा व्यवस्थेत लोकशाही निर्माण होऊ शकत नाही व ते (भारताच्या परिप्रेक्ष्यात तर विशेषकरून) एका मर्यादेपलीकडे प्रगती करू शकत नाही. राष्ट्र म्हणून ते टिकेल, की सतत बहुसंख्य विरुद्ध अल्पसंख्य असा अंतर्गत कलह चालेल, असाही मुद्दा उपस्थित होतो.

सरंजामी/साम्राज्यवादी शक्तींकडून जनतेचे शोषण, राज्यव्यवस्थेचे जनहिताकडे दुर्लक्ष, पराकोटीची विषमता इत्यादी कारणांनी जनभावनेचा उद्रेक होऊन, क्रांती घडून येते. नंतर क्रांतीची उद्दिष्टे पूर्ण करताना जो वर्गीय विरोध होतो तो सशस्त्र व हिंसकच असतो. म्हणून क्रांतीला विरोध हे स्वातंत्र्याचे लक्षण म्हणून पुढे येते; पण प्रत्यक्षात ते भांडवलशाहीचे समर्थन असते. भांडवलशाही देशांनी समाजवादी देशांना घेराव करणे आणि सर्वच क्षेत्रांमध्ये विरोध करीत राहणे यातून समाजवादीव्यवस्था कोसळल्या. मग राहता राहिली भांडवलशाही (किंवा बाजार) व्यवस्था व तिच्यावर अवलंबून असलेली राजकीय व्यवस्था. तिची स्थिती सध्या काय आहे?











भांडवलशाही टिकेल का, समाजाचे सगळे प्रश्न सोडवू शकेल का, या मुद्यावर बऱ्याच भांडवलशाही समर्थक अर्थशास्त्रज्ञांनी होकारार्थी लिखाण केले आहे; परंतु त्यासाठी भांडवलशाही राज्यव्यवस्थेत काही सुधारणा कराव्या लागतील, असे त्यांचे मत आहे. भांडवलशाहीचे आर्थिक दोष (महागाई, बेरोजगारी, उत्पन्न व संपत्तीची वाढती विषमता) सर्वांना माहीत आहेतच; परंतु त्यापेक्षा गंभीर प्रश्न जगभरच्या विचारवंतांना सतावीत आहेत. त्यापैकी एक, ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ प्रा. पॉल कोलियर आहेत. भांडवलशाही टिकावी अशा त्यांच्या सततच्या लिखाणाकरता त्यांना 'सर' हा किताबही मिळाला आहे; पण ते त्यांच्या पुस्तकात (Collier Paul, The Future of Capitalism (Facing the New Anxieties), Great Britain, Allen Lane, 2018, P.201) ते म्हणतात की ''भांडवलशाही विघटित समाज निर्माण करीत आहे. ज्यामध्ये बरेच लोक चिंतामय जीवन जगत आहेत... हे जे आताचे झालेले बदल आहेत, ते भांडवलशाहीचे अंगभूत नाहीत... ते अयोग्य, हानिकारक कार्यकलापांमुळे आहेत, ते दुरुस्त केले पाहिजेत... महामंदीनंतरच्या काळात व्यावहारिक धोरणे अमलात आणून भांडवलशाही रुळावर आणली गेली; ते धोरण ठरविणारे भांडवलशाहीला पुन्हा रुळावर आणू शकतात; परंतु आपली राजकीय व्यवस्था अशी धोरणे निर्माण करीत नाही आहे. राजकीय व्यवस्थासुद्धा अर्थव्यवस्थांसारखीच अकार्यकारी झाली आहे. ती प्रश्नांची उत्तरे सुचविण्याकरिता व्यावहारिक विचार करण्यास सक्षम का राहिलेली नाही?'' (भाषांतरित). हीच स्थिती अमेरिकन व युरोपियन भांडवलशाहीचीसुद्धा आहे.

**समारोप**

आध्यात्मिक मूलतत्त्ववादाला काही मर्यादा आहेत आणि रोजचे आर्थिक-सामाजिक-राजकीय-तांत्रिकी प्रश्न सोडविणे हे त्याचे कार्यक्षेत्र नव्हे, तसेच भांडवलशाहीला (बाजाराला) अमर्याद आर्थिक स्वातंत्र्य देऊन त्यातून राजकीय-आर्थिक-सांस्कृतिक विकासाचे प्रश्न सोडविले जातील, असे समजणे चूक होईल. कारण कंपनीत भांडवल गुंतविणाऱ्या गुंतवणूकदारांना जास्तीत जास्त नफा मिळवून देणे, हे त्यांचे आद्यकर्तव्य असते, देशातील बेरोजगारी, गरिबी हटविणे, सामाजिक सौहार्द घडवून आणणे, जनतेचे आध्यात्मिक उन्नयन घडवून आणणे, ही उद्दिष्टे भांडवलशाहीपुढे नसतातच. उलट भांडवलशाही असे (बेरोजगारी-विषमतेसारखे) प्रश्न निर्माण करते, की ज्यांची सोडवणूक ती स्वत: करू शकत नाही.

वरील कारणांकरिता भांडवलशाही व मूलतत्त्ववाद यांचे मानवी जीवनावर निश्चितच काही चांगले प्रभाव पडले असतील; पण त्या एखाद्या सर्वंकष व्यवस्थेचे कार्य करू शकत नाहीत. त्यासाठी भांडवलशाहीचे दोष वगळून पुढील टप्पा असलेली सामाजिक-आर्थिक व्यवस्था हवी आहे.

अमेरिकेतील अर्थशास्त्रज्ञ रॉबर्ट हाईलब्रोनर यांनी असे मत व्यक्त केले आहे, की एका कालखंडात भांडवलशाहीने मानव विकासात महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे; पण आता तिच्या मर्यादा जाणवू लागल्या आहेत. आता मानवी समाजाला उन्नत स्तरावर नेणारी पर्यायी पण सर्वंकष व्यवस्था हवी आहे, मग तिला तुम्ही नाव कोणतेही द्या! ●●●

**(लेखक अर्थशास्त्रज्ञ आहेत.)**

# मूलतत्त्ववाद : स्त्री शूद्रांचा कर्दनकाळ





बी.जी. वाघ

**श्रद्धा ही कुठल्याही कायद्यापेक्षा श्रेष्ठ आहे. त्यामुळे आमच्या श्रद्धेला नाकारणारा कायदा आम्ही मान्य करणार नाही, असा एक सूर मूलतत्त्ववाद्यांचा असतो. राम किंवा परशुराम या व्यवस्थेचे आदर्श आहेत. राम व परशुराम दोन्हीही वर्णाश्रमधर्माचे समर्थक होते. अर्थातच ते मनुस्मृतीचे समर्थन असल्याने 'स्त्री' आणि शूद्रांना या व्यवस्थेत कायम दुय्यम स्थान आहे. त्यांच्या विचारांना, हक्क आणि अधिकारांना कोठेही जागा नाही. त्यांच्यासाठी आहेत ती व्यवस्थेने निर्माण केलेली कर्तव्येच.**

मूलतत्त्ववाद ही एक धार्मिक, प्रतिगामी आक्रमक व हिंसक अशी धर्माधिष्ठित राजकीय चळवळ आहे. तिची अनेक रूपे आहेत. ती मूलतः अवैज्ञानिक आहे. तिच्या प्रेरणा भूतकाळातून येतात. धार्मिक हटवादीपणा हे तिचे मुख्य स्वरूप असते. आपल्या प्राचीन राष्ट्रीय वैभवाचा, संस्कृतीचा, सन्मानाचा संबंध आपल्या मूळ धर्माशी, परंपरांशी आहे. राष्ट्राला जागृत करायचे असेल, तर त्या जुन्या परंपरांचे, व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करावे लागेल. अशा प्रकारच्या विज्ञानाला विशेषकरून या चळवळी अमेरिकेतून कॅथॉलिक पंथीयांनी सुरू केल्या, असे समजले जाते. विज्ञानामुळे धर्माची जुनी इमारत खिळखिळी झाली आहे. तिला वाचवण्याचा हा प्रयत्न आहे. इस्लाममध्ये १९७९ पासूनच मूलतत्त्ववादी चळवळींनी गती घेतली आहे. या धार्मिक चळवळींनी पुढे राजकारणात प्रवेश केला. राजकारण्यांसाठी हा सुगीचा काळ म्हणता येईल. कारण धर्म हेच एक प्रभावी शस्त्र आहे ज्यामुळे विरोधकांना धर्मद्रोही, देशद्रोही ठरवून त्याचा सहज पराभव करता येतो.

**जगातील कुठलेही सत्य अंतिम नाही!**

भारतात उजव्या शक्तींचा जन्म साधारणतः १९२० पासून सुरू होतो. अर्थात, लोकमान्य टिळकांच्या काळातही त्या होत्याच. धर्माच्या साहाय्याने ज्या वर्गसमूहांनी सत्ता, संपत्ती व विशेषाधिकार भोगले तेच या चळवळींचे सूत्रधार होते. आजही तेच आहेत. इस्लामी धर्मातील मूलतत्त्ववाद आपल्याला स्पष्टपणे दिसतो. इसिस, वहाबी पंथ, अलकायदा, लष्करे तोयबा, मुस्लीम ब्रदरहूड, अशा संघटना जिहादी पद्धतीने काम करतात. त्यातल्या काही तालिबानी लष्करी संघटना आहेत. त्यांचे म्हणणे असते, की आमचा धर्मच जगातील सर्वश्रेष्ठ आहे. कुराणातील प्रत्येक शब्द ईश्वर आहे. त्यामुळे तेच अंतिम सत्य आहे. जगातील कुठलेही सत्य अंतिम नाही, असे बुद्धाने म्हटले आहे. विज्ञानदेखील सत्याकडे जाण्याची एक पाऊलवाटच आहे. ज्ञान आणि ज्ञाता दोन्हीही बदलणारे असतात; परंतु मूलतत्त्ववाद्यांचा ना विज्ञानावर विश्वास असतो, ना ज्ञानावर. त्यामुळे धर्माचे शब्दशः पालन करणारे, ईश्वरी आदेशावर विश्वास ठेवणारे तेच खरे 'पवित्र' आणि बाकी सारे 'अपवित्र' धर्मद्रोही म्हणून शिक्षेस पात्र, अशी त्यांची धारणा असते. मूलतत्त्ववादी स्वतःला धार्मिक आदर्शवादी समजतात. आम्ही जे काही करतो ते धर्मासाठीच. त्यामुळे 'हत्या'देखील धर्मासाठीच असल्यामुळे त्यांना ते पवित्र कृत्य किंवा कर्तव्य वाटते.

**धर्म जेव्हा अधिक संघटित होतो, तेव्हा अधिक कट्टर होतो**

अठराव्या शतकात भारतात उदयास आलेल्या वहाबी चळवळीवर हिंदुस्थानी धर्मपंडित शाह वली उल्लाह यांच्या विचारांचा प्रभाव होता. देवबंदच्या चळवळी मूलतः पुनरुज्जीवनवादी होत्या. तबलिगी, मुजाहिदी, तालिबानी, असे अनेक प्रकार त्यानंतर उदयास आले, तरी मूलतः एकच विचार होता तो म्हणजे कुराण हेच अंतिम सत्य असून, कुराणाच्या पलीकडे जाऊन कुणी धर्माची/सत्याची मांडणी करीत असेल, तर ते धर्मद्रोही आणि इस्लाम सत्तेत असेल, तर ते राष्ट्रद्रोही आहेत व त्यांचा नाश करणे हे धर्मसंमत आहे. इस्लाममध्ये जाती नसल्या, तरी शिया, सुन्नी असे कट्टर पंथीय आहेतच. त्यांच्या विचारात धार्मिक उदारतेला किंवा स्खलनशीलतेला थोडीही क्षमा नसते. धार्मिक संघर्षातून कट्टरता वाढते. धर्म जेव्हा अधिक संघटित होतो, तेव्हा अधिक कट्टर होतो. त्यातून मूलतत्त्वांचा प्रचार केला जातो. उदारमतवादी तत्त्वे हळूहळू समाप्त केली जातात. सर्व मूलतत्त्ववादी स्त्रियांच्या शिक्षणाला, अधिकाराला, सक्षमतेला

विरोध करतात. मूलतत्त्ववाद ख्रिश्चन धर्मातही आहे. याचे कारण या दोन्ही धर्मांचे मूळ अत्यंत कट्टर अशा यहूदी धर्मात आहे. येशू ख्रिस्तांचा वध या कट्टरतेतूनच झाला. येशू ख्रिस्ताने यहुद्यांना जुन्या देवदेवतांना, परंपरांना विरोध केला होता. यहुद्यांचा देव म्हणतो, 'मी पृथ्वीवर शांतता आणावयास आलो आहे असे समजू नका, मी तलवार चालवण्यास आलो आहे. ज्या माझ्या वैऱ्यांच्या मनात मी त्यांच्यावर राज्य करू नये, असे होते. त्यास येथे आणा व माझ्या देखत ठार मारा.' अशा प्रकारचे आदेश ज्यूंच्या हिब्रू करारात आहेत. तेथूनच ते कुराणातही आले आहेत. धर्मग्रंथ ईश्वरी आहेत, असे मानल्यामुळेच हिंसेला पावित्र्य प्राप्त होते.

**...हे मूलतत्त्ववादाचेच एक वेगळे रूप**

धार्मिक मूलतत्त्ववाद अमेरिकेसारख्या देशातही वाढतो आहे. अमेरिकेतील सुप्रीम कोर्टाने नुकताच गर्भपातावर एक निर्णय दिला आहे. त्यामुळे स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर बंधने आली आहेत. हे मूलतत्त्ववादाचेच एक वेगळे रूप आहे. हिंदू पुरुषांप्रमाणेच अमेरिकन कॅथॉलिक पुरुषालाही आपली स्त्री अत्यंत पवित्र, शहाणी असे वाटते. नुकतीच एक कादंबरीही त्यावर आली आहे. आपली पत्नी बायबलप्रणीत आदर्शाप्रमाणेच वागावी आणि तिने अत्यंत पवित्र वर्तन करावे म्हणून एक कॅथॉलिक नवरा तिच्यावर अत्यंत कठोर बंधने लादतो, तिचा छळ करतो. शेवटी या आदर्शांसाठी तिचा खूनही करतो आणि शेवटपर्यंत त्याला पश्चात्ताप होत नाही. मुलीने हा सर्व छळ पाहिला. आपल्या आत्मकथेत तिने ते लिहिले. शेवटी तिने आपल्या बापाला क्षमा केली आहे. माणसाचे धर्मवेड माणसाला किती क्रूर बनवते, ते आपणही भारतातील 'मॉब लिंचिंग'सारख्या प्रकरणात पाहिले आहे. सलमान रश्दीने म्हटले आहे, की हातात बायबल वा कुराण घेऊन देवदूतांच्या वेशात काही सैतान हैदोस घालीत आहेत. नुकताच त्यांच्यावरही जीवघेणा हल्ला झाला आहे. हा हल्ला एका अज्ञात मूलतत्त्ववादी मुस्लीम तरुणाने केला आहे. त्याने 'सॅटेनिक व्हर्सेस' हे पुस्तक वाचलेदेखील नव्हते. मूलतत्त्ववाद विज्ञानवादी आधुनिक जीवन पद्धतीला मुक्त अभिव्यक्ती स्वातंत्र्याला विरोध करतो. हा विरोध मूलतः हिंसक पद्धतीचा असतो.

**बौद्ध संस्कृती कर्मकांडांना विरोध करणारी**


इतर अनेक धर्मांप्रमाणेच हिंदूंतील मूलतत्त्ववाद गंभीर रूप धारण करतो आहे. वास्तविक, हिंदुधर्म भारतात वेगळा असा अस्तित्वात नव्हता. हिंदू हे नाव मुळात सिंधू नदीच्या काठी राहणारे लोक या अर्थाने आहे. आर्य येण्यापूर्वी या देशातील मूळ धर्म कोणता याविषयी फार संशोधन झालेले नाही. मुळात आर्यांचा धर्मही हिंदू नाहीच. प्रत्येक गावाचा, प्रांताचा वेगवेगळा धर्म, पंथ, देवता असण्याची शक्यता आहे. आजही निरनिराळ्या जातींचे वेगवेगळे देव आहेत. 'व्हाय आय ॲम नॉट हिंदू' या पुस्तकात कांचा इलैय्या यांनी त्यावर अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. अर्थात, या सर्व पंथांना, विविध विचारधारांना, परंपरांना एक चालकानुवर्ती व्यवस्थेत बंद करण्याचा प्रयत्न म्हणजे धार्मिक मूलतत्त्ववाद आहे. त्याला हिंदू राष्ट्रवाद म्हणणे म्हणजे धर्माच्या साहाय्याने एका राजकीयव्यवस्थेवर कब्जा करणे आहे. हे प्रश्न यशस्वी होतात ते येथील जातव्यवस्थेमुळे. धर्म आणि संस्कृतीची सरमिसळ केली जाते. त्यातून आपल्याला हवा तसा अर्थ काढता येतो. मुळात हिंदू नावाची अशी स्वतंत्र वेगळी संस्कृती होती का? हा मूळ प्रश्न आहे. असेल तर 'मनुस्मृती' हीच ती संस्कृती असावी. त्याआधी बौद्ध संस्कृती होती आणि ती वर्णाश्रमधर्माच्या नेमक्या विरुद्ध होती. ती वेद स्मृतिभूती या सर्व कर्मकांडांना विरोध करणारी होती. सावरकरांना त्याची जाणीव होती. त्यांनी म्हटले आहे, ''हिंदुधर्म' हे नाव कोणत्याही एका विशिष्ट धर्माचे वा पंथाचे विशेष आणि अनन्य नाव नसून, ज्या अनेक धर्मांची नि पंथांची ही भारतभूती हीच पितृभूमी नि पुण्यभूमी आहे. या साऱ्यांना सामावणाऱ्या धर्मसंघांचे हिंदुधर्म हे सामुदायिक अभिधान आहे.'' या व्याख्येवर पुष्कळ चर्चा झालेली आहे. मुळात धर्माची ही राजकीय व्याख्या आहे. परधर्मीयांना वगळणे हाच मुख्य उद्देश आहे. हेडगेवारांनी म्हटले आहे, 'हिंदुस्थानचा पंचप्राण म्हणजे हिंदू संस्कृती. हिंदुत्वाचे रक्षण करायचे म्हणजे हिंदू संस्कृतीचे रक्षण करायचे.' या संस्कृतीचा अर्थ वर्णाश्रमधर्मावर आधारित असलेली वेद, उपनिषदे, मनुस्मृती, यज्ञयागादी आदी प्राचीनतेचा अभिमान असलेली निव्वळ ब्राह्मणी संस्कृती आहे. या संस्कृतीचा अधिनायक व देव ब्राह्मणच असला पाहिजे, अशी दृढ धारणा या संस्कृतीधारकांची आहे. ती निरनिराळ्या पद्धतीने ते मांडत असतात.


**अस्मितेचा लढा हेडगेवारांना का महत्त्वाचा वाटत होता?**


हेडगेवारांनी १९२५ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. त्यांचे आदर्श लोकमान्य टिळक आणि सावरकरच होते. हिंदुधर्माची व्याख्या पा.वा. काणेंनीही केली आहे. ती करता येत नाही, असे त्यांनी म्हटले आहे. काँग्रेसच्या स्वातंत्र्याच्या लढ्यापेक्षाही या धार्मिक व सांस्कृतिक अस्मितेचा लढा हेडगेवारांना का महत्त्वाचा वाटत होता, हा मुख्य प्रश्न आहे. काँग्रेस हिंदूंच्या हिताचे रक्षण करीत नाही व मुस्लीम, ख्रिश्चनांना अधिक महत्त्व देते, ते तत्कालीन परिस्थितीत फारसे महत्त्वाचे नव्हते. मुळात काँग्रेस उच्चवर्णीय हिंदूंचीच होती. त्यातील बरेच सोवळेओवळे, जातीयता पाळणारे होते. लोकमान्य टिळकांचे निधन आणि म. गांधींचा उदय हेच संघाच्या निर्मितीचे मुख्य कारण होते. म. गांधीजींची धार्मिक सहिष्णुता, हिंदू-मुस्लीम ऐक्य, अस्पृश्यता निवारण, शेवटच्या माणसाचा विचार, वर्णव्यवस्थेला त्यांनी पुढे दिलेला नकार, ब्राह्मणेतरांचा मुख्य राजकीय प्रवाहात झालेला समावेश, अशी अनेक कारणे वा असंतोष संघाच्या स्थापनेमागे होता. मुस्लीम लीगची स्थापना, हिंदू-मुस्लीम दंगलीनंतर फाळणी आदी कारणांमुळे संघ वाढत गेला. मुस्लिमांचा, परधर्मीयांचा, शूद्र-अतिशूद्रांचा द्वेष हे संघाचे बलस्थान होते. उच्च जातीतील तथाकथित वर्णाश्रमाच्या अभिमान्यांनी हा संघ वाढवला. धर्म, जाती, वंश, संस्कृती हे नेहमीच ज्वलनशील विषय असतात. त्यांच्या साहाय्याने माणसे संघटित करता येतात, झुंजवता येतात व प्रतिस्पर्धी वाटणाऱ्या प्रागतिक शक्तींचा पराभवही घडवून आणता येतो. प्रत्येक गोष्टीला जात, धर्म वा वंशांचा रंग दिल्याने विचारी माणसेही भ्रमित होतात व झुंडीत सामील होतात. सत्तेकडे जाण्याचा हा फार सोपा मार्ग आहे.

**यालाच मूलतत्त्ववाद म्हणतात**

ज्याला आपण सनातनी संस्कृती वा धर्म म्हणतो. तो कधीही समतावादी, विवेकवादी वा विज्ञानवादी नसतो. प्राचीन काळी माणसाच्या बुद्धीचा फार विकास झालेला नव्हता. त्यामुळे प्राचीन धर्म-संस्कृती वा परंपरांचा अभिमान बाळगणारे लोक माणसांच्या बौद्धिक स्वातंत्र्याला, विवेकशीलतेला, मुक्त विचारांना सर्वांत जास्त घाबरतात. धर्मचिकित्सेला त्यामुळे त्यांचा विरोध असतोच. त्यांच्या भावना कमालीच्या दुखवल्या जातात. धर्म व संस्कृतीचा चुकीचा अर्थ लावून एका शोषणव्यवस्थेला जन्म देणे व तिला बळकट करणे, यालाच मूलतत्त्ववाद म्हणतात. ही शोषणव्यवस्था वेदांतून जन्मते आणि तिचा विकास आपल्याला मनुस्मृतीत दिसतो. तसा मूलतत्त्ववाद सर्वच धर्मांत आहे आणि त्याची असंख्य रूपे आहेत. आधुनिकतेला, समतेला, विज्ञानाला आणि विवेकशीलतेला त्यांचा विरोध असतो. आमचा धर्म, संस्कृती, वेश, परंपरा या सर्वोच्च आहेत आणि त्यांना विरोध करणारे आमचे शत्रू आहेत, ही भावना त्यांना धर्मांध करते.







काँग्रेसचा राष्ट्रवाद आणि हिंदू राष्ट्रवाद यात मूलगामी फरक आहे. ख्रिस्तोफर जॅफ्रोलेट यांनी लिहिले आहे, 'Nationalism of the congress party was essentially territorial and civic identifying as indian all inhabitants of india. Hindu nationalism has sought to identify as indian nation according to ethnic criteria.' हिंदू राष्ट्रवाद मुळात वंशवादी आहे. तो धर्माच्या आधारे देशाची विभागणी करू पाहतो. सर्व हिंदूंनाही तो समानतेने पाहत नाही. मुस्लीम आणि इतर अल्पसंख्याकांना तो देशाबाहेर हाकलून देण्याचे स्वप्न पाहतो. ख्रिश्चन, मुस्लिमांवर हल्ले होत आहेत. जातीय व धार्मिक ध्रुवीकरणासाठी त्यांना ते आवश्यक वाटते. ज्याठिकाणी त्यांची सत्ता आहे, त्या उत्तर प्रदेश, गुजरातसारख्या राज्यातही अनुसूचित जाती-जमातींवर सामूहिक हल्ल्यांचे प्रकार वाढले आहेत. अर्थात, जिथे काँग्रेसची सत्ता आहे तिथेही हे प्रकार होतातच. त्यामागे एक संघटित विचारधारा आहे. एक धर्म, एक संस्कृती, एक पक्ष, एक विचारधारा या पद्धतीने हिंदू राष्ट्रवाद राष्ट्राची उभारणी करू पाहतो. साहजिकच या व्यवस्थेत दलित, वंचित, शोषितवर्गाला काही स्थान राहणार नाही, हे उघडच आहे. याविषयी त्यांच्या राष्ट्रवादात काही जागा नाही. समता, स्वातंत्र्य ही तत्त्वेच मुळात त्यांना मान्य नाहीत. पुष्कळदा ते मनुस्मृतीचे समर्थनच करताना दिसतात.

**'आधुनिक हिंदू त्रिमूर्ती : गांधी, हेडगेवार, आंबेडकर'**

नुकत्याच एका हायकोर्टाच्या महिला न्यायमूर्तीने मनुस्मृतीमुळे महिलांना स्वातंत्र्य मिळाले, असे म्हटले आहे. य.गो. भावे या व्यक्तीने नुकतेच एक पुस्तक 'आधुनिक हिंदू त्रिमूर्ती : गांधी, हेडगेवार, आंबेडकर' लिहिले आहे. यावरूनही त्यांच्या विचारांची दिशा कळून येते. हेडगेवारांच्या पंक्तीत आणि परंपरेत ते गांधी, आंबेडकरांना बसवतात. त्यापैकी एकाचा त्यांनी खून केला आहे आणि दुसऱ्याला ते वैचारिकदृष्ट्या संपवू पाहतात. आंबेडकर हवेत; परंतु त्यांची घटना नको. स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांना नष्ट करण्यासाठी ते एक बौद्धिक षड्यंत्र रचतात. त्याला ते कधी सांस्कृतिक राष्ट्रवाद, वैश्विक मानवतावाद, विश्वशांती, विश्वगुरू, हिंदू धर्मपुरुष, हिंदू राष्ट्रपुरुष, अशा अनेक संकल्पना वापरतात. प्रत्येक गोष्टीला धार्मिक व सांस्कृतिक रंग देणे व तिचे समर्थन करणे त्यासाठी आवश्यक असते. म. गांधींजींच्या खुनामागील संस्कृती समजणे तसे कठीण आहे; परंतु जणू काही ते मोठे राष्ट्रकार्य केले अशा अभिमानाने नथुरामचे पुतळे ते सहजतेने उभे करतात. त्याला विरोध होत नाही, याचे कारण बहुसंख्याकांची धार्मिक, मानसिक गुलामगिरीच होय. धर्माने निर्माण केलेली जन्मजात शूद्रता बहुसंख्याकांना कायम मांडलिकत्व स्वीकारण्यास भाग पाडते. या मानसिकतेचा फायदा साहजिकच मूलतत्त्ववादी घेतात.

**पाश्चात्त्यांच्या राष्ट्रवादापेक्षा आमचा राष्ट्रवाद खरा**

धार्मिक राष्ट्रवाद हा मूलतत्त्ववाद आहे. तथाकथित सांस्कृतिक एकता म्हणजे व्यक्तीने समष्टीमध्ये स्वतःला विलीन करून घेणे होय. राष्ट्रकार्याचे, आपल्या हक्कांचे, व्यक्तित्वाचे बलिदान करणे योग्यच होय. मग उरतात फक्त कर्तव्ये. हिंदू संस्कृतीचा पाया जर समता, स्वातंत्र्य, बंधुता असेल, तर हजारो वर्षांनी सांस्कृतिक महत्ता सांगणाऱ्या तथाकथित विश्वगुरूंना काही नैतिक अधिकार तरी मिळेल. देशातील दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, धर्मांधता, जातीय अत्याचार, स्त्रियांवरील बलात्कार, बेरोजगारी याविषयी काहीही न बोलता हजारो वर्षांची आमची वैदिक संस्कृती आणि त्यातून निर्माण झालेले हिंदुराष्ट्र या शब्दांना काहीही अर्थ उरत नाही. पाश्चात्त्यांच्या राष्ट्रवादापेक्षा आमचा राष्ट्रवाद खरा अधिक अस्सल, असे म्हणणारे ना इतिहास जाणत, ना संस्कृती. ही भूमिका स्वातंत्र्य समवादी तत्त्वांसाठी संघर्ष करणाऱ्या लक्षावधी विचारवंतांवर, क्रांतिकारांवर अन्याय करणारी आहे.

**प्राचीन संस्कृती म्हणजे मेलेले मढे!**

या देशात जी समता, स्वातंत्र्य, लोकशाही आदी मूल्ये आली आहेत, ती लोकसंघर्षातून, आधुनिक तत्त्वप्रणालीतून. तर्क, विवेक आणि विज्ञाननिष्ठा ही बुद्धाने जगाला दिलेली देणगी आहे. भारताने

जगाला एकच विश्वगुरू दिला आहे आणि तो म्हणजे भगवान बुद्धच. आपली आधुनिक शिक्षण पद्धती हीदेखील ब्रिटिशांनीच, जगानेच आपल्याला दिलेली देणगी आहे. त्याआधी होत्या पंतोजींच्या शाळा. त्यातही बहुजन समाजाला प्रवेश नव्हता. आपली राष्ट्रीय अस्मिता जागृत झाली तीदेखील मेकॉलेच्या शिक्षण पद्धतीमुळेच. नालंदा, तक्षशिलासारखी जागतिक विद्यापीठे आली ती बौद्ध संस्कृतीतूनच. आपल्या वैदिक परंपरेत मात्र एकलव्याचे अंगठे कापले गेले किंवा शंबूकाचा ज्ञान साधनेच्या अपराधाखाली खून. आज मात्र एकविसाव्या शतकातही आपल्यापुढे आदर्श आहेत, ते गुरुकुल पद्धतीचेच. फक्त उच्चवर्णीयांनीच शिकावे, हा त्याचा अर्थ. भूतकाळापासून मुक्त होणे, हाच खरा आधुनिक संस्कृतीचा अर्थ आहे. प्राचीन संस्कृती म्हणजे मेलेले मढे आहे. त्याला कितीही सजवावे, तरी त्यातून दुर्गंधीच येत राहणार. भारतातील हिंदू राष्ट्रवाद हा फॅसिझमचेच अनुकरण करतो. वांशिक, धार्मिक व सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि क्रोनी कॅपिटॅलिझम (Crony Capitalism) यांच्याद्वारे घटनात्मक लोकशाही संपवून एकाधिकारशाही आणण्याचा तो प्रयत्न आहे. अर्थात, तो सफल होणार नाही. कारण या देशातील कनिष्ठ जातीच बहुसंख्य आहेत आणि आधुनिक शिक्षण पद्धतीमुळे आपल्या हक्क आणि अधिकारांबाबत तो उदासीन राहिलेला नाही.

**भारतात मूलतत्त्ववादी शक्ती अनेक रूपांनी कार्यरत आहेत**

लोकांना भयग्रस्त आणि संकुचित करणे हाच मूलतत्त्ववाद्यांचा मुख्य हेतू असतो. त्यामुळे समाजाची मानसिक फाळणी होते. अशा समाजात प्रत्येक जण एकमेकांकडे संशयाने पाहू लागतो. त्याचा फटका दलित, वंचित समाजाला सर्वांत जास्त बसतो. मागासवर्गीयांना असलेल्या सवलती, आरक्षण, त्यांना मिळालेले घटनात्मक संरक्षण बहुसंख्याकांच्या डोळ्यात खुपू लागते. त्यामुळे देशात बेधुंद होणाऱ्या खाजगीकरणाला, आर्थिक विषमतेला, बेकारी, महागाई, धार्मिक व जातीय अत्याचार, याकडे लोकांचे लक्ष वेधले जात नाही. राष्ट्रीय, सामाजिक, आर्थिक प्रश्नांकडे लक्ष न देता 'हिजाब'सारख्या छोट्याशा प्रश्नांवर लोक रस्त्यावर उतरतात, तसेच बिल्कीस बानोसारख्या प्रकरणात बलात्कारी हे ब्राह्मण आहेत, म्हणून त्यांचे स्वागत केले जाते. धर्मांधता माणसाला किती अधःपतित करते, हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. घटनेने दिलेले मानवी हक्क, स्वातंत्र्य, समता किंवा सामाजिक न्यायासारखी तत्त्वे सरकार पायदळी तुडवू शकते, ते अशा धार्मिक प्रदूषणामुळेच. घटनेने दिलेले मानवी हक्क नष्ट झाले तरी चालतील; परंतु या लोकांचा बंदोबस्त झाला पाहिजे, अशी मानसिकता वाढवत नेणे ही मूलतत्त्ववाद्यांची गरज असते. समाजाला ठरावीक पद्धतीनेच विचार करायला लावण्याची शिस्त अशा पद्धतीने कायद्याची अंमलबजावणी करून केली जाते. उदारमतवाद, निधर्मी सरकार, समाजवाद, धार्मिक सहिष्णुता हे शब्द उच्चारण्याचीही लोकांना भीती वाटली पाहिजे, अशा पद्धतीने प्रचार यंत्रणा राबवली जाते. हवा असतो तो एकसुरी नाद. दंगलीत आपला आणि परका ओळखण्याची ती खूण असते. त्यामुळे समाजाचे रूपांतर झुंडीत होते. धार्मिक झुंडी अधिक नग्न असतात, हे जगाने पाहिजे आहे. धार्मिक, जातीय वा वांशिक दंगलीत जितके लोक मेले आहेत, तितके दोन महायुद्धातही मेले नाहीत. भारतात मूलतत्त्ववादी शक्ती अनेक रूपांनी कार्यरत आहेत. इतिहासाचे विकृतीकरण करणे, नव्याने इतिहास लिहिणे, शिक्षणात धर्म आणणे, प्रशासकीय व्यवस्थेचे आधी राजकीयीकरण आणि नंतर धार्मिकीकरण करणे, परधर्मीयांविषयी मैत्री ठेवणेही गुन्हा मानणे आणि अशा तऱ्हेने समाजाचे ध्रुवीकरण करून सत्ता मिळवणे. मूलतत्त्ववादी त्यासाठी प्रभावी प्रचारयंत्रणा उभी करतात.

**आमच्या श्रद्धेला नाकारणारा कायदा मान्य नाही**

राजकीय व आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण, घटनात्मक संस्थांचा गैरवापर आणि जनतेचा मूळात जातीय व धार्मिक मानसिकता येथील विवेकवादास पराभूत करीत आहे. विचारवंतांचे खून झाले आहेत, ते केवळ या व्यवस्थेला त्यांनी विरोध केला म्हणूनच. देशातल्या न्यायव्यवस्थेवरही या 'बदलांचा' प्रभाव पडतो आहे. गेल्या दहा वर्षांत सुप्रीम कोर्टाचे निर्णय बहुसंख्याकवादाचा अनुनय करणारे होते, असे दिसून येते. श्रद्धा ही कुठल्याही कायद्यापेक्षा श्रेष्ठ आहे. त्यामुळे आमच्या श्रद्धेला नाकारणारा कायदा आम्ही मान्य करणार नाही, असा एक सूर मूलतत्त्ववाद्यांचा असतो. राम किंवा परशुराम या व्यवस्थेचे आदर्श आहेत. राम व परशुराम दोन्हीही वर्णाश्रमधर्माचे समर्थक होते. अर्थातच ते मनुस्मृतीचे समर्थन असल्याने 'स्त्री' आणि शूद्रांना या व्यवस्थेत कायम दुय्यम स्थान आहे. त्यांच्या विचारांना, हक्क आणि अधिकारांना कोठेही जागा नाही. त्यांच्यासाठी आहेत ती व्यवस्थेने निर्माण केलेली कर्तव्येच. आमची संस्कृती भोगावर नसून त्यागावर उभी आहे याचा अर्थही तोच आहे. समाज एक विराट पुण्यपुरुष आहे. तिथे संघर्षाला, स्पर्धेला कोठेही जागा नाही. अर्थातच हा पुण्यपुरुष ऋग्वेदातील पुरुषसूक्तातीलच आहे, त्याचे डोके ब्राह्मणाचे आणि पाय शूद्रांचे आहेत. वर्णव्यवस्थेचे विविध मार्गांनी उदात्तीकरण करणे व त्यासाठी अनेक छुप्या पद्धतीने समर्थन व बळकटीकरण करणे यासाठी बौद्धिक षड्यंत्र उभे करावे लागते. ते समजून घेणे सामान्यांना शक्य नसते.


हिंदू परंपरावादी आणि हिंदू राष्ट्रावादी यातील अंतर ब्रिटिश विद्वान जॅफरोलेट यांनी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. Whereas the Hindu traditionalists were conservative in their approach, enlisting time-honored values to justify the continuation of a hierarchical social order, the Hindu nationalists wanted to remold Hindu society along corporatist lines and to fashion the state accordingly...

हिंदू राष्ट्रवादाची प्रेरणा हिटलरच्या फॅसिझममधून आली आहे आणि त्यामुळे ती अधिक धोकादायक आहे. त्यासाठी जनतेला विवेकशून्य बनवणे आवश्यक असते. त्या प्रयत्नात ते सफल होताना दिसत आहेत. धर्म एक अफूची गोळीच नाही, ते एक शस्त्रदेखील आहे. ते धर्मांध झुंडींच्या ताब्यात दिले, तर मोठ्या कष्टाने उभा केलेला लोकशाहीचा डोलारा ते सहजपणे उद्ध्वस्त करू शकतात.

●●●

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत.)**

# विज्ञान आणि मूलतत्त्ववादतील अखंड संघर्ष





प्रा. जयप्रकाश म्हात्रे

**निरीक्षण, परीक्षण, विश्लेषण व निष्कर्ष या विज्ञानाच्या कसोट्या असतात. एखादे घटित या कसोट्यांवर उतरले, की ते विज्ञान होते. मूलतत्त्ववादाचे तसे नसते. जे ग्रंथात लिहिलेले आहे तेच अंतिम सत्य, असे मूलतत्त्ववादी मानीत असतात आणि त्यामुळेच विज्ञान आणि मूलतत्त्ववाद यातील संघर्ष अटळ ठरतो.**

विज्ञान (Science) आणि मूलतत्त्ववाद (Fundamentalism) यातील संघर्ष पुरातन आहे. दोन लाख वर्षांपूर्वी आधुनिक मानव जेव्हा चिंपांझीच्या पूर्वजापासून उत्क्रांत होऊन उदयास आला, तेव्हापासून ते त्याला आपण आपल्या भोवतालच्या इतर जीवसृष्टीपासून वेगळे आहोत, याचे भान सर्वसाधारणपणे एक ते सव्वालाख वर्षांपूर्वी येऊ लागले. तेव्हा हिमयुग सुरू होते. हिमयुगातील अत्यंत कठीण पर्यावरणात व अन्नस्रोत कमी होत असलेल्या काळात त्याला जगून व तगून राहणे अवघड जात होते. तेव्हा त्याला आपल्या वर्तनात बदल करणे भाग पडले. अशा वर्तन बदलातून त्याने अवघड परिस्थितीवर मात करायला सुरुवात केली. जगण्यासाठी व तगून राहण्यासाठी वर्तन बदलांची ही व्यूहरचना त्याने केली. पुराणवस्तुशास्त्रज्ञ व मानववंशशास्त्रज्ञ स्टैनले एम्ब्रोज याने ही वर्तन बदलांची व्यूहरचना म्हणजेच संस्कृती होय, असे म्हटले आहे. आपण इतर सजीवांप्रमाणे केवळ एक सजीव नसून, या पृथ्वीतलावर उदयास आलेलो एक विशिष्ट सजीव आहोत, याचे भान त्याला या काळात येऊ लागले. तोपर्यंत मानवी उत्क्रांती ही डार्विनच्या सिद्धांतानुसार नैसर्गिक निवडीनुसार होत होती. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी सजीव आपल्या शरीररचनेत व शरीरक्रियेत बदल करतात, असे बदल बदललेल्या परिस्थितीशी जुळवून घेतात व त्यानुसार नवे सजीव निर्माण होतात. या बदलातून जे बदल योग्य असतात ते बदल निसर्ग निवडतो. यालाच नैसर्गिक निवड म्हणतात. यानंतर मानवी उत्क्रांती ही वर्तन बदलानुसार म्हणजे संस्कृतीच्या आविष्कारानुसार होऊ लागली. भान येणे, माणूस म्हणून जाग येणे, बोलीभाषा येणे, विचार करता येणे, हे सर्व संस्कृतीचे आविष्कार होत. बोलीभाषेचा आविष्कार होण्यापूर्वी माणसाच्या



मनात अमूर्त विचारांचे कल्लोळ निर्माण होत होते. हे कल्लोळ व्यक्त करण्यासाठी त्याने आपण राहत असलेल्या गुहांच्या भिंती व छतांवर चित्रे काढण्यास सुरुवात केली. हा कलेचा आविष्कार पुढे विकसित होत जाऊन त्याने शिल्पे बनविण्यास सुरुवात केली, तसेच स्वरयंत्रे (बासरी) ही बनविण्यास सुरुवात केली. ५० हजार वर्षांपूर्वी जेव्हा बोलीभाषेचा उगम झाला तेव्हा मानवी संस्कृतीने मोठीच झेप घेतली व या झेपेमुळे त्याला या पृथ्वीतलावर जगणे आणि सर्व पृथ्वीतलावर पसरणे व तेथे स्थायिक होणे शक्य झाले. दहा हजार वर्षांपूर्वी पर्यंत हा सांस्कृतिकदृष्ट्या विकसनशील माणूस अन्न गोळा करणारी भटकी जीवनशैली जगत होता. दहा हजार वर्षांपूर्वी हिमयुग संपुष्टात येऊन उबदार युग पृथ्वीतलावर अवतरले. भटक्या माणसांचे समूह स्थायिक होऊ लागले व ते शेती करू लागले. शेतीने त्यांना स्थिर जीवनशैली



प्रदान केली. शेती संस्कृतीने सभ्यतेला (Civilization) जन्म दिला. सभ्यतेतून विशिष्ट समाजरचना निर्माण झाल्या.


**विज्ञान व मूलतत्त्ववाद यांचा उगम**

माणसाला जेव्हापासून भान (Consciousness) आले व त्याच्या मनात विचार प्रक्रिया (Thought Process) सुरू झाली, तेव्हापासून तो स्वतःला प्रश्न विचारू लागला व त्यांची उत्तरे शोधावयास लागला. मी कोण आहे? या जगाचा निर्माता कोण आहे? ही जगराहाटी कशी चालते? याविषयीचे कुतूहल त्याच्या मनात पिंगा घालू लागले. या प्रश्नांची उत्तरे तो शोधू लागला. भटके जीवन जगत असताना तो निसर्ग न्याहाळत होता. निसर्गात घडणाऱ्या घटनांची तो निरीक्षणे करीत होता. निसर्ग रहाटी नियमन कोणीतरी करीत असावा, असे त्याचे मन त्याला सांगत होते. निसर्ग हाच देव आहे, अशी त्याची भावना होत होती. कालांतराने तो निसर्ग देवतेची पूजा करू लागला. आराधना करू लागला. त्यातूनच या ईश्वराच्या आराधनेची एक परंपरा निर्माण होत गेली व त्यातूनच धर्मसंस्थेचा उदय झाला. हीच धर्मसंस्था पुढे-पुढे कणखर होत गेली व त्यातूनच मूलतत्त्ववाद जन्माला आला. अनेक धर्मसंहिता निर्माण झाल्या व धर्मसंहिता सांगतात त्याप्रमाणेच ही जगरहाटी चालते, या विश्वासावर शिक्कामोर्तब होऊ लागले. विश्वाची कहाणी सांगणाऱ्या धर्मसंस्था व धर्मग्रंथ हे प्रमाण आहेत आणि त्यापलीकडे दुसरे कुठलेही सत्य असू शकत नाही, हा मूलतत्त्ववाद दृढमूल होत गेला. तथापि, याला छेद देणारी चिकित्सेची सुरुवातही त्यापाठोपाठ होऊ लागली. निसर्गातील प्रत्येक घटनेमागे काहीतरी कारणे असतील, ती आपण शोधली पाहिजेत, असे माणसाला वाटू लागले व त्यातूनच विज्ञान जन्माला आले. निरीक्षण (0bservation), परीक्षण (Experiment), विश्लेषण (Analysis) व निष्कर्ष (Instance) या विज्ञानाच्या कसोट्या असतात. एखादे घटित या कसोट्यांवर उतरले, की ते विज्ञान होते. मूलतत्त्ववादाचे तसे नसते. जे ग्रंथात लिहिलेले आहे तेच अंतिम सत्य, असे मूलतत्त्ववादी मानीत असतात आणि त्यामुळेच विज्ञान आणि मूलतत्त्ववाद यातील संघर्ष अटळ ठरतो. दहा हजार वर्षांपूर्वीच्या शेती क्रांतीनंतर अनेक सभ्यता उदयास आल्या. ख्रिस्त पूर्व ५,००० वर्षे ते इसवी सन १,००० वर्षे या काळामध्ये अनेक प्राचीन सभ्यता उदयास आल्या व लयासही गेल्या. या सभ्यतांमध्ये इजिप्शियन सभ्यता, बेबीलोन सभ्यता, सुमेरियन सभ्यता, ग्रीक व रोमन या युरोपीय सभ्यता, सिंधू खोरे सभ्यता, अरब सभ्यता या विशेषकरून नावारूपास आलेल्या सभ्यता होत. जवळजवळ सर्व सभ्यतांमध्ये निसर्गशक्तींना देव मानले जात होते. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे, या सर्व सभ्यतांमध्ये मृत्यूनंतर जीवन असते, यावर विश्वास ठेवला जायचा. मृत व्यक्तींच्या थडग्यांमध्ये रोज लागणाऱ्या वस्तू, तसेच दागदागिने, जवाहिरे ठेवली जायची. यातून काही धार्मिक रूढी परंपराही रुजल्या जात होत्या.

**अभिजात युगातील संघर्ष**

ख्रिस्त पूर्व ५०० ते इसवीसन ५०० हा काळ अभिजात युग म्हणून गणला जातो. हा काळ बौद्धिक जागराचा (Intellectual Consciousness), तसेच सद्विवेक (Consciences) जागृतीचा होता. ग्रीसमधील अथेन्स या शहर राज्यात सॉक्रेटिस (ख्रिस्त पूर्व ४७०-३९९) या तत्त्वज्ञाने बुद्धिप्रामाण्य (Radio al Thinking) ही कसोटी आपली मते व्यक्त करण्यासाठी व अमलात आणण्यासाठी लावण्याचा आग्रह धरला. विवेक व ज्ञान (Season and Knowledge) यावर आधारितच आपली मते आपण बनविली पाहिजेत, असा सॉक्रेटिसचा आग्रह असे. ईश्वराचे व धर्मसंस्थांचे अस्तित्व या कसोट्यांवर टिकत नाही, असे मत तो मांडत असे. अथेन्सचा तरुणवर्ग सॉक्रेटिसचा चाहता होता. अथेन्सच्या शासनकर्त्यांनी त्याला त्याच्या या मताबद्दल व तो तरुणांना चिथावणी देतो या आरोपाखाली त्याची जाहीर निर्भर्त्सना करून त्याला कैदेत टाकले व तो आपली मते बदलण्यास तयार नाही म्हणून त्याला विष पाजून देहांताची शिक्षा दिली. मृत्यूची पर्वा न करता आपल्या मतांवर ठाम राहिलेला हा प्राचीन काळातील पहिला विचारवंत होय.


सॉक्रेटिसचा अनुयायी ॲरिस्टॉटल (Aristotle ख्रिस्त पूर्व ३८४ ते ख्रिस्त पूर्व ३२२) व ॲरिस्टॉटलचा शिष्य प्लेटो ख्रिस्त पूर्व ४२८ ते ख्रिस्त पूर्व ३४८) यांनी सॉक्रेटिसच्या मतांचा पुरस्कार करून त्याचा प्रसार केला. याच काळात इकडे भारतात चार्वाकांनी वैदिक धर्माला आव्हान देऊन बुद्धिप्रामाण्याचा स्वीकार करून मूलतत्त्ववादाला चांगलाच हादरा दिला. याच काळात गौतम बुद्ध (ख्रिस्त पूर्व ५८३ ते ख्रिस्त पूर्व ४६३), वर्धमान महावीर ख्रिस्त पूर्व ५४० ते ख्रिस्त पूर्व ४६८) यांनी हिंदुधर्मातील अनिष्ट रूढींविरुद्ध बंड करून वेगळ्या मानवतावादी धर्मांची स्थापना केली. इसवी सन सहावे ते तेरावे शतक हा काळ अंधार युग (Dark Age) म्हणून गणला जातो. हा मध्ययुगीन काळ (या काळात मानवी सभ्यतांना जणू गाढ झोप लागली अशाच प्रकारचे वातावरण होते. त्यानंतर तेराव्या शतकापासून विज्ञान युग सुरू झाले. १३ ते १९ वे शतक हा काळ पुनर्जागराचा अथवा पुनरुत्थानाचा काळ म्हणून ओळखला जातो.



**पुनरुत्थान (Renaissance) आणि प्रबोधन (Enlightenment) युग**

मध्ययुगीन अंधार युगात युरोप जणू गाढ झोपेत अथवा ग्लानीत होता. बौद्धिक जागरणे उन्नत झालेल्या अभिजात युगापासून तुटलेला होता. हे तुटलेपण पुनर्जागराने अथवा पुनर्जन्माने पुन्हा सांधायला सुरुवात चौदाव्या शतकापासून सुरू झाली. युरोप पुन्हा एकदा मोठी बौद्धिक झेप घेण्यास सिद्ध झाला. या काळात कला चित्रकला, वास्तुकला, मूर्तीकला, विज्ञान तसेच बँकिंग क्षेत्रांत नवीन उड्डाणे होऊ लागली. याची सुरुवात इटलीतील फ्लोरेन्स राज्य प्रजासत्ताकात झाली व त्यांनी संपूर्ण युरोप खंड व्यापला, अभिजात युगातील मानवतावादी विचारांचा पुनर्जागर होऊ लागला. अभिजात युगातील ग्रीक तत्त्वज्ञ प्रोटो गोरस यांनी माणूस हाच जगातील सर्व घटनांचा मोजमाप आहे, असे प्रतिपादन केले होते. हा मनुष्यकेंद्रित मानवतावादी विचार या पुनरुत्थानाच्या काळात पुन्हा झपाट्याने स्वीकारला जाऊ लागला. कला, वास्तुकला, शिल्पकला साहित्य आदी क्षेत्रांत मानवी मूल्यांचे प्रतिबिंब पडू लागले. लिओनार्दो दा विंची, मिशेल अँजेलो यांची चित्रकला फिलिपो ब्रुश्चेलिनी व लॉरेन्झो गिलबल्टी, दांते अले घेरी यांचे साहित्य यात मानवी मूल्यांचे प्रतिबिंब दिसू लागले. राजकारण व प्रशासनात नैतिक मूल्ये जपली पाहिजेत, असा आग्रह मॅकियो व्हॅली याने धरला. या सर्व क्षेत्रांत सुरुवातीच्या काळात कॅथोलिक चर्चची मदत होत होती. तथापि, खगोलशास्त्रातील नव्या संशोधनामुळे चर्च व विज्ञान यात संघर्ष उद्भवला. गॅलिलिओ यांनी कोर्पनिकसचा विश्वाच्या केंद्रस्थानी सूर्य असून, त्याभोवती पृथ्वी व इतर ग्रह फिरतात, असा जो सिद्धांत मांडला होता त्याला पुराव्यानिशी पाठिंबा दिला. स्वतः दुर्बिणीची निर्मिती करून तिच्या साहाय्याने ग्रहताऱ्यांच्या हालचाली त्याने टिपल्या व त्यानुसारच त्याने या सिद्धांताला दुजोरा दिला; परंतु हा सिद्धांत बायबलच्या पृथ्वीकेंद्रित विश्व या लिखाणाविरुद्ध जात असल्याकारणाने कॅथोलिक चर्चच्या रोषाला त्याला तोंड द्यावे लागले. त्याच्याविरुद्ध खटला चालविण्यात आला व तो पाखंडी आहे, असे जाहीर करून त्याला बंदीवासाची शिक्षा ठोठावण्यात आली. गॅलिलिओने माफी मागावी, असा चर्चने आग्रह धरला; परंतु गॅलिलिओ बधला नाही व त्याने हा जन्मकैदेचा स्वीकार केला. पुनरुत्थान काळातील हा संघर्ष खूप गाजला व त्याने मानवी इतिहासाला वेगळे वळण दिले. मूलतत्त्ववाद किती निष्ठुर असतो, याचे हे आणखी एक उदाहरण.

**उत्क्रांतीचा सिद्धांत व चर्च यातील संघर्ष**




चार्ल्स रॉबर्ट डार्विन (१८०९-१८८२) या ब्रिटिश निसर्गशास्त्रज्ञाने ब्रिटिश नौदलाच्या एच.एम.एस.बिगल या जहाजातून १८३१ ते १८३६, असा ५ वर्षांचा सागरी प्रवास करून सजीवांचे निरीक्षण व संशोधन करून १८५९ साली त्याने सजीवांची उत्पत्ती (Origin of Life), सजीवांच्या उत्क्रांतीबद्दलचा सिद्धांत मांडणारा ग्रंथ प्रसिद्ध करून एकच खळबळ उडवून दिली. बायबलमध्ये प्रतिपादन केल्यानुसार सजीव सृष्टी ही एकाच वेळी व एकाच दमात निर्माण झाली नसून, ती हजारो वर्षांच्या उत्क्रांती प्रक्रियेनुसार हळूहळू निर्माण झाली. पृथ्वीवर प्रथम अतिशय साधे जीव निर्माण झाले व या जिवात बदल घडत-घडत व्यामिश्र जीवसृष्टी निर्माण होत गेली व ती प्रक्रिया आजही सुरू आहे, असे या डार्विनच्या ग्रंथात पुराव्यानिशी प्रतिपादन केले होते. पारंपरिक विचारांना उद्ध्वस्त करणारा हा सिद्धांत असल्याने धार्मिक संस्थांनी चर्चने या सिद्धांताला कडाडून विरोध केला व डार्विन पाखंडी आहे, असे घोषित करण्यात आले. तथापि, गॅलेलिओप्रमाणे त्याला धर्मसंस्था शिक्षा करू शकल्या नाहीत. इंग्लंडच्या चर्चेत धर्मगुरू आणि डार्विनचे मित्र आणि उत्क्रांतीवादाचे समर्थक थॉमस हक्सले यांच्यात ऑक्सफर्ड विद्यापीठात वादविवाद झाला. तो वादविवाद हसले यांनी जिंकला. धर्मगुरूंचा पराभव करण्यात उत्क्रांतीवादाचे समर्थक यशस्वी झाले. त्यानंतर केवळ इंग्लंडच्याच नव्हे, तर जागतिक विचारविश्वात बदल घडून येऊ लागले. सृष्टी ही परमेश्वराने निर्माण केली, हे गृहीतत्त्व विचारी विश्वासमोर टिकाऊ धरू शकत नव्हते. तरीही धर्मसंस्था उत्क्रांतीवाद मान्य करीत नव्हत्या. तथापि, १५० वर्षांनंतर चर्चला

आपल्या हट्टी भूमिकेवर पाणी सोडावे लागले व १९९६ साली चर्चने उत्क्रांतीवादाला मान्यता दिली. डार्विनच्या उत्क्रांतीवादाचा हा मोठा विजय होय; परंतु पारंपरिक विचारांचा त्याग करण्याची मानसिकता अजूनही समाजावर असून, असा समाज उत्क्रांतीवादाला विरोध करीत आलेला आहेच. विज्ञान पुराव्यावर आधारित असल्याने ते सत्य हुडकून काढू शकते. आता तर रेनिवा जीवशास्त्र व जणूकशास्त्र या विज्ञानाच्या शाखांत इतकी प्रगती होत आहे, की उत्क्रांतीवादाच्या पुराव्यात नवी-नवी भर त्यामुळे पडत आहे. या वर्षीचे नोबेल पारितोषिक विजेते स्वान्ते पाबो यानी रेनिवा जीवशास्त्राच्या आधारे संशोधन करून मानवी उत्क्रांतीला दुजोरा दिलेला आहे व डार्विनच्या उत्क्रांतीवादाचा सिद्धांत असा सिद्धांत म्हणून पक्का होत आहे. विज्ञान बुद्धीप्रामाण्य मिळायला बळ देते व विचारवंतांची बौद्धिक क्षमता वाढवीत असते आणि म्हणूनच धार्मिक कर्मठपणाला व परंपरांना ते समर्थपणे सामोरे जाऊन त्यांच्याशी मुकाबला करण्यात यशस्वी होते. तरीही विज्ञान आणि मूलतत्त्ववाद यातील संघर्ष थांबलेला नाही. काळाच्या ओघात अशा संघर्षाच्या ठिणग्या वेळोवेळी पडलेल्या आहेत व आजही त्या पडत आहेत. सामाजिक व धार्मिक सुधारणांना सुरुवात अभिजात युगातच म्हणजे पहिल्या मानवी जागरापासून झाली होती. सॉक्रेटिस हा त्याचा उद्गाता होता. मधल्या मध्ययुगीन अंधार युगात काहीही घडले नाही. त्यानंतर पुनरुत्थानाच्या काळात म्हणजे पुनर्जागराच्या काळात अनेक विचारवंतांनी धार्मिक व सामाजिक अंधश्रद्धा व चुकीच्या परंपरा यावर घणाघात करायला सुरुवात केली. मार्टिन ल्युथर या जर्मन धर्मगुरूने रोमन कॅथोलिक चर्चच्या अन्याय्य परंपरांवर हल्ला करून रोमन कॅथॉलिक चर्चचा रोष ओढवून घेतला. माफी मागत नाही म्हणून रोमन कॅथोलिक धर्मगुरूंनी मार्थिन ल्युथर यांना धर्माबाहेर काढले. ल्युथरने प्रोटेस्टंट पंथ स्थापन करून आपला लढा चालूच ठेवला. इकडे भारतातील संत-महात्म्यांनी वाईट रूढी परंपरांविरुद्ध लढा पुकारला. त्यात संत तुकाराम हे अग्रस्थानी होते. अलीकडे अमेरिकन मार्टिन ल्युथर किंग ज्युनिअर यांनी वंशवादाविरुद्ध लढा पुकारला. दक्षिण आफ्रिकेतील नेल्सन मंडेला यांनी दीर्घकाळ वंशवादाविरुद्ध लढा पुकारून दीर्घकाळ कारावास भोगला. या सर्व लढाया अनिष्ट रूढी व परंपरांविरुद्ध होत्या व या लढायांचा पाया बुद्धिप्रामाण्यवाद होता. त्याला विज्ञानाची जोड होती.



**सॉक्रेटिस ते दाभोलकर : सत्यशोधनाचा स्फूर्तीदायी लढा**

प्रत्येक व्यक्तीने आपली मते ज्ञान व विवेक यावरच आधारित असावीत, अशी स्पष्ट मांडणी सॉक्रेटिसची होती. हेच बुद्धिप्रामाण्य (Rationalism) होय. बुद्धी प्रामाणिक व विज्ञान या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत. परिवर्तनाच्या लढाया याच तत्त्वांच्या आधारे लढल्या गेल्या व लढल्या जात आहेत. डॉ. नरेंद्र दाभोलकर हे अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून परिवर्तनाची लढाई लढत होते. बरेच जण श्रद्धा व अंधश्रद्धा यात गल्लत करीत असतात. विवेकावर आधारित विश्वास म्हणजे श्रद्धा, तर अविवेकावर आधारित असलेला विश्वास म्हणजे अंधश्रद्धा, हे बऱ्याच जणांना समजत नसल्याने श्रद्धा व अंधश्रद्धा यांची गल्लत केली जाते. यात स्पष्टता असणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, महात्मा गांधींवर व त्यांच्या कार्यांवर माझा विश्वास असणे ही माझी महात्मा गांधींवर असलेली श्रद्धा. तथापि, अंगात येणारी व्यक्ती देव असते किंवा माणसाचे धड व प्राण्याचे तोंड असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाला देव मानणे ही अंधश्रद्धा होय. कारण येथे विवेकाला कोणतेही स्थान नसते. डॉ. नरेंद्र दाभोलकर याच अंधश्रद्धांविरुद्ध लढले व पारंपरिक धार्मिक विचारांचा अनुनय करणाऱ्या जनसमूहाचा त्यांनी रोष ओढवून घेतला; परंतु ते कधीच डगमगले नाहीत व शेवटपर्यंत लढत राहिले. वैचारिक लढाईत आपण पराभूत होतो व होत आहोत याचा राग परंपरावाद्यांना येत राहिला आणि म्हणून त्यांना ठार मारून संपविण्यात आले. दाभोलकर सॉक्रेटिसचीच परंपरा चालवीत होते व लोकांना विवेकाचा मार्ग दाखवण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न करीत होते. संत तुकाराम महाराज यांचे विवेकवादी विचार पचविता येत नाहीत म्हणून त्यांचे लिखाण, त्यांची गाथा इंद्रायणीत बुडवून व त्यांना सदेह वैकुंठाला पाठवून परंपरावाद्यांनी जसे कृत्य केले, तसेच या आधुनिक काळात त्याच परंपरावाद्यांनी दाभोलकरांच्या बाबतीतही केले, हे इथे नमूद केले पाहिजे. सध्या आपल्या देशात परंपरावाद्यांनी पुन्हा डोके वर काढले आहे व ते विज्ञानाचा व बुद्धिप्रामाण्यवादाचा पराभव करण्यासाठी टपलेले आहेत; परंतु व्यक्ती संपविल्या तरी विज्ञान व बुद्धिप्रामाण्यवाद कधीच संपणार नाही, हे त्यांनी लक्षात घेतलेले बरे...

**(लेखक प्राणिशास्त्राचे अभ्यासक व संशोधक आहेत.)**

# काँग्रेसमध्ये सुरु झाले नव्या अध्यक्षांचे नवे पर्व





विजय नाईक

**''काँग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवावी, अशी पक्षश्रेष्ठींनी मला गांभीर्यपूर्वक (इम्प्लॉर) विनंती केली,'' असे या पदाचे उमेदवार व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी अलीकडे सांगितले. याचा अर्थ, या पदाच्या निवडणुकीसाठी शशी थरूर यांनी स्वतंत्रपणे अर्ज भरला असला, तरी सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियांका गांधी-वड्रा, तसेच काँग्रेसच्या कार्यकारिणीचा खरगे यांना औपचारिक पाठिंबा असल्याचे स्पष्ट झाले.**

''काँग्रेसमध्ये केवळ घराणेशाही आहे,'' असा पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजप आरोप करीत आहे. खरगे यांच्या उमेदवारीने त्याला कायमचा आळा बसावा, अशी अपेक्षा आहे. ते निवडून आले, की भाजप वेगळ्या आरोपाचा सूर लावेल. तो म्हणजे, ''खरगे अध्यक्ष झाले असले, तरी खरे सूत्रचालन सोनिया, राहुल व प्रियांका हेच करतील. सारांश, खरगे हे केवळ त्यांच्या हातातील कळसूत्री बाहुले असतील.'' रिमोट कन्ट्रोल या तिघांच्या हातात असेल. हाच न्याय भाजपला लावायचा झाला, तर अध्यक्षपदाची कोणतीही निवडणूक न लढलेले व केवळ मोदी व अमित शहा यांची मर्जी होती, म्हणून जगतप्रसाद नड्डा यांची भाजपच्या अध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली. सारांश, ''नड्डा हे मोदी व शहा यांच्या हातातील कळसूत्री बाहुले आहे, त्यांचा रिमोट कन्ट्रोल मोदी, शहा यांच्या हातात आहे, असेही म्हणता येईल.'' एक गोष्ट निश्चित, की पक्षाच्या अध्यक्षपदासाठी कधीच निवडणुका न घेणारा भाजप व काही का होईना, गेल्या २२ वर्षांत प्रथमच अध्यक्षपदाची निवडणूक घेणारा काँग्रेस पक्ष, यातील फरक जनतेला निश्चितच कळेल.

**गहलोतांना मुख्यमंत्रिपद सोडवेना**

नाव निश्चित होताच खरगे यांनी राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा दिला. 'एक व्यक्ती, एक पद' या नियमाला ते अनुसरून आहे. अध्यक्षपदाच्या चर्चेत राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गहलोत यांना अध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी पक्षाचा पाठिंबा मिळूनही त्यांना मुख्यमंत्रिपद सोडवेना. त्यांना ते तर हवे होतेच; पण अध्यक्षपदही हवे होते. दोन्ही पदांवर त्यांचा डोळा आहे, असे स्पष्ट होताच, 'भारत जोडो यात्रेवर' असलेल्या राहुल गांधी यांनी 'एक व्यक्ती, एक पद' या संकेताचा पुनरुच्चार केल्याने गहलोत यांचे मुसळ केरात गेले; परंतु कोणत्याही परिस्थितीत सचिन पायलट यांच्याकडे मुख्यमंत्रिपद जाऊ द्यावयाचे नाही, असा विडा उचलून, गहलोत यांच्या सांगण्यानुसार त्यांच्या पाठीराख्या ९० आमदारांनी बंड केले. त्यामुळे गहलोत यांचे मुख्यमंत्रिपद वाचले असले, तरी ते काही काळापुरते, असे मानले जाते. त्यांच्या बंडखोरीमुळे सोनिया व राहुल गांधी बरेच नाराज असून, त्यांना आज तरी काही करता येत नाही. कारण, राजस्थानव्यतिरिक्त देशात केवळ छत्तीसगढ हे दुसरे राज्य काँग्रेसकडे आहे. महाराष्ट्रातील फुटीर शिवसेनेचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासारखे भाजपमध्ये जाण्याचे गहलोत यांनी पाऊल टाकले, तर राजस्थानही काँग्रेसच्या हातून जाईल, असा धोका उद्‌भवतो.

**'आय एम नॉट ए स्लीपिंग (वर्किंग) प्रेसिडेन्ट'**

काँग्रेसच्या अलीकडील इतिहासाकडे पाहिल्यास असे दिसते, की इंदिरा गांधी यांच्या काळात पक्षाचे अध्यक्षपद व पंतप्रधानपद ही दोन्ही पदे त्यांच्याकडे होती. म्हणजे एक व्यक्ती दोन पदे ही प्रथा होती. इंदिरा गांधी यांच्या काळात माजी संरक्षणमंत्री बाबू जगजीवन राम (दलित) कार्यकारी अध्यक्ष होते. त्यावेळीही ''सारे राजकारण इंदिरा गांधी करतात, बाबूजी केवळ नावापुरते आहेत,'' अशी टीका झाली, तेव्हा नाराज होऊन ते म्हणाले होते, ''आय एम नॉट ए स्लीपिंग (वर्किंग) प्रेसिडेन्ट.'' नंतरच्या काळात ती दोन्ही पदे राजीव



गांधी यांच्याकडे होती; परंतु कार्यबाहुल्यामुळे अर्जुन सिंग यांना त्यांनी काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी नेमले. अलीकडच्या काळातील ते काँग्रेसचे पहिले उपाध्यक्ष होते. ''ते काँग्रेस नेत्यांना राजीव गांधी यांना भेटण्यास वारंवार अडसर निर्माण करीत आहेत,'' अशा तक्रारी सातत्याने आल्याने राजीव गांधीही नाराज झाले होते. नंतर आलेल्या पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव यांनी पक्षाध्यक्षपद स्वतःकडे ठेवले. त्यामुळे सोनिया गांधी इतक्या नाराज झाल्या, की पक्षाध्यक्षपदाच्या निवडणुका झाल्याच पाहिजेत, असे ठरवून त्यांनी सीताराम केसरी यांना पक्षाध्यक्षपदाचा उमेदवार केले. त्यांच्याविरुद्ध शरद पवार यांनी निवडणूक लढविली. केसरी यांना आठशे मते जास्त मिळून ते निवडून आले. तेव्हापासून, 'एक व्यक्ती, एक पद' हा नियम अमलात आला. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी सोनिया गांधी पक्षाध्यक्ष झाल्या व डॉ. मनमोहन सिंग यांची पंतप्रधानपदी निवड झाली. ''डॉ. सिंग यांच्यामागून सोनियाच सरकार चालवीत होत्या,'' अशी जोरदार टीका विरोधकांनी केली. मधल्या काळात एकदा सोनिया, तर एकदा राहुल गांधी अध्यक्ष झाले. खरगे निवडून आल्यावर सोनिया गांधी, राहुल गांधी हे भाजपतील लालकृष्ण अडवानी, मुरलीमनोहर जोशी या नेत्यांप्रमाणे पक्षाच्या मार्गदर्शक मंडळाचे सदस्य बनण्याची सुतराम शक्यता नाही, तसेच मार्गदर्शक मंडळ काँग्रेसमध्ये नाही. कदाचित काँग्रेस हाय कमांडचे एखादे सल्लागार मंडळ नेमून त्याचे अध्यक्षत्व सोनिया गांधी यांना दिले जाईल. 'भारत जोडो' यात्रेनंतर खरगे यांना उपाध्यक्ष राहुल गांधी यांच्या साह्याने काँग्रेसची पुनर्बांधणी करावी लागेल. त्यावेळी खरगेंचे प्रतिस्पर्धी शशी थरूर यांना हे दोन नेते सामावून घेतात, त्यांना नवी जबाबदारी देतात, की त्यांना दूर ठेवतात, हे पाहावे लागेल.

काँग्रेसच्या एका ज्येष्ठ नेत्यानुसार, ''खरगे मूळचे कर्नाटकचे आहेत, त्याचा लाभ राज्याच्या २०२३ मध्ये होणाऱ्या विधानसभेच्या आगामी निवडणुकांत पक्षाला होण्याची शक्यता आहे. काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री व विधानसभेतील विद्यमान विरोधी पक्षनेते सिद्धरामैया यांची लोकप्रियता ध्यानात घेता, काँग्रेस पक्ष भाजपला आव्हान देऊ शकेल,'' असा राजकीय गोटाचा होरा आहे. कर्नाटकातील देवणगेरे येथे सिद्धरामैया यांचा ७५ वा वाढदिवस ऑगस्टमध्ये साजरा झाला, त्याला असलेली लाखो लोकांची उपस्थिती, राहुल गांधी, सरचिटणीस के.सी. वेणुगोपाळ, प्रांताध्यक्ष डी.के. शिवकुमार तसेच सिद्धरामैया यांचे विरोधक के.एच. मुनिअप्पा व एस.आर. पाटील यांना निमंत्रणे देण्यात आली होती. अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेताच, खरगे यांना कर्नाटक काँग्रेसमधील मतभेद संपुष्टात आणून पक्षऐक्य साधावे लागेल, तसेच एच.डी. देवगौडा यांच्या जनता दल (यू.एफ) यांच्याबरोबर निवडणूक समझोता करता येईल काय, हेही चाचपावे लागेल. दुसरीकडे, भाजपच्या केंद्रीय संसदीय मंडळाचे सदस्य व माजी मुख्यमंत्री बी.एस. येडियुरप्पा यांना दिल्लीतील आपले स्थान टिकवायचे असेल, तर भाजपचे विद्यमान मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांना व पक्षाला पुन्हा निवडून आणावे लागेल.

**पक्षाचे ज्येष्ठ नेते म्हणून ते प्रभावीपणे काम करू शकतील**

इतके दिवस चर्वितचर्वण करून काँग्रेसने अखेर खरगे यांना का निवडले? त्याआधी व्हायचा तो घोळ झालाच. चुरशीत मध्य प्रदेशचे नेते दिग्विजय सिंग, कमलनाथ, मुकुल वासनिक यांनीही आपली वर्णी लागतेय काय, हे पाहण्याचा प्रयत्न केला. खरगे हे काँग्रेसचे अनेक वर्षे लोकसभेतील ज्येष्ठ नेते असून, सरकारविरुद्ध आलेल्या अनेक चर्चा त्यांनी गाजविल्या. त्यांना इंग्रजी, हिंदी, कन्नड आदी भाषा अवगत आहेत. त्यामुळे उत्तर भारतात पक्षाचा प्रचार करण्यास खरगे यांना अडचण येणार नाही. हिमाचल प्रदेशात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. तेथे खरगे यांना लक्ष केंद्रित करावे लागेल. त्यांना राहुल गांधी यांचे साह्य मिळेल. प्रियांका गांधी-वड्रा त्यात कितपत भाग घेतात, हे पाहावे लागेल. तथापि, सोनिया गांधी यांची प्रकृती अधूनमधून बरी राहत नसल्याने प्रचारात त्या अपवादात्मकच भाग घेतील, असे दिसते. राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपदाचा खरगे यांनी राजीनामा दिला आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते म्हणून ते प्रभावीपणे काम करू शकतील. दरम्यान, सोनिया गांधी यांना प्रभावी नेत्याला त्यांच्या जागी नेमावे लागेल.



**सरकारच्या जनताविरोधी धोरणांवर सभागृहात घणाघाती हल्ला**

२०२४ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी विरोधकांना एकत्र आणण्यासाठी खरगे तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार व तेलंगणात नवा राष्ट्रीय पक्ष (भारत राष्ट्र समिती) स्थापन केलेले मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव, पश्चिम बंगालच्या तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष व मुख्यमंत्री ममता बॅनर्जी व अन्य विरोधी पक्षांना एका व्यासपीठावर आणण्याचे आव्हान खरगे व अन्य नेत्यांपुढे आहे. खरगे यांना राजकारण व प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव आहे. १९६९ मध्ये त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला, तेव्हापासून गेल्या ५३ वर्षांत त्यांनी पक्षबदल केला नाही. काँग्रेसशी ते एकनिष्ठ राहिले, हा महत्त्वाचा निकष त्यांच्या अध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी उपयोगी ठरला. त्यांना कामगार चळवळीचा अनुभव आहे. संसदीय कामकाजात आजवर ते हिरीरीने भाग घेत आले आहेत. कोणताही सभापती असो, खरगे यांच्या ज्येष्ठतेचा त्यांनी आदर केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आलेल्या सरकारच्या जनताविरोधी धोरणांवर सभागृहात घणाघाती हल्ला करायला खरगेंनी मागे-पुढे पाहिले नाही.

**काँग्रेसला पुनरुज्जीवित करण्याची मोठी जबाबदारी खरगेंवर**

त्यांच्या पूर्वपीठिकेकडे पाहिल्यास दिसते, की काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यावर ते गुलबर्गा शहर काँग्रेसचे अध्यक्ष बनले. १९७२ मध्ये त्यांनी कर्नाटक विधानसभेच्या निवडणुका गुरमितकल या मतदारसंघातून यशस्वीपणे लढविल्या. त्यांच्या अध्यक्षतेखाली ऑक्ट्रॉय रद्द करण्यासंदर्भात नेमलेल्या समितीच्या शिफारसींनुसार, मुख्यमंत्री देवराज अर्स यांच्या सरकारने अनेक स्थानकांवरील हा कर रद्द केला. १९७४ मध्ये प्राथमिक शिक्षण खात्याचे मंत्री म्हणून खरगे यांनी अनुसूचित जाती जमातींच्या रिक्त असलेल्या तब्बल १६ हजार जागा भरून एक प्रकारचा उच्चांक केला. नंतर आलेल्या मुख्यमंत्री गुंडूराव यांच्या मंत्रिमंडळात महसूलमंत्री, मुख्यमंत्री बंगारप्पा यांच्या मंत्रिमंडळात महसूलव्यतिरिक्त ग्रामीण विकास व पंचायत राज खात्याचे मंत्री, मुख्यंमंत्री एम. वीरप्पा मोइली यांच्या मंत्रिमंडळात सहकार व मध्यम व मोठ्या उद्योग खात्याचे मंत्री, मुख्यमंत्री एस.एम. कृष्णा यांच्या मंत्रिमंडळात कर्नाटकाचे गृहमंत्री, मुख्यमंत्री धरमसिंग यांच्या मंत्रिमंडळात वाहतूकमंत्री, अशी अनेक महत्त्वपूर्ण पदे व जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या. कर्नाटक विधानसभेत तब्बल नऊ वेळा जिंकलेले खरगे २००५ मध्ये कर्नाटक प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष झाले. हा एक उच्चांक मानला जातो. २०१४ च्या लोकसभेच्या निवडणुकीत ते गुलबर्गा मतदारसंघातून भाजपच्या उमेदवाराचा दणदणीत पराभव करून निवडून आले. मोदी यांची लोकप्रियता व झंझावाती नेतृत्वाच्या लाटेतही त्यांनी यश मिळविल्याने त्यांना लोकसभेतील काँग्रेस पक्षाच्या नेतेपदी नेमण्यात आले. तथापि, या यशाची परंपरा मोडली, ती २०१९ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांनी. त्यावेळीही ते गुलबर्ग्याहून उभे राहिले. तथापि, भाजपचे उमेदवार उमेश जाधव यांनी त्यांचा ९५,४५२ मताधिक्याने पराभव केला. १२ जून १९७८ रोजी खरगे यांची पक्षातर्फे राज्यसभेवर निवड झाली. १२ फेब्रुवारी २०२१ रोजी त्यांना राज्यसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी नेमण्यात आले. ही कारकीर्द अल्प होती. कारण १ ऑक्टोबर, २०२२ रोजी काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी १७ ऑक्टोबरला होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला. त्यावेळी अनुमोदक म्हणून दिग्विजय सिंग, ए.के. अँटनी, अंबिका सोनी, प्रमोद तिवारी, सलमान खुर्शीद, मुकुल वासनिक, अविनाश पांडे, पवन बन्सल, मनीष तिवारी, पृथ्वीराज चव्हाण, कुमारी सेलजा, तारिक अन्वर, भूपिंदर हुडा, आनंद शर्मा, पी.एल.



पुनिया आदी ज्येष्ठ नेत्यांची उपस्थिती, सोनिया गांधी, निष्ठावंतांचा त्यांना किती पाठिंबा आहे, हे दर्शविते. हा तपशील देण्याचे कारण, वयाच्या ८० व्या वर्षी काँग्रेसला पुनरुज्जीवित करण्याची मोठी जबाबदारी काँग्रेसने खरगे यांच्या खांद्यावर टाकली आहे, हे होय, तसेच त्यांच्यावर विश्वास व्यक्त केला आहे, हे दर्शविते.

**काँग्रेस व विरोधकांच्या दृष्टीने कसोटी**

गेली अनेक वर्षे काँग्रेसमध्ये 'ओल्ड गार्ड' व 'युवानेते' यांच्यात पक्ष कसा चालवावा, याबाबत तीव्र मतभेद झालेले आहेत. काँग्रेस कार्यकारिणीतील अनेक सदस्य बिनबुडाचे होते व आजही आहेत. राहुल गांधी यांचे स्नेही ज्योतिरादित्य शिंदे, जम्मू-काश्मीरचे माजी मंत्री आर.एस. छिब, काँग्रेस नेते जी.एम. सरूरी, हाजी अब्दुल राशीद, महंमद अमीन भट, गुलजार अहमद वानी व चौधरी महंमद अकरम यांनी राजीनामे दिले. याव्यतिरिक्त जयवीर शेरगिल, कपिल सिब्बल, सुनील जाखड आदींनी पक्षाला रामराम ठोकला. गुलाम नबी आझाद यांनी जम्मू-काश्मीरमध्ये नवा 'आझाद काँग्रेस पक्ष' स्थापन केला. हिमाचलचे राज्यसभेतील नेते आनंद शर्मा यांनीही राहुल गांधी व त्यांच्या निकटवर्तीयांवर जोरदार हल्ला चढविला. या गळतीकडे पाहता, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आणखी गळती होऊ नये, यासाठी खरगे यांना प्रयत्न करावे लागतील. हिमाचल, गुजरात व कर्नाटकमधील निवडणुका, ही काँग्रेस व विरोधकांच्या दृष्टीने कसोटी ठरणार आहे. किंबहुना, त्यातील यशापयशावर २०२४ मधील पक्षाचे यशापयश अवलंबून राहील.

**'रबर स्टॅम्प' म्हणून काम करण्याची शक्यता नाही**

राजकीय निरीक्षकांनुसार, ''खरगे हे गांधी परिवाराशी एकनिष्ठ असले, तरी अध्यक्ष झाल्यावर 'रबर स्टॅम्प' म्हणून काम करण्याची शक्यता नाही.'' या निवडणुकीमुळे गेल्या २२ वर्षांत प्रथमच पक्षाला 'नॉन गांधी' नेता मिळणार आहे. ते दलित असल्याने दलित समाजात समाधान तर आहेच; परंतु त्यांच्यासाठी एक नवे आशास्थान निर्माण झाले आहे. ६६ वर्षीय शशी थरूर यांचा पराभव झाला, तरी त्यांच्यासारख्या उमद्या व जागतिक कीर्तीच्या लेखकाला ते दूर सारतील, असे दिसत नाही. दोघेही दक्षिणेचे. पक्षासाठी थरूरही उत्तम प्रचारक म्हणून कार्य करू शकतात. यावेळी खरगे यांना एक गोष्ट ध्यानात ठेवावी लागेल, की काँग्रेसमुक्त भारताची, भारतीय जनता पक्षाने सातत्याने चालविलेली घोषणा काही पोकळ नाही. २०२४ च्या निवडणुकीत काँग्रेसच्या जिंकणाऱ्या सदस्यांची संख्या ५३ पेक्षा खाली आल्यास कालांतराने निवडणूक आयोगाच्या दृष्टीने राजकीय मान्यता गमावण्याची वेळ येईल. या सर्व गोष्टींची खरगे व काँग्रेसच्या नेत्यांना गंभीर व वेळीच दखल घ्यावी लागेल.

**खरगेंना जुन्या - नव्यांचा समन्वय साधावा लागेल**


देशात आजही भारतीय जनता पक्ष व काँग्रेस यांच्याकडे राष्ट्रीय पक्ष म्हणून पाहिले जाते. बाकीच्या पक्षांचे स्वरूप प्रादेशिक आहे. त्यातही एकमेकांचे हेवेदावे, महत्त्वाकांक्षा, प्रादेशिक अस्मिता, काँग्रेस, सोनिया गांधी, राहुल गांधी व प्रियांका गांधी यांच्याबाबत असलेले वैयक्तिक आकस, खरगे यांना दूर करावे लागतील. त्याबाबत भारतीय जनता पक्षाच्या प्रचारतंत्राला 'जशास तसे' उत्तर द्यावे लागेल. राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो पदयात्रेचा' त्यासाठी किती लाभ होतो, हे लवकरच कळेल. खरगे यांना ओल्ड गार्ड व युवानेते या दोघांचा समन्वय साधून व त्यांना बरोबर घेऊन वाटचाल करावी लागेल.

असंतुष्टांचा तथाकथित 'जी-२३ गट' आता काय पावले टाकतो, हे पाहावे लागेल. या गटाला संपूर्णपणे पक्षाचे नूतनीकरण हवे होते. गटातील बव्हंशी नेत्यांचा खरगे यांना पाठिंबा मिळालाय. निवडणुकीने गटाची महत्त्वाची मागणी पूर्ण झाली आहे. राजकीय पक्षाचे सत्तेवर असणे आणि नसणे, याचे काय काय परिणाम होतात, हे गेली काही वर्षे आपण पाहत आहोत. 'काँग्रेसची धर्मनिरपेक्षता ही बेगडी नाही,' हे खरगे कशा तऱ्हेने जनता व मतदाराला पटवून देतात, भाजपच्या हिंदुत्वाचे आव्हान कसे स्वीकारतात, यावर बरेच काही अवलंबून राहील. ●●●

**(लेखक दिल्लीस्थित ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ बदलतो आहे का ?





लक्ष्मीकांत देशमुख

**देशाच्या दृष्टीने आता सर्वांत महत्त्वाचा प्रश्न कोणता असेल, तर तो हा आहे, की संघ परिवार (संघ निगडित संस्था व संघटना-भाजपसह) शंभराव्या वर्षात पदार्पण करीत असताना व्यापक देशहितासाठी व २०४७ म्हणजे भारतीय स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवी वर्षापर्यंत एक विकसित व सामाजिकदृष्ट्या समता व बंधुता असणारा भारत देश निर्माण करण्यासाठी बदलणार आहे का ?**

विजयादशमीच्या दिवशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या यंदाच्या होणाऱ्या वार्षिक दिशादर्शक भाषणाकडे देशातील अनेक बुद्धिमंतांचे लक्ष लागले होते. त्याची कारणे प्रामुख्याने दोन होती. पहिले कारण म्हणजे भागवतांचा मागील काही महिन्यांत मुस्लीम बुद्धिमंत व्यक्ती व धर्मगुरूंशी वाढलेला सुसंवाद आणि सरकार्यवाह दत्तात्रय होसाबाळे यांनी स्वदेशी जागरण मंचच्या सभेत वाढती आर्थिक विषमता आणि बेरोजगारीबाबत केलेले परखड मतप्रदर्शन! या दोन्हीतून संघ परिवाराने मोदीप्रणीत केंद्रीय सरकारला गर्भित इशारा दिला आहे की काय, अशी चर्चा दबक्या आवाजात भाजप वर्तुळात आणि प्रसारमाध्यमांत सुरू झाली होती. त्या पार्श्वभूमीवर मोहन भागवतांच्या भाषणाने साफ निराशा केली, असे म्हणणे वाजवी ठरेल. कारण गोळवलकर गुरुजींच्या विचार धन (बंच ऑफ थॉट्स) पुस्तकाला शिरोधार्य मानल्यामुळे मुस्लिमांबाबतचे द्वेष, आकस, भीती आणि गंड (अहं आणि न्यूनगंड दोन्ही) या संघाच्या लोकांच्या संमिश्र मानसिकतेमध्ये इतक्या सहजासहजी बदल होणार नाहीत, हे मोहन भागवत चांगलेच ओळखत असतील. त्यामुळे त्यांनी मुस्लिमांशी सुरू केलेला संवाद हे अत्यंत प्राथमिक पाऊल आहे, याचे भान न ठेवता समाजमाध्यमांत याबाबत फार काहीतरी मूलभूत बदल संघात होण्याची शक्यता आहे, अशी समाजमाध्यमे व एका बुद्धिजीवीवर्गातली चर्चा उताविळेपणाची होती, त्यामुळे एक प्रकारे त्यांचा मुखभंग झाला, असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा.

### ...मात्र, त्याची किंचित चाहूल जाणवत आहे

दुसरे कारण म्हणजे विजयादशमीच्या भाषणात दत्तात्रय होसाबाळे यांनी वाढती आर्थिक विषमता आणि बेरोजगारीबाबत केलेल्या परखड भाष्याबाबत सरसंघचालक मोदी सरकारला काही दिशादिग्दर्शन करतील, ही अपेक्षा होती. त्याबाबत स्वयंरोजगार आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांवर भर देणारे विचार मोहन भागवतांनी मांडले. ते अर्थातच आजचे भारताचे महागाई व बेरोजगारीचे मोठे संकट पाहता केवळ तोंडी लावण्याजोगे होते, असे अनेकांना वाटू शकेल. थोडक्यात काय, धार्मिक सौहार्द आणि अर्थकारण या भारतापुढील दोन प्रमुख समस्यांसंदर्भात संघाच्या भूमिकेत परिवर्तन होण्याची शक्यता आहे काय, या प्रश्नाचे उत्तर नाही असे स्पष्ट नसले, तरी होय असेही नाही. मात्र, त्याची किंचित चाहूल जाणवत आहे, असे म्हटले तर अवाजवी होणार नाही.

### भागवतांच्या भाषणाआधी अवास्तव वातावरणनिर्मिती

आज संघ विचारधारा शिरोधार्य मानणारे सरकार केंद्रात व डझनभर राज्यांत तरी राज्य करीत आहे. जगण्याच्या व रोजीरोटीच्या प्रश्नांपेक्षा हिंदुत्व महत्त्वाचे मानणाऱ्या आणि मोदीभक्तीची भूल न उतरलेल्या मतदारांचा भ्रमनिरास झाला नाही, तर कदाचित २०२४ साली विस्कळीत विरोधी पक्षांमुळे पुन्हा भाजप सत्तेवर येण्याची शक्यता अनेक राजकीय अभ्यासक व्यक्त करीत आहेत. अशा पार्श्वभूमीवर भागवत विजयादशमीच्या वार्षिक संबोधनात फार काही मूलभूत बदल सुचविणारे बोलतील व सरकारला मात्रेचे चार वळसे चाटवतील ही शक्यता नव्हतीच, हे संघ अभ्यासकांना माहीत होते;

पण टीआरपीच्या काळात असे कधी गडद तर कधी दुही माजविणारे भ्रम पैदा करणे ही आज पत्रकारितेची-खासकरून वृत्तवाहिन्यांची मजबुरी झाली असल्यामुळे भागवतांच्या भाषणाआधी अवास्तव वातावरणनिर्मिती केली गेली, त्यामुळे भाषणानंतर श्रोत्यांची तीव्र निराशा झाली असणार, हे समजता येते.

**मोदी-भागवत यांचे फाइन ट्युनिंग**

२०२५ साली संघ शंभरीत पदार्पण करीत आहे व त्यानंतरच्या वाटचालीसाठी भाजप पुढील लोकसभा निवडणुकीनंतर केंद्रात सत्तेवर असणे संघासाठी महत्त्वाचे आहे. एनडीए-एकच्या काळात पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी व सरसंघचालक के. सुदर्शन यांच्यात कायम तणाव होता व सुदर्शन ते जाहीरपणे व्यक्त करायचे; पण आज संघात मोदी वयाने व अनुभवाने वरिष्ठ आहेत आणि मोहन भागवत हे अत्यंत मुरब्बी नेते आहेत. सुसंवाद राखीत संघाचा सांस्कृतिक राष्ट्रवादाचा अजेंडा त्यांनी मोदींमार्फत मागील आठ वर्षांत बऱ्याच प्रमाणात साकार करून घेतला आहे. त्यामुळे चर्चा व संवाद याद्वारेच तेही बंद दाराआडच सूचना देऊन भागवत मोदींना आपले विचार सांगतील आणि उपाययोजना सुचवितील. पूर्वी संघास भाजपची सत्ता असणे आजच्या इतके महत्त्वाचे वाटत नव्हते; पण आज एक कट्टर स्वयंसेवक पंतप्रधान आहेत व त्यांच्यामुळे संघाच्या कामास प्रचंड बळ मिळते आहे, त्यामुळे मोदी-भागवत यांचे फाइन ट्युनिंग आहे. हे या भाषणाने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

देशाच्या आर्थिक परिस्थितीचे संघाचे आकलन भिन्न असले तरी त्यासाठी मोदींशी पंगा घेण्याची गरज नाही. चर्चा करून आपले मत त्यांच्या गळी उतरविता येऊ शकते, हे मुरब्बी भगवतांना माहीत आहे. त्यामुळे त्यांचे विजयादशमीचे भाषण लेखाच्या सुरुवातीला ज्या दोन बाबींचा उल्लेख केला, त्यादृष्टीने असणार नव्हतेच.




**संघाची विचारधारा उदारमतवादी परंपरा नाकारणारी!**

आता देशाच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचा प्रश्न कोणता असेल, तर तो हा आहे, की संघ परिवार (संघ निगडित संस्था व संघटना-भाजपसह) शंभराव्या वर्षांत पदार्पण करीत असताना व्यापक देशहितासाठी व २०४७ म्हणजे भारतीय स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवी वर्षापर्यंत एक विकसित व सामाजिकदृष्ट्या समता व बंधुता असणारा भारत देश निर्माण करण्यासाठी बदलणार आहे का? आज संघ परिवार ही एक मोठी देशभर पसरलेली (त्यांच्या मते) सांस्कृतिक संघटना आहे. तिच्याकडे तुम्हास मान्य असो वा नसो, स्वतःची एक विचारधारा आहे (ती मला व्यक्तिशः जुनाट, प्रतिगामी आणि भारतीय संविधानाला मान्य नसणाऱ्या हिंदुराष्ट्र-तेही पुन्हा चातुर्वर्ण्य व मनुस्मृती मानणाऱ्या हिंदुराष्ट्र स्थापन करण्याचे ध्येय बाळगून असल्यामुळे अस्वीकारनीय आहे). आपल्या ध्येयासाठी संघाकडे निःस्वार्थ व झोकून देऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची प्रचंड संख्या आहे. संघाचे काही सेवाप्रकल्प चांगले आहेत; पण एकूणच त्यांची विचारधारा भारताच्या सहिष्णू व उदारमतवादी स्वभाव, वृत्ती आणि परंपरा नाकारणारी आहे.

**संघाची मानसिकता आजही गोळवलकर गुरुजींच्या विचारांवर**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात (ज्यापासून संघ संघटन एके संघटन करीत अलिप्त राहिला) जी राष्ट्रनिर्माण व विकासाबाबतची मूल्ये विकसित झाली व जी भारतीय संविधानात समाविष्ट झाली, ती कोणती होती? संक्षेपाने सांगायचे झाले तर भारत हा सार्वभौम लोकशाहीवादी गणतंत्र देश असेल व सर्व नागरिकांना जात धर्म व लिंग, असा कोणताही भेदभाव न करता स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय (सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय) मिळेल. समाजवाद, सर्वधर्मसमभाव आणि मानवी प्रतिष्ठा व सन्मानाने जगण्याची हमी हे संविधान देते. हा देश जसा सहिष्णू व उदारमतवादी आहे तसाच तो बहू धार्मिक, बहू सांस्कृतिक व बहुभाषक, असा विविधतेने नटलेला तरी आंतरिक एकात्मता असणारा आहे. ही मूल्ये व हा विचार पं. नेहरूंनी जाणीवपूर्वक रुजवला व विकसित केला. त्यातून आधुनिक नागरी राष्ट्रवाद (ज्याचा आधार संविधान आहे) आकारास आला; पण संघ हा राष्ट्रवाद नाकारतो. त्यांच्यासाठी भारत हा केवळ हिंदू धर्मीयांचा देश आहे म्हणून येथे हिंदूंचे सर्व क्षेत्रांत प्राथम्य असेल. संघ जो सांस्कृतिक राष्ट्रवाद पुरस्कारतो, तो खरे तर हिंदुराष्ट्रवाद आहे. तो एका बाजूने हिंदू धर्मातील क्रूर अमानवी चातुर्वर्ण्यव्यवस्था मानतो, तर दुसऱ्या बाजूला मुस्लीम व ख्रिश्चनधर्मीय भारतीयांना दुय्यमत्व देतो. गोळवलकर गुरुजींचे विचारधन (बंच ऑफ थॉट्स)मधील विचार हे अत्यंत प्रतिगामी व मूलतत्त्ववादी आहेत, ते आधुनिक संविधानप्रणीत नागरी राष्ट्रवादाशी मुळीच मेळ खात नाहीत; पण आजही संघाची मानसिकता गोळवलकर गुरुजींच्या विचारांवर निर्माण झाली आहे. त्यांच्या परिवारातील भाजप सत्तेवर असल्यामुळे संघ परिवारच्या बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, श्रीराम सेना आणि धर्म संसदसारख्या संस्थांनी व काही आततायी उग्र प्रवृत्तीच्या नेत्यांनी नुसता उच्छाद मांडला आहे. त्याचा सर्वांत मोठा दृश्य परिणाम म्हणजे (हिंदू विरुद्ध मुस्लीम-ख्रिश्चन) धार्मिक ध्रुवीकरण व त्यामुळे सामाजिक बंधुता व सौहार्द कमी होणे व मुस्लिमांनी स्वतःला असह्य व असुरक्षित महसूस करणे होय!

**इथेच खरा भागवत-मोदी द्वयीचा कस!**

पण वीस कोटींच्या मुस्लिमांना असे सीमंतिक-मार्जिनलायझेशन करून चालणार नाही, त्यांच्यातील मूठभर जरी अतिरेकी व जिहादी झाले, तर ते देशासाठी हानिकारक ठरू शकते. त्याची प्रकर्षाने मोदी सरकारला जाणीव झाली ती नुपुर शर्मा प्रकरणासंदर्भातील मुस्लीम जगताच्या तीव्र प्रतिक्रियेने. ही जाणीव संघास पण झाली असणार. त्यामुळे मोहन भागवतांची माजी निवडणूक आयुक्त डॉ. कुरेशी, जंग, शाहिद आदी बुद्धिमंतांशी झालेली चर्चा, मदरशाला भेट व मुस्लीम इमामांशी संवाद ही संघ बदलाची मंद व सावकाश चाहूल आहे; पण संघाला आपल्या पूर्वीच्या सरसंघचालकांच्या-खासकरून गुरुजींचे संविधानद्रोही विचार पूर्णांशाने झुगारून देणे सोपे नाही; पण ते झुगारणे-किमानपक्षी त्यातले काही अन्यायी विचार सोडणे, आजच्या आधुनिक युगात अपरिहार्य आहे, याची जाणीव भागवतांना आहे. त्यांनी त्यामुळे काही बाल पावले (बेबी स्टेप्स) उचलली आहेत; पण ते या मार्गावर किती निर्धाराने पुढे जात संघाला आधुनिक बनवू शकतात, हे भविष्य काळच सांगेल; पण असा बदल होणे ही काळाची गरज आहे. नाही तर संघ पुढील काळात अप्रस्तुत-इररिलीवंट होईल. ते टाळणे भागवत व मोदी यांच्या हाती आहे. ते ही संधी साधतील का? ते अशक्य नसले तरी जुनाट परंपरेचे ओझे झुगारून देणे सोपे नसते. पुन्हा कट्टर संघ कार्यकर्ते, जे मुस्लीम द्वेष व आकस या भावनेचे आहेत, ते मुस्लिमांशी बंधुतेच्या भावाने वागतील का? हा पण एक अवघड प्रश्न आहे. इथेच खरा भागवत-मोदी द्वयीचा कस लागणार आहे; पण त्यांचे मन किती कंडिशनिंग आहे किंवा किती स्वागतशील व व्यावहारिक बदलास अनुकूल आहे, याचे उत्तर येणारा काळच देईल.

**आर्थिक विषमता व रोजगारविरहित वृद्धी व्यवच्छेदक लक्षण**

दत्तात्रय होसाबळेंनी जे आर्थिक विषमतेचे व बेरोजगारीचे परखड विश्लेषण केले आहे, ते खरेच आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची स्थूल अर्थशात्रीय परिमाणे जरी भक्कम असली तरी सूक्ष्म परिमाणे म्हणजे महागाई व बेरोजगारी विस्कटली आहे. हे पंतप्रधान मोदींचे मोठे अपयश आहे. २०२४ च्या निवडणुकीपूर्वी सामान्यजनांना त्रस्त करणाऱ्या या गोष्टी मोदी कशा सोडवतात, हे पाहावे लागेल. संघाचे आर्थिक धोरण समाजवादी वळणाचे अंत्योदयी आहे, तसेच ते गांधीजींप्रमाणे साधे उपभोग नियंत्रित विचारांचे आहे. त्यात लघु व कुटीर उद्योगांवर रास्त भर आहे, तसाच भर स्वयंरोजगरावर पण आहे. मात्र, व्यापारी व उद्योगपतीवर्ग हा भाजपचा पहिल्यापासून खंदा समर्थक असल्यामुळे आज केवळ भांडवलशाही अर्थव्यवस्था मोदी राज्यात नाही, तर तिचे स्वरूप मक्तेदारी निर्माण करणारे क्रोनी भांडवलशाहीचे झाले आहे. त्यामुळे प्रचंड आर्थिक विषमता आणि रोजगारविरहित वृद्धी हे मोदी सरकारचे व्यवच्छेदक लक्षण झाले आहे. मानव विकासासाठी लागणाऱ्या बाबी म्हणजे शिक्षण, आरोग्य आणि समाज कल्याण, या बाबींवर कमी आर्थिक तरतूद करीत क्रमशः त्यातून सरकारला मोदीराज अलग करत असल्यामुळे अर्थचक्र जसे मंदावले आहे, तसेच सामाजिक सौहार्द कमी झाले आहे. यावर आपल्या भाषणात भागवतांनी फार जुजबी व वरवरचे भाष्य तेही केवळ तोंडी लावण्यापुरतेच केले आहे. कारण संघाचा ठोस असा अर्थविचार व अर्थशास्त्र नाही. कारण उच्चवर्णीय बुद्धिजीवी श्रम न करणारी मानसिकता त्या आड येते, असे माझे मत आहे. होसाबळे यांचे आर्थिक दुखण्याचे निदान खरे असले, तरी संघाचे औषध चुकीचे आहे. त्यासाठी पुन्हा एकदा पं. नेहरूंची संमिश्र अर्थव्यवस्था आजच्या परिस्थितीनुरुप स्वीकारणे, सहकाराला उत्तेजन देणे आणि





विज्ञान-तंत्रज्ञानावर भर देत तांत्रिक मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर निर्माण केल्याखेरीज अर्थव्यवस्थेला गती येणार नाही. मोदी याबाबत भागवातांपेक्षा अधिक सजग व आधुनिक आहेत; पण त्यांचा एक मोठा दोष म्हणजे ते केवळ उद्योगस्नेही नाहीत, तर (फक्त दोन) उद्योगपतिस्नेही आहेत. त्यांच्या हिताचे व लोकविरोधी निर्णय ते बिनदिक्कत घेतात. त्यामुळे अनेक गंभीर आर्थिक समस्या आज देशात निर्माण झाल्या आहेत. संघाने आपले अशास्त्रीय अर्थविचार सोडून आधुनिक अर्थविचार डोळसपणे स्वीकारणे गरजेचे आहे. मोदी संघाला यादृष्टीने बदलू शकतात, तर संघ मोदींच्या उद्योगपतिस्नेहाला वेसण घालू शकते; पण असे होईल का?

संघ ही भारतातील एक शक्तिशाली संघटना आहे व ती देशावर प्रभाव टाकू शकते. तो आजवर मुस्लीमद्वेषी सांस्कृतिक ऊर्फ हिंदुराष्ट्रवाद आणि अशास्त्रीय अर्थविचार यामुळे देशविकासासाठी सकारात्मक हस्तक्षेप करण्यास असमर्थ आहे, त्यामुळे स्वतः ची सामाजिक उपयुक्तता टिकवून ठेवण्यासाठी संघाला स्वतःला बदलण्याची गरज आहे; पण पुन्हा प्रश्न तोच - संघ बदलेल का? बदलला तर आमूलाग्र बदलेल की वरवर? मला स्वतःला आमूलाग्र बदलाची शक्यता फार कमी वाटते. अशा परिवर्तनासाठी संघाला दूरदृष्टीचे स्टेट्समन हवेत; पण आजतरी भाजपसह संघपरिवारात कोणी दिसत नाही-एक नितीन गडकरी सोडले तर (ज्यांचे स्थान आज परिघावरचे झाले आहे). त्यामुळे संघ बदलून आधुनिक होण्याची शक्यता मला माझ्या आकलनाच्या परिप्रेक्ष्यात धूसर वाटते. हे देशाचे दुर्दैव नाही का? ●●●

**(लेखक माजी सनदी अधिकारी व संमेलनाध्यक्ष आहेत.)**

# कलांमधील चलाख टोळधाड!






संजय पवार

**कलेला शूद्र ठरवले ती कलाच ताब्यात घेऊन तिची नवी बाजारपेठही ताब्यात घेऊन आपले अजेंडे राबवणारी मोठीच टोळधाड सक्रिय आहे. सध्या तीच करतेय शूद्र कलेचे शुद्धीकरण केलेले सेलिब्रेशन व तीच पुढे आणते शुद्ध झालेले सेलिब्रेटी!**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक नुकतेच एका कार्यक्रमात म्हणाले, की ब्राह्मणांनी पापक्षालन करायला हवे! ब्राह्मणांनी फक्त जातीयता वा अस्पृश्यता पाळली म्हणून पापक्षालन करायचेय? की एकूणच हिंदू धर्मात जी ब्राह्मणी जातसत्ताक, पितृसत्ताक पुरोहितशाही रुजवली त्याबद्दल पापक्षालन करायचेय?

भागवतांचे हे विधान एका ग्रंथप्रकाशनातील भाषणादरम्यान केलेले आहे. त्या भाषणाचे टिपण रविवार, लोकसत्ता १६ ऑक्टोबर २०२२ च्या अंकात आहे. जो ग्रंथ प्रकाशित झालाय व त्याप्रसंगी भागवतांनी जे विचार मांडलेत त्यावरही स्वतंत्र चर्चा झडतील किंवा झडायलाच हव्यात. कारण चर्चेला त्यांनी तोंड फोडलेय, तर ती पुढे गेली पाहिजे.

**ब्राह्मणांनी कलेचे महत्त्व ओळखले**

तूर्तास तो विषय बाजूला ठेवून पापक्षालनाचा एकच मुद्दा वेगळ्यासंदर्भात घ्यायचाय. तो मुद्दा म्हणजे ब्राह्मणांनी सर्व कला व त्या सादर करणाऱ्यांना शूद्र ठरवले होते आणि त्याचा परिणाम म्हणून पिढ्यान्‌पिढ्या कला व कलावंतांना सामाजिक प्रतिष्ठा मिळालीच नाही. कालांतराने ब्राह्मणांनी या कलांचे महत्त्व ओळखले शिवाय काही ब्राह्मणच हे कलेचे शूद्र कर्म करत होते. मग ब्राह्मणांनी त्यांच्या नेहमीच्या चातुर्याने कलेत शुद्धीकरण मोहीम सुरू केली आणि तिला गावकुसाबाहेरून गावात आणले!

शुद्धीकरण करून गावात आणलेली कला नंतर ब्राह्मणांनी अशी काही कडेकडेने प्रतिष्ठित करत नेली, की आज हजारो वर्षांनंतर आजच्या ग्लोबल व्हिलेजच्या जमान्यात याच कलेची बाजारपेठ करून त्यावर पुन्हा आपलेच वर्चस्व राहील याची काळजी घेताहेत. म्हणजे पूर्वी त्यांनी शिक्षणाच्या बाबतीत केले तेच ते आता कलेच्या बाबतीत करू पाहताहेत. शिक्षण हे जसे त्यांनी सुरुवातीला स्वतःच्या आधिपत्याखाली ठेवले होते, तसेच आता कलेची बाजारपेठ त्यांना त्यांच्या आधिपत्याखाली हवीय. आता २०१४ नंतर तर त्यांनी जातीसोबत धर्मवर्चस्व प्रस्थापित करायला सुरुवात केलीय. धार्मिक ध्रुवीकरणाची राजकीय खेळी यशस्वी करायला त्यांनी आता कलामाध्यमांचा वापर करायला सुरुवात केलीय.

**खाऊजा धोरणांची राबवणूक नेटाने...**

स्वातंत्र्य चळवळीतील गांधी-नेहरू यांचा प्रभाव स्वातंत्र्योत्तर भारतावर अगदी ८० च्या दशकापर्यंत होता. ८४ ची इंदिरा गांधींची हत्या आणि ८९ च्या राजीव गांधी हत्येनंतर स्वातंत्र्यपूर्व काळापासून दबा धरून बसलेल्या संघपरिवाराने आता थेट हिंदुत्वाचा मुद्दा हाती घेत राम जन्मभूमी आंदोलनाचा उपयोग आपली राजकीय शाखा भाजपला विस्तारण्यासाठी उघडपणे सुरू केला. बाबरी मशीद जमीनदोस्त केल्यावर त्यांचा आत्मविश्वास वाढला. याला मंडल कमिशनचे निर्णय लागू करून व्ही.पी. सिंग यांनी लोहियाप्रणीत पिछड्यांच्या राजकारणाने घेरण्याचा प्रयत्न केला; पण तो फारसा यशस्वी झाला नाही. कारण अशा गोष्टींसाठी जी राजकीय इच्छाशक्ती लागते, ती तेव्हाच्या डाव्या-उजव्यांच्या मिश्र सरकारांमुळे त्या वेळच्या अनुक्रमे व्ही.पी. सिंह, चरणसिंह, देवेगौडा, गुजराल आणि चंद्रशेखर यापैकी कुणाच्याही सरकारला ती राबवता आली नाही. कारण ही सर्वच सरकारे अल्पायुषी ठरली.

या अस्थिरतेचा आणि नंतरच्या नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस आघाडी सरकारच्या काळात संघपरिवार व भाजपने आपल्या आक्रमक हिंदुत्वाचा प्रचार व प्रसार केला. नरसिंहरावांचे सरकारही

अल्पमतातले व बहुपक्षीय होते. तरीही खाऊजा धोरणांची राबवणूक त्यांनी नेटाने केली. ज्याचा फायदा हिंदू मध्यमवर्ग हा नवश्रीमंतांना झाला, तंत्र निपुण झाला व संघपरिवाराच्या नवहिंदुत्ववादाच्या प्रभावाखाली आला, तो उत्तरोत्तर कडवेपणाकडे झुकत गेला व आता तो बेमुर्वतखोर झालाय.



**नाटक, सिनेमात काम करणे दुय्यम मानले जात होते**

स्वातंत्र्योत्तर कालखंडाचा जरी विचार केला, तर कला प्रांतात म्हणजेच साहित्य, नाट्य, चित्रपट, गायन, वादन या क्षेत्रांवर जर नजर टाकली, तर साधारण ६०/७० चे दशक संपेपर्यंत या क्षेत्रात (साहित्य वगळता) काम करणे हे दुय्यम दर्जाचे मानले जात होते. विशेषत: नाटक, सिनेमात. अनेक सवर्ण नाट्यकर्मींनी याबाबत आपल्या आत्मचरित्रात नोंदी केल्यात. शिक्षण अर्धवट राहणे, सामाजिक प्रतिष्ठा नसल्याने सजातीय विवाह होण्यात अडचणी येत. पठ्ठे बापूराव हे मूळ कुलकर्णी; पण तमाशात कार्यरत राहण्यासाठी ते डिकास्ट झाले!

सुरुवातीला संगीत रंगभूमीचा प्रभाव राहिला. त्यातील कलाकारांना वरील सर्व गोष्टींना सामोरे जावे लागे. तरीही दुसऱ्या बाजूला नारायण राजहंस यांचे गायन व स्त्रीवेशातील भूमिका यांनी त्या वेळच्या ब्राह्मणवर्गाला वेड लावले होते. त्यांना बालगंधर्व ही उपाधी दिली होती आणि तत्कालीन उच्चकुलीन स्त्रिया त्यांच्या पोशाखाचे अनुकरण करत! मराठी रंगभूमीचा हा सुवर्णकाळ मानला जातो.

**मराठी लावण्यांच्या चाली ढापून नाट्यगीते रचली**

या सुवर्णकाळाचे शिरोमणी बालगंधर्व यांनी आपल्या अनेक नाटकांतल्या पदांच्या चाली या जगप्रसिद्ध गायिका गोहर जान यांच्या गाण्यांवरून चोरल्या होत्या. मराठी लावण्यांच्या चाली ढापून नाट्यगीते रचली. या गोहर जान म्हणजे बालगंधर्वांनी ज्यांच्याशी अखेरच्या काळात धर्म बदलून निकाह केला होता, त्या गोहर जान नव्हे. मात्र, या गोहर जानमुळे गंधर्वांच्या निधनानंतर त्यांना अग्नी द्यावा, की दफन करावे यावरून बराच वाद झाला होता. असो.

तर मूळ गोहर जान ही भारतातील त्या वेळची प्रसिद्ध तवायफ व कोठेवाली होती. भारतीय शास्त्रीय संगीत म्हणून आज जे काही आहे, ते या गोहर जान व तिच्या समकालीन तवायफ व कोठेवालींचे रीतसर पळवून नंतर त्याचे तथाकथित शुद्धीकरण करून ते हिंदुस्थानी शास्त्रीय गायन म्हणून प्रचलित केले गेले. यात आपले संगीतसूर्य भातखंडे वगैरे आघाडीवर होते. यांनी इंग्लंडमधील शुद्धीकरण मोहिमेवरून प्रेरणा घेऊन इथल्या तवायफ व कोठेवाल्यांकडून त्यांच्या चिजा, बंदिशी घेऊन नंतर त्यांना भिकेला लावून वेश्या व्यवसाय करायला मजबूर केले.

My name is Gauhar jaan: The life Times of - Musician By Vikram Sampat. या पुस्तकात हिंदुस्थानी संगीताचा सगळा निलाजरा इतिहास तपशिलात मांडलाय. निलाजरा अशासाठी म्हणतोय, कारण गौहरबाईंना कुणीतरी सांगितले, की तुमच्या चाली चोरून महाराष्ट्रात बालगंधर्व झालेत! त्यावर त्यांनी फारशी प्रतिक्रिया दिली नाही. कालांतराने त्या पुण्यात आल्या असता गंधर्वांना भेटून त्यांनी विचारले, की तुम्ही तर आमच्याच चाली गाताय! यावर चोरी पकडल्यासारखे गंधर्व ओशाळे हसले (अगदी असाच प्रसंग घडला नसेल; पण आशय हाच). केवळ बालगंधर्व नाही, तर आजचे संपूर्ण हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत हे तवायफांची देन आहे; पण ब्राह्मणीव्यवस्थेने त्यावर डाका तर घातलाच; पण नंतर त्यांना बदनाम करून थेट वेश्या बनवून रस्त्यावर आणले!

**गौहर जानबद्दलची अळीमिळी गुपचिळी आश्चर्यकारक**

या त्याच गौहर जान आहेत ज्यांच्या गाण्याची रेकॉर्ड ही संपूर्ण भारतातील पहिली रेकॉर्ड आहे! गानसम्राज्ञी, कोकिळा, सरस्वती सर्व नंतर खूप वर्षांनी. या गौहर जान यांचा आब नि रुबाब असा होताच, की त्या म्हणत असत गौहर जान म्हणतात मला! आता पुढची मजेदार गोष्ट. विक्रम संपत यांच्या या पुस्तकाचा मराठी अनुवाद सुजाता देशमुख यांनी केला. (गौहर जान म्हणतात मला! भारतीय संगीत ग्रामोफोनवर उमटवणारी कलावंत.) उपशीर्षकात पहिली हा शब्द घालायला सोईस्कर बगल! या अनुवादाला अनुवादाचा साहित्य अकादमी पुरस्कारही मिळाला. सुप्रसिद्ध राजहंस प्रकाशनाने तो प्रसिद्ध केलाय; पण आश्चर्य म्हणजे राजहंसच्या अलीकडल्या कुठल्याही जाहिरातीत हे पुस्तक नसते वा त्याची स्वतंत्र जाहिरात नसते. विक्रीनिपुण राजहंस प्रकाशनाची साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त गौहर जानबद्दलची अळीमिळी गुपचिळी आश्चर्यकारक आहे! याउलट आयएएस, आयपीएस बनविण्याचे घाऊक कंत्राटदार यांचे '७५ सोनेरी पाने' या पुस्तकाची तीन शहरांत तीन वेळा लोकार्पणे झाली!

गौहर जानची कला तर ढापलीत; पण तिचे चरित्रही आता नव्या अमृत काळात गैरसोयीचे ठरतेय? हीच (गैरसोयीची) भावना मूळ लेखक विक्रम संपत यांची असावी.कारण या पुस्तकानंतर त्यांनी सावरकरांवर दोन घसघशीत खंड लिहिलेत! यावर 'गौहर जान' नंतर

एकदम सावरकर का? या प्रश्नावर ते म्हणाले, मी भारावून गेलो! योगायोगाने हा भारित काळ २०१४ पासूनचा आहे. तर जिज्ञासूंनी इंग्रजी वा मराठी (मिळाले तर!) पुस्तक खरेदी करून वाचावे आणि हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात येता-जाता कानाची पाळी धरणाऱ्यांचे कान धरून सांगितले पाहिजे, की तुम्ही तवायफांची, कोठेवाल्यांची माफी मागून पापक्षालन करा!

**शेक्सपिअर आजही मराठी रंगभूमीला मूलद्रव्य देतोय**

दुसरीकडे नाटकात संगीत नाटकांनंतर स्थळ दिवाणखाना या पद्धतीच्या सामाजिक, कौटुंबिक व काही ऐतिहासिक नाटकांवर थेट ब्रिटिश प्रभाव होता. शेक्सपिअर आजही मराठी रंगभूमीला मूलद्रव्य देतोच आहे. पु.लं. ची सर्वच नाटके रूपांतरित होती व शिरवाडकरांच्या 'नटसम्राट'ची शोकांतिका ही शेक्सपिअरकडून प्रेरणा घेतलेली. आश्चर्य एवढेच वाटते, की फुलवाली वा विपन्न अवस्थेतील कलावंत आपल्याच समाजात उपस्थित असताना त्यांची आयुष्ये नाट्यविषय व्हायला आम्हाला शॉ व शेक्सपिअरकडून शिकावे लागले. वर कौतुक म्हणून किती छान केलेले रूपांतर! वाटतच नाही मूळ इंग्रजी आहे!! पु.लं.सारखा आणीबाणीविरोधात (मर्यादित काळ) उतरलेला लेखकही 'एक झुंज वाऱ्याशी' अनुवादित करून आविष्कृत करतो?

**दलित व देशीवादी साहित्याला जगात ओळख**

साठोत्तरी साहित्य, नाट्य, चित्रपट चळवळींनी वातावरण बदलत गेले व प्रामुख्याने दलित साहित्य चळवळी व नेमाडेंच्या वादग्रस्त ठरलेल्या वा ठरवलेल्या देशीवादाने मराठी साहित्य, बोटीवरून आलेल्या साहित्य प्रेरणांपासून तयार झालेले साहित्य मोडीत काढून जगणे आणि लिहिणे यातले अंतर कमी करतानाच साहित्य, प्रेरणा ब्रिटिश थडग्यांपासून लांबवर असलेल्या आफ्रिकन, जपानी, इराणी, अशा नव्या जागतिक परिप्रेक्ष्याशी जोडल्या. आज जगात भारतीय साहित्य म्हणून जे ओळखले जाते, ते प्रामुख्याने दलित व देशीवादी आहे. त्यामुळे सर्व कला प्रकारांमधल्या ब्राह्मणी वर्चस्वाला बाबरी ढाच्यासारखे जमीनदोस्त केले गेले (ही प्रतीकात्मकता धर्मांधतेने घेऊ नये!) ६० ते ९० च्या दशकापर्यंत.

**२०१४ ची पायाभरणी राजीव गांधी यांच्या हत्येनंतरच**

९० नंतर जग व भारतही वेगाने बदलत गेला. विसावे शतक संपताना भारत राजकीयदृष्ट्या डाव्या, उजव्या व काँग्रेसच्या मधल्या राजकारणावर हेलखावे खातानाच खाजगीकरण, जागतिकीकरण व उदारीकरण याचे दृश्य परिणाम दिसू लागले. ८५ साली राजीव गांधींनी पायाभरणी केलेली दूरसंचार व संगणक क्रांतीने विसावे शतक संपताच जोरदार उसळी घेतली व एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातच संपूर्ण विसावे शतक डिलीट केल्यासारखे वातावरण तयार झाले.



अठराव्या शतकापासून सुरू झालेल्या स्वातंत्र्य चळवळी, सामाजिक चळवळी, धर्म चिकित्सा, धर्मांतरे, फाळणी, स्वातंत्र्य, गांधी-नेहरू युग, स्वातंत्र्यानंतर नेहरूंनी विचारपूर्वक केलेली नवभारताची उभारणी, फाळणीनंतरही देशात कायम ठेवलेले गंगा जमनी तहजीबीचे वातावरण, संसदीय लोकशाही व न्याययंत्रणांसह इतर संविधानिक संस्थांची स्वायत्तता, माध्यम स्वातंत्र्य या सर्वांवर पहिला घाला घातला तो नेहरू कन्या इंदिरा गांधींनी! त्यांनी आणीबाणी लादून देशात प्रथमच एकाधिकारशाही, सरकारी संस्थांची स्वायत्तता संपविली. आविष्कार स्वातंत्र्यावर मर्यादा व माध्यमांची मुस्कटदाबी केली. नेहरू युग पाहिलेले, त्यांचे राजकीय विरोधक राहिलेले, तरीही नेहरूंच्या उद्योग, शिक्षण, परराष्ट्र धोरणांची पुष्टी करणारे इंदिराबाईंच्या आणीबाणीने चक्रावले. स्वतः जयप्रकाश नारायण राजकीय निवृत्तीतून परत आले. त्यांच्या नेतृत्वाखालील आणीबाणीविरोधी आंदोलन यशस्वी झाले. जनता पार्टी सत्तेत आली गेली. पुन्हा इंदिरा सत्ता. मग त्यांची हत्या. पुढे राजीव गांधी पंतप्रधान आणि त्यांचीही हत्या. त्यानंतर घसरणीला लागलेला काँग्रेस प्रभाव व आघाड्यांच्या राजकारणात हिंदुत्वाचे राजकारण करणाऱ्या पूर्वाश्रमीच्या जनसंघाला व आजच्या भाजपचा राजकीय अस्पृश्यतेचा काळ सरला व त्यांनी भारतीय राजकारणात काँग्रेसच्या दलित, मुस्लीम राजकीय अवकाशाला स्वतःच्या हिंदुत्व आणि हिंदू इतर मागास, हिंदू मागास व आदिवासींसह काही भटके यांची मोट बांधून कातरण्याचे काम सुरू केले.

हे सर्व करताना त्यांनी निर्णायक काँग्रेस, खाऊजा धोरणाने बेदखल झालेले डावे, समाजवादी आणि डॉ. बाबासाहेबांनंतर कायमच निर्णायकी राहिलेले आंबेडकरवादी यांना स्वतःच्याच सेक्युलर स्वप्नरंजनात रमवून नवश्रीमंत अभिजन, एनआरआय यांच्यात हिंदुत्व पेरताना या दोन्ही गटांकडून निधी, मनुष्यबळ व वेगवान आधुनिक तंत्रज्ञान हिंदुत्वाने भारित तंत्रज्ञानासह मिळवले. भारतात व भारताबाहेरही. २०१४ ची पायाभरणी जवळपास राजीव

हत्येनंतरच सुरू झालेली होती. परिणामस्वरूप आज हिंदुत्ववादी भाजपचे सरकार केंद्रात व अनेक राज्यांत दुसरी खेप पूर्ण करतेय.

**झुंडीच्या तंत्रज्ञानावर आधारित समाजगट**

पूर्ण बहुमताच्या हिंदुत्ववादी भाजप सरकारने गंगा जमनी तहजीब, आहार-विहार, पोशाख, विचारस्वातंत्र्य यावर कधी थेट, तर कधी आपल्या जहाल जनसंघटनांद्वारे हिंसक हल्ले करवले, तर नव्या समाजमाध्यमात जल्पक टोळ्या तयार करून नवे झुंडीच्या तंत्रज्ञानावर आधारित निर्बुद्ध, हिंसक, शिवराळ समाजगट तयार केले आणि देशात पुन्हा हिंदू-मुस्लीम फाळणीसदृश वातावरण तर तयार केलेच आहे; पण थेट केंद्र सरकारकडून अवैज्ञानिक, असंविधानिक, अर्थनिरक्षर आणि हडेलहप्पी निर्णय घेतले जाऊ लागलेत.

यातली आश्चर्याची गोष्ट म्हणजे आजवर सांस्कृतिक जगतात जी माणसे डावी, समाजवादी, आंबेडकरवादी नव्हती; पण समन्वय, मध्यममार्गी वा सहिष्णू व विज्ञान मानणारी जी एक मोठी जनसंख्या होती व जी आजवर आणीबाणी, आविष्कारस्वातंत्र्य, नामांतर चळवळ, दलित साहित्य, नाटक, समांतर सिनेमा, साहित्य यांना ते समजून घेत आपल्या हिंदू असण्यासकट, धार्मिक रीतिरिवाजांसह, आस्तिकतेसह स्वीकारत होती, ती जनसंख्या तो समाजगट अचानक एका रात्रीत कडवट हिंदू झाला!



**प्रपोगंडा म्हणजेच कलात्मकता राहणार का?**

हा तोच समाज होता ज्यांनी प्रभातचे समाजपरिवर्तनीय चित्रपट वाखाणले, तिकीट बारीवर यशस्वी केले. हा तोच समाज होता, ज्यांने हिंदीत सुजाता, देवदास, मुघलेआझम, अनारकली, ताजमहाल, असे चित्रपट पाहिले, त्यातल्या कलाकार तंत्रज्ञासह गीत-संगीत डोक्यावर घेतले. हा तोच समाज होता, ज्याने वरेरकर ते तेंडुलकर असे प्रयोगशील नाटककार आशयासह स्वीकारले. श्री.म. माटे ते गं.बा. सरदार स्वीकारले. मर्ढेकर ते चित्रे, कोलटकर स्वीकारले. चित्रपटसृष्टीवरचा सुरुवातीचा प्रागतिक मराठी, साहित्यिक बंगाली व उर्दूच्या प्रभावाने अजोड अविस्मरणीय कलाकृती निर्माण झाल्या. गझल, कव्वालीसारखा प्रकार रुजला. नंतरच्या पंजाबी निर्मात्यांनी ठोकळेबाज सिनेमे केले. त्यात हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, मराठी, मारवाडी, दक्षिणी, पारशी अशी पात्रे असत. अनेकदा ती विनोदनिर्मितीसाठी वापरली गेली; पण ७५ वर्षांत एखादा अपवाद वगळता धार्मिक वा जातीय अस्मितेचा मुद्दा कधी आला नाही. याउलट अमर अकबर अँन्थनीसारख्या चित्रपटांनी लोकप्रियतेचा कहर केला!

या पार्श्वभूमीवर हिंदुत्वाने भारित असे नाट्य चित्रपट क्षेत्र पाहिले व ताश्कंद, ३१ ऑक्टोबर, ॲक्सिडेंटल प्राईम मिनिस्टर, उरी, काश्मीर फाईल्स, शिवराय अष्टक वगैरे चित्रपट पाहिले किंवा सावरकरांना, विवेकानंदांना विशिष्ट प्रकारे प्रोजेक्ट करताना पाहिले, की वाटते आता प्रपोगंडा म्हणजेच कलात्मकता राहणार का? ऐतिहासिक चित्रपट काढायचे, मग वाद उकरायचे, अस्मिता पणाला लावायच्या, हा सर्व विरोध विचारांती की बाजारपेठेची गरज म्हणून निर्माण केले जातात? भाजप वा भाजप मित्रपक्ष यांना हिंदू-मुस्लीम ध्रुवीकरण होईल, असेच विषय का सापडतात. गवताच्या गंजीतही सुई सापडावी तसे?

समाजमाध्यमांवरील व्यक्तिगत टीका-टिपणीतही आता जाणीवपूर्वक धर्म, जात आणली जाते. गणपती सलमानकडे आला तरी वाद, भाऊ कदमकडे आला तरी वाद, दीपिका जेएनयूत गेली तरी वाद, संगीतकार शेखर आपच्या प्रचारात तरी वाद! प्रकाशराज, नसीर, स्वरा, हे तर आता नेहमीचे झुंडबळी!

नाट्य, चित्रपटानंतर उभ्या राहिलेल्या चित्रवाणी वाहिन्या, तिथल्या मालिका, त्यातले कलाकार यामधली थोडी उघड व मोठ्या प्रमाणावरची छुपी धार्मिक व जातीय हिंदुत्ववादी मानसिकता ही तर उबग आणणारी आहे. विशेष म्हणजे, कलेला शूद्र मानणाऱ्या धर्म-जातीची तरफदारी करणाऱ्या दुतोंडी झुंडींची तिथे अनभिषिक्त सत्ता आहे! तिथल्या ब्राह्मणेतरांचे वेगाने ब्राह्मणीकरण करता येते. कारण मालिकांचे विषय, त्यातले वातावरण, मालिकांनी मिळणारी प्रसिद्धी व पैसा आणि ते सतत देणारी प्रमोशनच्या नावाखालची धार्मिक यात्रा यातून हिंदुत्वाचे पक्षीय राजकारण करणारे फार दूरवरून ही सर्व सूत्रे हलवीत असतात! दर्शनी दिसतो निव्वळ कला व कलाव्यवहार!

जिला शूद्र ठरवले ती कलाच ताब्यात घेऊन तिची नवी बाजारपेठही ताब्यात घेऊन आपले अजेंडे राबवणारी मोठीच टोळधाड सक्रिय आहे. सध्या तीच करतेय शूद्र कलेचे शुद्धीकरण केलेले सेलिब्रेशन व तीच पुढे आणते शुद्ध झालेले सेलिब्रेटी! ●●●

**(लेखक ज्येष्ठ नाटककार व विचारवंत आहेत.)**

इतना सन्नाटा क्यूं

# पदसिद्ध अपप्रचारक





जयदेव डोळे

**अभ्यास, संशोधन, नवनिर्मिती, प्रतिवाद आदी बौद्धिक आदानप्रदान जिथे नसेल, तिथे संघाचा वावर आवर्जून असतो. त्यामुळेच तर्कहीन बोलले काय, धडधडीत खोटे सांगितले काय अन् प्रचारकी विधाने केली काय, कोणाच्या लक्षात येणार आहे? सत्याशी संबंध नाही म्हणूनच तज्ज्ञ, संशोधक, अभ्यासक वा शास्त्रज्ञ यांना जवळ फटकू द्यायचे नाही, हा संघाचा खाक्या.**

काही पदे अशी असतात ज्यांवर बसलेल्या व्यक्ती जे काही बोलतील ते गांभीर्याने स्वीकारले जाते. लोकशाहीत अशी भरपूर पदे असतात. सत्तेचे विकेंद्रीकरण आणि निर्णयप्रक्रियेचे वितरण यांसाठी या पदांचे महत्त्व असते; परंतु राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कोणतेही पद लोकशाही प्रक्रिया आणि निर्णयाचे वितरण यांमधून भरले जात नाही. तिथे नेमणूक, नियुक्ती कशी होते हे कोणालाच माहीत नाही. कोणत्या क्षमता तिथे अजमावल्या जातात अन् कशाकशावर माणसांची पारख केली जाते, हे सारे गुप्त असते. एकीकडे संघाच्या शाखा भरमसाट वाढल्याचे वृत्त छापून आणण्याची केली जाणारी व्यवस्था आणि सततचा सामूहिक कवायती, संचलने, शाखा यांच्या छायाचित्रांचा भडिमार याचा परिणाम या समजुतीत होतो, की संघ म्हणजे प्रचंड अशी संघटना आहे. साहजिकच एवढ्या मोठ्या संघटनेचा प्रमुख म्हणजे फार बुद्धिमान, मेहनती, उत्तम संघटक अथवा प्रभावशाली वक्ता असला पाहिजे, असा ग्रह बहुतेकांचा होणार; पण खरे तर यातल्या कशातच तथ्य नाही. संघाचा बहुतेक वेळ आपल्याविषयी समाजाचे मत चांगले कसे होईल आणि त्यासाठी काय काय करता येईल, या धडपडीत जात असतो. त्यात हे सारे करीत असताना आपल्याकडे कोणाचे लक्ष असणार नाही यासाठी केली जाणारी खटपट, त्यांचा अजून वेळ खात असते. अत्यंत नकारात्मक, सदोदित शत्रू शोधून बोलत राहणारी आणि स्वतः नामनिराळे राष्ट्र इच्छिणारी ही संघटना मग कोण्या तोंडाने, कोण्या विषयावर सार्थ, सरळ व स्पष्ट बोलू शकणार? अभ्यासावर भरोसा नाही, की संशोधनावर भिस्त! परिवर्तनाची आस नाही, की बदलाचा सोस!! सनातन धर्म, सनातन संस्कृती, सनातन राष्ट्र यांचा सततचा आग्रह धरण्यासाठी नवनव्या कल्पनांना विरोध करणे आलेच. त्यामुळे रा.स्व. संघ ही एक मठ्ठ, मख्ख आणि मंद संघटना असूनही तिचे म्होरके पत्रकारांशी संगनमत करून (नारदाच्या नावाने पुरस्कार देऊन) प्रसिद्धीचे वलय आपल्याभोवती उत्पन्न करीत राहतात. आपोआपच मग त्या व्यक्तींची पदे, कथने आणि प्रतिक्रिया महत्त्वाच्या वाटू लागतात. समाज अशा वक्तव्यांची चर्चा करू लागतो. लोकशाहीतल्या जबाबदार संवादांची तुलना संघातल्या स्वयंभू लोकांच्या बडबडीशी करू लागतो.

**सारे एका पळपुट्या शैलीचे पटाईत!**

सरसंघचालक या पदावरची व्यक्ती शिकलेली काहीही असो, ती कायम एका चौकटीत बोलत राहते. ती चौकट म्हणजे हेडगेवार, गोळवलकर, देवरस आदी पूर्वसुरींची कथने. तीही फार अभ्यासपूर्ण अथवा प्रगल्भ असली पाहिजेत, असे नाही. कारण प्रत्येकाने आपल्या आधीच्या पुढाऱ्याकडे पाहत पाहत विधाने केलेली. म्हणून गोळवलकर यांचे १२ खंडांत विखुरलेले लेखन व भाषणे त्यांच्या नंतरच्या सर्वांना मार्गदर्शक म्हणून आज उपलब्ध आहेत. सलग ३० वर्षे सरसंघचालक म्हणून वावर करता आलेले गोळवलकर हेच खऱ्या अर्थात संघाचे विचारस्रोत आहेत. त्यांनी केलेली विधाने विचार या संज्ञेत मोडत नसली तरी! बिनबुडाची, कुतर्क ठरणारी, केवळ स्वानुभवावर आधारलेली आणि अत्यंत भावनिक भाष्ये हा गोळवलकरांचा विशेष. आज मोदी जसे कोणाशीही वाद घालत नाहीत, तसा गोळवलकरांचा प्रयत्न असे. खरे तर, तो शुद्ध पलायनवाद असतो. मात्र, आपलेच म्हणणे खरे आणि परिपूर्ण असल्याचा आव आणीत, ठाम विधाने करीत जाणे म्हणजे विचार असा संघातल्या लोकांचा थाट. मोदी काय, गोळवलकर काय किंवा आताचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत काय! सारे एका पळपुट्या शैलीचे

पटाईत. हे मूळचे ब्राह्मण्य!! ब्राह्मणांची वाणी म्हणजे देववाणी, त्याच्या तोंडचे शब्द म्हणजे देवाचा शब्द. तो अपरिवर्तनीय, पवित्र आणि तेजस्वी...

**...त्यांना वैचारिक आधार नसून, ती निव्वळ तारकालिकता आहे**

तर डॉ. भागवत या वर्षात असे काही तेजस्वी अन् देदीप्यमान बोलले, की अवघे विश्व त्याने दिपले. हिंदू व मुसलमान यांची गुण-सूत्रे एकच आहेत, असे सांगणे, मुसलमानांच्या धर्मनेत्यांशी भेटीगाठी करणे, जाती व्यवस्था वाईट आहे, असे म्हणणे, लोकसंख्येत संतुलन आले पाहिजे, असे बोलणे, भारतीय अर्थव्यवस्था प्रगतिपथावर चालल्याची हमी देणे, महिलांना भारतात कायम सन्मान मिळत आल्याचे ठासून सांगणे इत्यादी... संघ सांस्कृतिक राष्ट्रवाद मान-तो व त्याप्रमाणे आचरण करतो, असा संघाचाच एकेकाळचा दावा असे. २०१४ पासून हिंदुराष्ट्र बनवण्याचा संकल्प प्रत्यक्षात उतरवणे याचा उच्चार जाहीरपणे केला जाऊ लागला. अधूनमधून अखंड भारत व्हावा, असे सांगितले जाऊ लागले. भागवतच त्याबद्दल बोलले होते. सध्या भागवत जे बोलतात ते सारे ज्या राज्यात विधानसभा निवडणुका असतात त्या समोर ठेवून बोलतात, असे स्पष्ट दिसते. त्यामुळे धर्म, जात, भाषा, लिंग, प्रदेश, वर्ग, वर्ण हे विषय भागवत जेव्हा काढतात तेव्हा त्यांना वैचारिक आधार नसून, ती निव्वळ तारकालिकता आहे, हे लक्षात घ्यावे लागते.

**...मग तरीही भागवत उलटसुलट का बोलत राहतात?**

यातला प्रत्येक विषय एकेका अभ्यासकाचे आयुष्य खपवणारा आहे. कारण त्याला असणारी शेकडो वर्षांची परंपरा, इतिहास, पैलू आणि प्रकार. आंबेडकर असोत की लोहिया, शरद पाटील असोत की तरुण संशोधक सूरज येंगडे, सर्वांना प्रचंड वाचून, तपासून, पारखून आपले म्हणणे मांडावे लागेल; परंतु भागवत मात्र बिनदिक्कत असंख्य विषय आपल्या भाषणांमधून मांडत राहतात. योग्य की अयोग्य, याचा विचार त्यांना जमत नाही. कारण लगेच पुढच्या गावी नव्या कार्यक्रमात त्यांना भाषण करायचे असते. ते वाचतात काय, त्यांना कोणता विचारवंत मानवतो आणि त्यांची विचारपद्धती काय याचा कोणाला ना पत्ता, ना खबर! भाषाशास्त्री, वंशशास्त्रज्ञ, धर्मपंडित, समाजशास्त्रज्ञ, संस्कृतीचे अभ्यासक अथवा निरनिराळे वैज्ञानिक भागवतांच्या दिमतीला असतात, असेही दिसत नाही. त्या लोकांशी भागवत सल्लामसलत करीत असल्याचेही कोणाला कधी समजले नाही. त्यामुळे भागवतांपाशी असणारे एक पद त्यांच्या कसल्याही बेताल, बेछूट, बेजबाबदार विधानांना सावरते, असे म्हणावे लागते. पदाचा लाभ होताच अनेकांची वृत्ती बहरते, बुद्धी विकसते आणि दृष्टी फाकते, असे म्हटले जाते; पण त्यासाठी वय, शिक्षण, संधी यांची सांगड लागते. वयाची पन्नाशी-साठी उलटल्यावर एखादे पद लाभल्याने फरक काय पडणार आहे? मेंदूला लागलेले वळण मोडणे त्यावेळी शक्य होते. मग तरीही भागवत उलटसुलट का बोलत राह-तात? जाहीर मतप्रदर्शन का करीत असतात?

**देश हे सारे सहन का करतो?**

भारतातच नव्हे, तर अवघ्या जगात तीन-चार प्रकारांतच लोकसंवाद होत असतो. राजकीय सभागृहे व प्रचारसभा, राष्ट्रप्रमुखांची संबोधने, विशेषज्ञांची चर्चासत्रे अथवा परस्पर संवाद आणि शैक्षणिक म्हणजे शाळा-महाविद्यालये यांत होणारा, प्रसिद्धीमाध्यमे या सर्व प्रकारच्या भाषिक विश्वावर जगतात. त्यांची स्वतंत्र विषयनिर्मिती अत्यल्प असते. संघ उघडपणे कधी कोणाशी संवाद, संभाषण वा संपर्क करतो का? नाही. का? तसा रिवाज नाही, असे त्यांचे उत्तर असते; परंतु नीट न्याहाळले तर लक्षात येईल, की संघाचे कार्यक्रम त्यांच्यासारख्या बौद्धिक कुवतीच्या लोकांतच होत असतात. अभ्यास, संशोधन, नवनिर्मिती, प्रतिवाद आदी बौद्धिक आदानप्रदान जिथे नसेल, तिथे संघाचा वावर आवर्जून असतो. त्यामुळेच तर्कहीन बोलले काय, धडधडीत खोटे सांगितले काय अन् प्रचारकी विधाने केली काय, कोणाच्या लक्षात येणार आहे? सत्याशी संबंध नाही म्हणूनच तज्ज्ञ, संशोधक, अभ्यासक वा शास्त्रज्ञ यांना जवळ फटकू द्यायचे नाही, हा संघाचा खाक्या. त्यामुळे निवडणूक असो, की दोन समाजात वितुष्ट पेटवणे असो, आपल्याला हवे ते बोलले की झाले, असा भागवतांपर्यंतच्या नेत्यांचा परिपाठ झालेला आहे. खुलासे, स्पष्टीकरणे, दिलगिरी अथवा क्षमायाचना कोण्या सरसंघचालकाने केल्याचा पुरावा नाही. याचे कारण हेच, की कोणाचीच विधाने सत्यावर वा वस्तुस्थितीवर आधारलेली नसतात. 'आमच्या म्हणण्याचा विपर्यास केला' असे तरी सांगता येते किंवा 'ती संघाची अधिकृत भूमिका नाही' अशी पळवाट तरी गाठता येते. एकंदर, काहीही करून आपले म्हणणे रेटून नेत राहायचे हेही खास फॅसिस्ट पद्धत संघामध्ये त्याच्या आरंभापासूनच आहे. विज्ञानाचे पदवीधर असणारे चार सरसंघचालक भारताने पाहिले; पण संघाचा व विज्ञानाचा, वैज्ञानिक सत्याचा आणि वैज्ञानिक विचार प्रक्रियेचा कधीही संबंध पाहिला नाही. याचा अर्थ काय? देश हे सारे सहन का करतो?

खरे तर हे असत्य, प्रचारकी आणि बेताल बोलणे असह्यच व्हायला हवे. मात्र, ते राष्ट्र, राष्ट्रप्रेम, धर्मप्रीती, स्वार्थत्याग, राष्ट्रैक्य, बंधुभाव अशा भावनिक मुद्द्यांशी जोडून सादर केले जात असल्याने लोकांची फसगत होते. जो जमाव भागवतांसारख्या व्यक्तीच्या भाषणाला जमतो किंवा जमवला जातो, तो साधारणपणे सामान्य नागरिक म्हणून गणला जात नाही. सरसंघचालक हे काही 'मास लीडर' अर्थात लोकनेता नसतात. सदर जमाव विशिष्टांचा असून, तो केवळ पूज्यभाव आणि आज्ञापालन या दोन वृत्तींना प्रतिसाद देणारा असतो. त्यातले सर्व जण जात, धर्म, भाषा, लिंग, प्रदेश, वर्ण आदींविषयी कमालीचे आग्रही असतात. म्हणूनच त्यांच्याकडून संघनेत्यांच्या विधानांची उलटतपासणी अथवा चिकित्सा होत नसते. हा जमाव सवर्ण, मध्यमवर्गीय, शहरी-निमशहरी आणि किमान सुशिक्षित असतो. परिणामतः भागवत काय बोलले आणि का बोल-ले, याचा विचार आपण करायचा असतो. त्यांच्या बोलण्यातली तर्कदुष्टता, विकृती आणि खोटेपणा उघड करायचा असतो. नाही तर खंडणमंडण ही परंपरा शंकराचार्यांनी मान्य केली होती, ती पुढे न्यायची आहे. ●●●

**(लेखक ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ आहेत.)**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2020-22
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460


A Moments of Best Built







Bridges | Roads | B.O.T. Projects | Dams | Canals | Tunnels

RAJ INFRASTRUCTURE

RAJ INFRASTRUCTURE DEVELOPMENT (INDIA) PVT. LTD.
409/410/411, Pride Silicon Plaza, Senapati Bapat Road, Next to Chatushringi Temple, Pune-411016
T. + 91 20 2563 5050 F. + 91 20 2563 3030 E. info@rajinfra.com